# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## ग्रामीण विकास अभ्यासपत्रिका क्र. IX

# ग्रामीण विकासासाठी समाजकार्य

## विषय कोड : 86691

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई



**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रो. सुब्रत कुमार साहू**
सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. बारी भुवनेश एच.**
ग्रामीण विकास विभाग प्रमुख,
श्रॉफ महाविद्यालय, चिंचणी,
ता. डहाणू, जि. पालघर

**लेखक :** : **डॉ. आर. पी. म्हात्रे**
ए. एस. सी. महाविद्यालय, पनवेल,

: **प्रा. नितिन खरात**
सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,
किर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई



**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १) | व्यावसायिक समाजकार्य | ०१ |
| २) | समाजकार्याचे टप्पे | १२ |
| ३) | समाजकार्यकर्ता दृष्टिकोन, कौशल्य व तंत्र | २८ |
| ४) | समाजकार्याचे क्षेत्र (व्याप्ती) | ४३ |
| ५) | वैद्यकीय चिकित्सा, कामगार, कल्याण, अपराध व सुधार क्षेत्र | ५७ |
| ६) | व्यक्तीकार्य व गटकार्य | ६९ |
| ७) | समुदाय संघटन | ८० |
| ८) | समाजकार्य संशोधन, प्रशासन व व्यवस्थापन | ९२ |
| ९) | संशोधन अहवाल लेखन | १०४ |


❖❖❖❖

# ग्रामीण विकासासाठी समाजकार्य

## पेपर क्रमांक नऊ

## सत्र – सहा

## subject Code: UARD ६०६

**घटक-५.व्यावसायिक समाजकार्य**

अ) व्यावसायिक समाजकार्य संकल्पना – व्याख्या- वैशिष्ट्ये – उद्दिष्टे.
आ) समाजकार्याचे टप्पे
इ) समाजकार्यकर्ता - दृष्टीकोन, कौशल्य व तंत्र

**घटक-६. समाजकार्याची व्याप्ती व क्षेत्र**

अ) समाजकार्याचे क्षेत्र- प्राथमिक आणि दुय्यम
आ) कुटुंब कल्याण, बालकल्याण, युवककल्याण , महिलाकल्याण, वृद्ध व अपंग आणि सामुदायिक विकास
इ) वैद्यकीय चिकीत्सा- कामगार कल्याण सेवाक्षेत्र – अपराध व सुधारणा क्षेत्र

**घटक-७. समाजकार्याची तत्वे आणि पद्धती**

अ) वैयक्तिक व गटकार्य
आ) सामुदायिक संघटन
इ) समाजकार्य संशोधन व समाजकार्य प्रशासन आणि समाजकार्याचे व्यवस्थापन

**घटक-८. सामाजिक संशोधनपद्धती**

अ) सामाजिक संशोधनाची संकल्पना आणि वैशिष्टये.
आ) सामाजिक संशोधनाचे महत्व व संशोधनाच्या प्रेरक शक्ती.
इ) अहवाल लेखन .

❖❖❖❖

# १

# व्यावसायिक समाजकार्य

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ व्यावसायिक समाजकार्याची संकल्पना

१.३ व्यावसायिक समाजकार्याच्या व्याख्या

१.४ व्यावसायिक समाजकार्याचा अर्थ

१.५ व्यावसायिक समाजकार्याचा उद्देश

१.६ व्यावसायिक समाजकार्याची वैशिष्टये

१.७ सारांश

१.८ स्वाध्याय

१.९ संदर्भसूची

## १.० उद्दिष्टे

हे प्रकरण वाचल्यानंतर आपल्याला खालील बाबी समजून येतील.

१) व्यावसायिक समाजकार्याची संकल्पना समजून घेणे.

२) व्यावसायिक समाजकार्याचा अर्थ जाणणे.

३) व्यवसायिक समाजकार्याचे उद्देश जाणून घेणे.

४) व्यावसायिक समाजकार्याची वैशिष्टये समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

आपल्या देशात समाजसेवेची सुरुवात फार प्राचीन काळापासून झाली आहे. मानव समाजसेवा अस्तित्वात आला त्यावेळी त्यांना इतरांचा सहवास आवश्यक होता. मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे समूह करून राहणे ही त्यांची उपजत भावना आहे. समूहात राहत असताना इतरांच्या गरजा भागविणे याच भावनेतून समाजसेवेचा उगम झाला. भारतात समाजसेवची उज्ज्वल परंपरा आहे. समाजसेवेतून सामाजिक कार्य करणे या गोष्टीला फार महत्त्व दिले जाते, परस्परांना सहाय्य करणे, गरजूंना मदत करणे, दुर्बल घटकांसाठी विकास कार्य राबविणे, हे वेगवेगळ्या धर्मात अभिप्रेत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात समाजकार्याला गती प्राप्त झाली. स्वातंत्र्य पूर्वकाळातील समाजसेवेबरोबर समाज कार्याची व्याप्ती काळानुरूप वाढत गेली. यामधून समाजसुधारक निर्माण झाले. पूर्वी जे समाजकार्य सेवाभावी वृत्तीने निःस्वार्थीपणे केले जात होते. मात्र

नजीकच्या काळात समाजसेवेचा नवीन दृष्टिकोन उदयास आला. त्यालाच व्यावसायिक समाजकार्य असे म्हणतात. समाजकार्याचे व्यावसायिक स्वरूप हे अलीकडच्या काळात झालेले बदल आहे. समाजकार्य करताना विशिष्ट प्रकारच्या मानसिकतेची गरज असते ही मानसिकता निर्माण करण्यासाठी व शास्त्रशुद्ध पद्धतीने समाजकार्य करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करण्याबरोबर सामाजिक कार्याचे शिक्षण देणाऱ्या संस्थां व महाविद्यालयाची निर्मिती झालेली दिसून येते. या क्षेत्रातून अनेक विद्यार्थी व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण घेत आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक संशोधनदेखील याच संस्थांकडून दिले जात आहे. प्रिशक्षित समाजकार्याच्या मदतीने आज अनेक संस्थां व्यावसायिक कार्यासाठी स्थापन झाल्या आहेत.

## १.२ व्यावसायिक समाजकार्याची संकल्पना

व्यावसायिक समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे. त्याचा उपयोग वैयक्तिक किंवा सामुदायिक सहाय्य करण्यासाठी केला जातो. आपल्या विशिष्ट इच्छा व योग्यतेनुसार सामाजिक इच्छा व योग्यतेला समाधानकारक समाजकार्य केले जाते आणि त्यांचा अपेक्षित मोबदला घेतला जातो. त्याला व्यावसायिक समाजकार्य असे म्हणतात.

व्यावसायिक समाजकार्यात समाजकार्याचे व्यावसायिकरण झालेले दिसून येते. मात्र यामध्ये प्रिशक्षण व शास्त्रशुद्ध ज्ञानाच्या आधारावर सामाजिक कार्य केले जाते. सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना इतरांच्या प्रगतीने आनंद घेत असते. ज्यांना आपण मदत करतो ते मदतीचा उपयोग करून स्वावलंबी होतात किंवा आर्थिक फायदे मिळवतात. त्यामुळे समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींना मानसिक सामाधान लाभतो. व्यावसायिक समाजकार्यात मानवाची दुःखे व त्यांच्या समस्या दूर करणे यासाठी बुद्धिमत्ता वापरणे व योग्य प्रेरणांचा उपयोग करणे अपेक्षित असते. यशस्वी जीवन जगण्याची क्षमता व्यक्ती किंवा समाजामध्ये निर्माण करणे असे कार्य समाजकार्यात केले जाते. मात्र कार्यकर्ता प्रिशक्षण घेण्यासाठी भांडवली गुंतवणूक करीत असल्यामुळे प्रिशक्षणानंतर सामाजिक कार्य करीत असताना मोबदल्याची अपेक्षा केली जाते.




https://www.kopykitab.com

## १.३ व्यावसायिक समाजकार्याच्या व्याख्या

व्यावसायिक समाजकार्य म्हणजे निःस्वार्थी वृत्तीने समाजकार्य न करता समाज कार्यातून मोबदल्याची अपेक्षा ठेवली जाते त्याला व्यावसायिक समाजकार्य असे म्हणतात.

व्यावसायिक समाजकार्य म्हणजे मानवाच्या प्रेम, सुरक्षितता व नवे अनुभव घेण्याच्या गरजांची सेवेतून केली जाणारी पूर्तता होय.

याप्रकारे आपणास व्यावसायिक समाजकार्याची व्याख्या करता येते.

## १.४ व्यावसायिक समाजकार्याचा अर्थ

समाजकार्याचा अर्थ आपणास अनेक पैलूतून अनेक प्रकारांनी जाणून घेता येतो तो खालीलप्रमाणे.

### १.४.१ प्रत्यक्ष सेवा व मदत देण्याची प्रक्रिया :

व्यावसायिक समाजकार्य म्हणजे विशिष्ट विचारांनी, दृष्टिकोनांनी, सिद्धांतानुसार वागून विशिष्ट भावनांनी मदत देण्याचे निश्चित उद्देश असल्याने व विशेष पद्धतीने देण्यात आलेल्या मदतीमुळे विशेष असे परिणाम साधने शक्य होते.

प्रत्यक्ष सेवा व मदत देण्याची प्रक्रिया कशी घडावी, मदत देण्याचे मार्ग काय, हे समाजकार्य सांगतो. मदत देताना कशी दिली. कोणती दिली या इतकेच महत्त्वाचे मानले जाते. ही मानवाला मानवतेच्या आधारावर दिली जाणारी सेवा आहे. सेवा विशिष्ट तर्हेने दिली जाते. सेवेचा आधार लोकशाही विचारप्रणाली असून ही सेवा व्यावसायिक, कायम स्वरूपाने प्रभाव साधणारी, काम करण्याची विशिष्ट पद्धत असणारी आहे. ह्या सेवेमागे विशिष्ट उद्देश असतो. याद्वारे मनोसामाजिक समस्या (मानसिक समस्या व सामाजिक जीवनातील समस्या) सोडवल्या जातात. बदल घडवण्याचे, (विचारात, जीवनात) योग्य सहसंबंध व नातेसंबंध निर्माण करण्याचे कार्य, समायोजन, विकास व प्रगती घडवण्याचे कार्य समाजकार्य करते.

मदत देण्यामागील कल्याणकारी उद्देश समाजकार्यात निश्चित असतात. उद्देश स्पष्ट असल्याने केलेल्या मदतीचे निश्चित, हवे तेच व अपेक्षित असेच परिणाम साधले जातात.

### १.४.२ लोकशाही मूल्यावर आधारित समाजकार्य

समाजकार्य लोकशाही मूल्यावर आधारलेले आहे. यात मानवाला महत्त्वाचे स्थान आहे सर्व मानव समान असतात. सर्वांचा समान सन्मान समाजकार्यात केला जातो. सर्वांना समान अधिकार असतात. विचार करण्याचे, निवडीच्या निर्णयाचे, कृती करण्याचे अधिकार सर्वांना समान असतात. आपल्या अधिकारांचा वापर करण्यास सर्व स्वतंत्र असतात. स्वतःच्या पद्धतीने जीवन जगण्यास प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असते. स्वतःच्या जबाबदाऱ्या कर्तव्य व भूमिका प्रत्येकाने पार पाडायच्या असतात. जेव्हा यामध्ये काही अडथळे निर्माण होतात. तेव्हा भूमिका व्यवस्थितपणे पार पाडल्या जात नाहीत किंवा अयोग्य प्रकारे पार

पाडतात. अडथळे दूर करण्याचे व सर्वांना आपले अधिकार वापरण्यास पोषक परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य समाजकार्य करते. समाजाला योग्य नागरिक, लोकशाहीत राहण्यास योग्य सदस्य, गट जीवन जगण्यास व्यक्ती घडवण्याचे कार्य समाजकार्य करते. व्यक्तीच्या विकासातून ते घडते.

### १.४.३ समाजकार्य समाजाची प्रगती घडवते :

न्याय, सहजीवन, सहिष्णुता, समायोजन, ऐक्य, एकत्रितपणा, सत्य, नीतीनियम अहिंसा हे समाजकार्याचे आचार आहेत. थोडक्यात लोकशाही तत्त्वे मानवाधिकार व मानवता हे समाजकार्याचे आधार आहेत. समाजव्यवस्था समाजजीवन, व्यक्तीचे जीवन, कुटुंबाचे जीवन यांना विस्कळीत न करता समाजाला पुढे नेण्याचे, त्यात प्रगती घडवून आणण्याचे कार्य समाजकार्याद्वारे केले जाते. म्हणूनच समाजकार्य समाजाची प्रगती घडवते.

### १.४.४ समाजकार्याची कार्य समाजाच्या गरजेनुसार ठरतात :

समाजकार्य समाजात अस्तित्वात असणाऱ्या नीतीनियमांच्या चौकटीत कार्य करते. समाजाचे नीतीनियम समाजकार्य ग्राह्य धरले. समाजकार्याची स्वतःची मुल्ये ही कामाचा आधार असतात. समाजाच्या अस्तित्वाला पोषक व मानव कल्याणाला पूरक अशी मूल्ये व नियम समाजकार्यात आधारभूत मानली जातात. समाजकार्याचे, मानवतेचे, मानवाधिकारांचे, लोकशाहीचे नीतीनियम हेच समाजकार्याचे नीतीनियम होत.

समाजकार्य म्हणजे मानवाचे कल्याण साधण्यासाठी सद्यस्थितीत जे जे करता येण्याजोगे आहे ते सर्व करणे होय. समाजकार्य वैज्ञानिक ज्ञानावर आधारलेले असते.

व्यावसायिक समाजकार्यात कार्यकर्त्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक असतो. कार्यकर्ता ज्ञानाच्या आधारे कार्य करतो. अचूक, निश्चित व पूर्ण माहितीच्या आधारे, समाजकार्याला मदत केली जाते. यातील सिद्धांताचा व तत्त्वज्ञानाचा त्रिकालबाधित उपयोग व परिणाम सिद्ध झालेला असतो. त्यामुळे सिद्धांत कामाला निश्चित दिशा देतात.

समाजकार्य हे वैज्ञानिक कार्य असल्याने माहितीचे संकलन केले जाते. माहितीची पद्धतशीर मांडणी करून सार काढले जाते. निष्कर्ष काढून उपाययोजना केली जाते व कामाची पुन्हा तपासणी केली जाते. असे वैज्ञानिक पद्धतीने मदत करणारे कार्य म्हणजे समाजकार्य होय.

### १.४.५ व्यक्ती, समाज संस्कृती यांचा एकत्रित विचार :

व्यावसायिक समाजकार्यात व्यक्ती, समाज, संस्कृती यांचा एकत्रितपणे विचार केला जातो. माणसाच्या विकासातून गटांचा विकास व गटाच्या विकासातून समाजविकास असा व्यापक विचार केला जातो. यामध्ये सर्वसमावेशकता व एकीची भावना असते. व्यक्तीजवळ जे असते ते तिने एकटीने मिळवलेले नसते, तर ते तिला समाजामुळे मिळालेले असते हे विचार समाजकार्यात असतात.

### १.४.६ व्यावसायिक समाजकार्य समाजोन्मुख व्यवसाय :

प्राईड लँडर यांनी समाजकार्याचा अर्थ सांगताना म्हटले आहे की, लोकशाही सिद्धांत व मानवाधिकारांना प्रत्यक्षात उतरवण्यास, त्यांना प्रत्यक्ष जीवनात आणण्यात समाजकार्य मदत करते. सर्व समाजासाठी योग्य जीवनस्तर निर्माण करण्यास ते मदत करते, सामाजिक सुरक्षा देते व मानवाच्या सामान्य गरजांची जसे प्रेमाची गरज, मान्यतेची वा व्यक्तीमत्त्वाची गरज, दर्जा मिळविण्याची गरज. या सर्वांची समाजकार्य पूर्तता करणे, शेवटी हे स्पष्ट करावेसे वाटते का व्यावसायिक समाजकार्याचा ज्ञानाचा तितका जास्त कार्यकर्ता अभ्यास करील. तसेच जितके त्याचे चिंतन, मनन व अभ्यासाच्या आधारे कार्यकर्ता जितका डोळसपणे वस्तुस्थिती पाहून काम करील तितका समाजकार्याचा अर्थ अधिकाधिक स्पष्ट होत जाईल व त्याची प्रचंड व्याप्ती लक्षात येईल. या दृष्टीने प्रत्येक कार्यकर्त्याने चिंतन व कार्य करायला हवे.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यावसायिक समाजकार्याचा अर्थ विशद करा.

## १.५ व्यावसायिक समाजकार्याचा उद्देश

समाजकार्यात हेतू किंवा उद्देश यांचा केलेल्या कामांच्या परिणामांशी जवळचा संबंध असतो. कृतीच्या परिणामात कृती करण्यामागील उद्देश महत्त्वाचा ठरतो. कारण हा उद्देश कृतीचा मार्ग ठरवतो. कार्यकर्त्याचा वागण्यामागचा हेतू कार्यकर्त्याला व इतरांनाही स्पष्ट असतो व तो एकच म्हणजे कल्याणाचा असतो. मनात एक व दाखवण्याचा एक असे दोन निरनिराळे हेतू नसतात. त्यामुळे कार्यकर्त्यात नसतो. त्याची सदसद्विवेकबुद्धी, नीतीतत्त्वे, ज्ञान इ. त्याला योग्य मार्ग दाखवतात. त्याच्या उद्देशात व त्याच्या वागण्या-बोलण्यात विसंगती नसते.

समाजकार्याच्या हेतूत स्वार्थ नसतो. श्रेय घेण्याची इच्छा नसते, त्यामुळे समाजकार्याच्या हेतूने केलेले काम प्रभावी होते. समाजकार्याचे हेतू, कामाचे मार्ग व कामाची पद्धत हे सर्वच वैशिष्टपूर्ण व अपेक्षित परिणाम साधणारे असतात. समाजकार्य करताना वेगवेगळ्या समस्यांचा विचार केला जातो. आर्थिक विकासाशी संबंधित असणाऱ्या समस्या, सामाजिक समस्या, जाती व धर्मभेद, आरोग्य व शिक्षणाशी निगडित असणाऱ्या समाजसेवा अशा अनेक समस्यांचा विचार समाजकार्यात केला जातो. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने दुर्बल घटकांना साध्य करणे हा सामाजिक कार्याचा मुख्य उद्देश असतो. समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे समाजाला योग्य दिशा देणे हे घटक महत्त्वाचे असल्यामुळे समाजकार्याचे पुढील उद्देश डोळ्यासमोर घेऊन समाजकार्य केले आहे.

### १.५.१ पुन्हा स्थापना :

जेव्हा अपेक्षित कार्य किंवा भूमिका पार पाडल्या जात नाहीत किंवा योग्य प्रकारे केल्या जात नाहीत तेव्हा तेथे पुननिर्मिती, पुनर्रचना, पुन्हा स्थापना करायची असते व बदल घडवायचे असतात. भूमिका पार पाडण्याच्या मार्गात येणारे अडथळे दूर केले जातात.

येथे अनुक्रमे पुनर्वसन व उपचार घेतात. सहसंबंध व आंतरक्रिया पुन्हा निर्माण होतात. त्यात सुधारणा घडवली जाते. त्यांना योग्य रूप दिले जाते. पुन्हा आपले स्थान व दर्जा प्राप्त करण्यास मदत दिली जाते . त्यामुळे व्यक्ती, गट आणि समुदायाचा विकास होतो. उदा. काही कारणास्तव विवाहित स्त्रीला कुटुंबापासून वेगळं केले असेल अशा विवाहित स्त्रीला पुन्हा कुटुंबात स्थान मिळवून देणे (पुनःस्थापना) आणि कुटुंबीय व स्त्री या दोघांनाही परस्परांना मानसिकदृष्ट्या स्वीकारण्यास तयार करणे. (पुनर्वसन व उपचार) अपंगाच्या, विस्थापितांच्या मार्गापासून विचलित झालेल्यांच्या कार्यक्षमता नसणार्यांच्या किंवा गमावलेल्यांच्या संदर्भात पुन्हा स्थापनेचे कार्य होते.

योग्य सहसंबंधीची, विचार, भावना, वर्तन इ.ची पुन्हा स्थापना होते जेणेकरून कल्याण साधेल.

### १.५.२. मानवी सहसंबंधातील समस्या दूर करणे :

विविध समाजामध्ये मानवी सहसंबंधात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. उच्चनीच्च किंवा जातीयतेमुळे या सहसंबंधाच्या समस्या निर्माण होण्यास कारणीभूत घटक असतात. म्हणून संपूर्ण मानव समाजात सहसंबंध सुरक्षित व सुयोग्य निर्माण करून सुखी - समाधानी समाज निर्माण करण्यासाठी समाजकार्य करणे हा समाजकार्याचा उद्देश आहे.

### १.५.३ समाजात लोकशाही रुजविणे :

संपूर्ण मानवी समाजात लोकशाही निर्माण करून देशाचा आदशर् नागरिक तयार करण्याचे कार्य समाजकार्यात केले जाते. समाजातील नागरिकांना लोकशाहीची माहिती करून देणे,



**https://www.deshbandhu.co.in**

मानवी अधिकारांचे व हक्कांची जाणीव करून देणे आणि त्या माध्यमातून समाजात लोकशाही रुजविणे हे समाजकार्याचे उद्देश आहे.

### १.५.४ सामाजिक समस्या सोडविणे :

व्यक्तीच्या वैयक्तिक समस्या समूहाच्या सामाजिक जीवनाशी निगडित समस्या आणि आर्थिक विकासाशी निगडित समस्या सोडविण्याचे महत्त्वाचे कार्य समाजकार्यातून केले जाते. म्हणून समाजातील सामाजिक समस्या सोडवून समाजामध्ये विकासाच्या क्षमता निर्माण करणे हे समाजकार्याचे महत्त्वाचे उद्देश आहे.

### १.५.५ अस्तित्वात असलेल्या सेवा समाजापर्यंत पोहोचविणे :

समाजाला सेवा पुरविणे हे महत्त्वाचे कार्य शासकीय यंत्रणेचे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांमार्फत समाज विकासाच्या अनेक योजना व कार्यक्रम राबविले जात आहेत. मात्र असे कार्यक्रम गरजू समाजापर्यंत योग्य प्रमाणात पोहचविण्याची क्षमता शासकीय यंत्रणेत नाही. म्हणून अस्तित्वात असलेल्या सेवा योग्य प्रमाणात समाजापर्यंत पोहोचवून त्यांना त्यांचा लाभ देणे हे समाजकार्याचे उद्देश आहे.

### १.५.६ सामाजिक परिवर्तन घडवून आणणे :

मागास समाजात व विशेषतः ग्रामीण समाजात अपेक्षित असलेले परिवर्तन घडवून आणण्यासाठी वेगवेगळ्या विभागांत असणाऱ्या विविध समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करून सामाजिक परिवर्तन घडवून आणणे हे समाजकार्याचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

### १.५.७ समाजात संतुलन व सहकार्याची भावना निर्माण करणे :

समाजात संतुलन निर्माण करण्याच्या उद्देशाने मालमत्तेवरील मालकी हक्कात समानता निर्माण करणे, गरीब घटकांना मालमत्तेचा अधिकार मिळवून देणे, समाजातील विविध गरजांची पूर्तता करणे आणि सर्व समाजामध्ये समानता निर्माण करणे हे समाज कार्याचे उद्देश आहे. याचबरोबर समाजात सहकारी भावना वाढीस लावण्यासाठी समाज संघटन निर्माण करणे, सामूहिक वृत्तीला महत्त्व देणे हे उद्देश देखील समाजकार्याचे आहे.

### १.५.८ हितसंबंधाचे संरक्षण करणे :

समाजाच्या फायद्यासाठी असलेल्या सर्व प्रकारच्या गोष्टी समाजात रुजविण्यासाठी आणि समाजकार्यात लोकसहभाग वाढविण्यासाठी सामाजिक कार्य महत्त्वाचे मानले जाते. समाजहितासाठी आवश्यक असलेले घटक आणि सामाजिक हक्क मिळवून देण्याच्या दृष्टीने सर्व समाजाचे हितसंवर्धन करणे हे समाजकार्याचे उद्देश आहे.

### १.५.९ विकासाच्या संधी समानतेने प्रधान करणे :

समाजातील सर्व व्यक्तींना विकासाच्या संधी प्राप्त व्हाव्यात आणि दुर्बल घटकांना विकास कार्यामध्ये प्राधान्य मिळावे यासाठी समाजकार्याला महत्त्व दिले जाते. विकासाच्या संधीपासून दूर असलेल्या समाजाला विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी समाजकार्यात उद्देश ठेवला आहे.

### १.५.१० मदत करणारी कार्य :

समाजकार्याची भूमिका पार पाडत असताना ज्या व्यक्तींना मदतीची गरज आहे. अशा व्यक्तींना अवश्य ती मदत करणे, सेवा देणे आणि उपलब्ध असलेल्या सेवा गरजू व्यक्ती यांच्यामधील दुवा साधणे. गरजूंसाठी सेवांची निर्मिती करणे. हे मदत कार्यामध्ये महत्त्वाचे उद्देश टेवले जातात.

अशा प्रकारे विविध उद्देशाने आपल्या देशात समाजकार्याला सुरुवात झाली आहे. एकंदरित विकास प्रक्रियेपासून दूर असलेल्या समाजाला विकासाच्या संधी प्राप्त करून देण्यासाठी, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मानवी मुल्याची जपणूक करण्यासाठी समाजकार्यात वरील उद्देश महत्त्वाचे मानले जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यावसायिक समाजकार्याचे विविध उद्देश सांगा.

## १.६ व्यावसायिक समाजकार्याची वैशिष्टये

आपल्या देशात समाजकार्याची परंपरा अनेक वर्षांची आहे. समाजकार्य गरजांवर आधारित असल्यामुळे समाजकार्याची वैशिष्टये वेगवेगळी असल्याची दिसून येतात. अनेक समाजसुधारक आणि समाजशास्त्रज्ञांनी समाजकार्याच्या संकल्पना मांडल्या आहेत. तसेच व्याख्याही सांगितल्या आहेत. त्याचबरोबर समाजकार्याचा अर्थ स्पष्ट केला आहे. यामध्ये समाजकार्याच्या वैशिष्ट्यांचा अंतरर्भाव आहे. व्यावसायिक समाजकार्याची वैशिष्टये खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १.६.१ मदतीला व सेवेला गरजूंनी स्वीकृती देणे :

समाज कार्यकर्ता ज्यावेळी गरजू समाजासाठी सेवा देत असतो त्यावेळी त्याची समाजाने स्वीकृती करणे हे एक महत्त्वाचे वैशिष्टये सांगितले जाते. समाजकार्य करत असताना गरजांवर आधारित असल्यामुळे समाजकार्यातून जी मदत केली जाते किंवा सेवा पुरवली जाते ती तातडीने समाजामध्ये स्वीकारली जाणे हे समाजकार्याचे वैशिष्ट्य आहे. समाजाच्या ज्वलंत समस्या ओळखून या समस्या सोडविण्यासाठी समाजकार्य केले जाते.

### १.६.२ स्वतःची मते गरजूंवर लादली जात नाही :

समाजकार्य करणारी व्यक्ति किंवा संस्थां समाजात विशिष्ट स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्य करीत असते. हे कार्य करत असताना आपली मते समाजाला पटवून सांगत असतात. समाजाने योग्य प्रतिसाद दिला तरच त्या ठिकाणी समाजकार्याला सुरुवात होते म्हणून आपली मते गरजूंवर लादण्यापेक्षा गरजूंना समजावून सांगण्याला अधिक महत्त्व दिले म्हणून हे एक समाजकार्याचे वैशिष्टये सांगितले जाते.

### १.६.३ मदत प्रक्रियेत सेवार्थिंचा सहभाग :

समाजकार्याच्या प्रक्रियेत ज्या व्यक्तींना किंवा समूहाला आपण मदत करणार आहोत किंवा विशिष्ट स्वरूपाची सेवा उपलब्ध करून देणारे आहोत. त्यामध्ये समाजाचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो. समाज कार्याच्या माध्यमातून परिवर्तनाची दिशा देण्याचे काम केले जाते मात्र ज्यांच्या वेळी समाजकार्य केले जाते त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. कोणत्याही गोष्टी व्यक्ती किंवा समूहावर लादल्या जात नाहीत. स्वेच्छेने निर्णयाला प्रवृत्त करणे हे समाज कार्याचे वैशिष्ट्य सांगितले जाते.

### १.६.४ व्यक्तीगट व समूदाय यांचा समतोल विकास :

समाजकार्यात विशिष्ट व्यक्तीच्या गटांचा किंवा विशिष्ट समूदायाचा विकास साधताना त्यांच्या गरजा ओळखून कार्यात सुरुवात केली जाते. समाजकार्य करत असताना गरजूंच्या क्षमतांचा विकास साधण्यावर अधिक भर दिला जातो. समाजकार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला नेहमी असे वाटत असते की, आपल्या सहकार्याने व्यक्तीचा किंवा समाजाचा जलद गतीने विकास व्हावा, या उद्देशाने समाजकार्य केले जाते.

### १.६.५ व्यक्तींचा सर्वांगीण विचार केला जातो :

शासकीय यंत्रणेमार्फत विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करतात. उद्देशपूर्तीसाठी अंमलबजावणी या गोष्टीला महत्त्व दिले जाते. मात्र समाजकार्यात समाजाच्या समस्यांचा किंवा प्रश्नांचा विचार करताना जीवनातील सर्व पैलूंचा यामध्ये समावेश केला जातो. कारण एक समस्या इतर घटकांशी निगडित असते.

### १.६.६ समाजकार्यात लोकांना समजून घेण्यावर भर :

समाजकार्यात समाजामध्ये आपुलकी निर्माण करण्यावर भर दिला जातो. त्यासाठी मनोचिकित्सेच्या, मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय संकल्पनांचा आधार घेतला जातो. सेवार्थीला स्वतःबदल काय वाटते, इतरांबरोबर असणाऱ्या सहसंबंधाबद्दल काय वाटते, इतरांना सेवार्थीबदल काय वाटते, त्यांचा एकमेकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे. यात समाजकार्याला रुची असते. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून भावनांना जाणून घेतले जाते. मानवी सहसंबंधाबरोबर काम करण्याची कला समाजकार्यकर्त्याला अवगत असते. मानवी वर्तन जाणून घेण्याची कार्यकर्त्याच्या ठिकाणी क्षमता असते. सैद्धांतिक ज्ञानाच्या उपयोगाने लोकांना समजून घेणे व त्यांच्या अडचणी दूर करणे हे कार्य केले जाते.

### १.६.७ समाजकार्याची वेगळी पद्धती व प्रक्रिया :

समाज कार्यकर्ता समाजकार्य करत असताना समाजातील समस्या सोडविण्यासाठी आपली कार्यपद्धती व कार्य प्रक्रिया स्वतः वापरत असतो. आपल्या अनुभवातून स्वतःची कार्यपद्धती स्वतःच्या कौशल्यावर तयार केलेली असते. यामधून समाजातील समस्या सोडविण्याचे कार्य समाज कार्यकर्ता करत असतो. कार्यपद्धती, स्वतः निर्माण केलेल्या कार्यकर्त्यामध्ये समाजाचा सहभाग मिळविण्याचे कौशल्य कार्यकर्त्यामध्ये अनुभवातून निर्माण झालेली असते. म्हणून हे एक समाजकार्याचे वैशिष्टये सांगितले जाते.

### १.६.८ आर्थिक उन्नतीवर अधिक भर :

विशिष्ट व्यक्ती किंवा समूहाची आर्थिक उन्नती करण्यावर समाजकार्यात अधिक भर दिला जातो. स्थानिक भागातील परिस्थितीवर आधारित व्यवसायांचा विकास साधून कायमस्वरूपी आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी समाज कार्यकर्ता प्रयत्नशील असतो. त्यामुळे आर्थिक उन्नतीसाठी वेगवेगळे मार्ग समाजकार्यकर्ता शोधत असतो, स्वतःच्या पद्धतीनुसार व्यावसायिक विकासावर अधिक भर देत असतो.

### १.६.९ अनुभूतीची व सेवा पुरविण्याची भावना :

समाजाला विकासाच्या मार्गावर आणणे किंवा त्यांच्या समस्या सोडविणे यासाठी समाज कार्यकर्ता कार्य करत असतो. आपण नि:स्वार्थीपणे समाजाची सेवा करत असल्याची भावना त्यांच्यामध्ये असते म्हणूनच प्रामाणिकपणे अपेक्षित समाजपरिवर्तनाचे कार्य समाज कार्यकर्ता करीत असतो. समाज कार्यकर्त्यामध्ये सेवार्थीची भावना व समाजाबद्दलची सहानुभूती निर्माण झालेली असते.

### १.६.१० गरजू व समाजातील साधने यामधील दुवा :

आपल्या देशात किंवा विशेषतः ग्रामीण भागात अनेक समस्या असलेल्या दिसून येतात. या समस्या सोडविण्यासाठी विविध स्वरूपाची साधनेदेखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेली दिसून येतात. मात्र गरजूंपर्यंत ही साधने किंवा सेवायोग्य प्रमाणात पोहोचविण्याचे कार्य होत नाही. समाज कार्यकर्ता या दोन्हींमधील दुवा असतो. स्थानिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करून विशिष्ट समाजाचा आर्थिक विकास साधने किंवा शासनाच्या योजना समाजापर्यंत पोहचविणे हे काम समाजकार्यात केले जाते. म्हणून गरजू आणि समाजातील साधने यामधील दुवा हे समाजकार्याचे वैशिष्ट्य सांगितले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यावसायिक समाजकार्याची वैशिष्टये सांगा

## १.७ सारांश

समाजकार्याची सेवा क्षेत्रातील भूमिका ठरलेली असते. समाजाला सेवा देण्यात समाजकार्याचा वाटा, समाजकार्याचे कार्यक्षेत्र निश्चितपणे ठरलेले असते. त्यामुळे कोणा एका व्यवसायाकडून देण्यात येणाऱ्या सेवाच तेवढ्या महत्त्वाच्या हा विचार नसतो. अन्य व्यवसायांशी समाजकार्याची चढाओढ नसते. त्यांची कामे समाजकार्य स्वतःकडे घेत नाही. मानवाला सेवा पुरवणाऱ्या अन्य व्यवसायाशी समाजकार्याची अबाधित स्पर्धा नसते. तर या व्यवसायांशी सहकार्य असते. त्याच वेळी समाजकार्याचे कार्यक्षेत्र अन्य व्यवसाय घेत नाहीत आणि घेऊ शकत नाहीत. सेवा देणाऱ्या व्यवसायांच्या, समाजकार्य हाही एक व्यवसाय असतो. व्यवसायांचे सेवाकार्यात समान महत्त्व असते, जागा असते. सर्व व्यवसायांना सहअरितत्व असते. सर्व व्यवसाय परस्पर पूरकतेने परस्परांच्या मदतीने एकात्मिक पद्धतीने समाजाला सेवा पुरवतात. असे होण्याने समाजाच्या सर्व गरजांचा व समस्यांचा वेगवेगळ्या पैलूतून वेगवेगळ्या व्यावसायिकाकडून एकत्रित विचार होतो. त्यामुळे त्यांना समग्र-सर्वांग परिपूर्ण उत्तर प्राप्त होते. यामुळे समाजकल्याण होते व समाजविकास घडतो.

असे असले तरीही व्यावसायिक समाजकार्यात व्यक्तीचे जे महत्त्व मानले गेले आहे त्याला मुरड घालून. योग्य वळण देऊन व्यक्तीचे महत्त्व आहे पण तरी सामुदायिकतेचे महत्त्व त्यापेक्षा कांकणभर सरस आहे. हे लक्षात घेऊन सर्वांचा एकत्रित विचार करून त्या पार्श्वभूमीवर व्यक्तीचा विचार करावा लागतो. उदा. सुनेला स्वतंत्र राहणे पसंत असते. पण तरी ह्या स्वातंत्र्याचा उपयोग करताना पूर्ण कुटुंब, सासू-सासरे, कौटुंबिक जबाबदार्या,

कुटुंबाची परिस्थिती, साकल्याने विचार करूनच वेगळे व्हायचे का, या अधिकाराचा उपयोग करण्याचा सुनेला अधिकार आहे का, हे ठरते. भारतीय समाजात जी अनेक वैशिष्टये आहेत त्यातील काहीच वर उल्लेख केला आहे. त्यांचा समाजाला बांधून ठेवण्यास, माणसाच्या वागण्याला दिशा देण्यास उपयोग होतो. म्हणूनच या बाबींचा उपयोग आपले उद्देश साध्य करण्यासाठी समाजकार्य करते. म्हणूनच त्याचे भारतातील स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण आहे.

## १.८ स्वाध्याय

- व्यावसायिक समाजकार्याची संकल्पना सांगून व्यावसायिक समाजकार्याचा अर्थ स्पष्ट करा.
- व्यावसायिक समाजकार्याची व्याख्या सांगून उद्देश स्पष्ट करा.
- व्यावसायिक समाजकार्याची संकल्पना सांगून वैशिष्टये स्पष्ट करा.

## १.९ संदर्भसूची


- Chowdhari, D Paul, Introduction to Social Work, Atmaram and Sons 1964.
- Chowdhari, D. Paul, Handbook of Social Welfare, Atmaram and Sons, Delhi, 66.
- Das G. Advance Sociological Theories Nanu Enterprise Educational Publishers, Delhi 110006.
- डॉ. प्राजक्ता टाकसाळे एकात्मिक समाजकार्य.
- डॉ. प्राजक्ता टाकसाळे व्यावसायिक समाजकार्य.
- Sing K. Social Work Theory and Practice, (Prakashan Kendra) Lucknow, 84 .


❖❖❖❖

# २

# समाजकार्याचे टप्पे

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ एकात्मिक दृष्टीने सुरूवातीचा टप्पा (Inductio Phase) आरंभावस्था अभ्यास

२.३ एकात्मिक दृष्टीने मध्यावस्था (Core Phase)

२.४ एकात्मिक पद्धतीने मदत-उपचार

२.५ समारोपावस्था (Ending Phase) शेवटचा टप्पा

२.६ सारांश

२.७ संदर्भ सूची

२.८ स्वाध्याय

## २.० उद्दिष्टे

समाजकार्याचे टप्पे या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- समाजकार्याचे टप्पे जाणून घेणे.
- समाजकार्याची आरंभावस्था समजून घेणे.
- समाजकार्याची मध्यावस्था जाणणे.
- समाजकार्याचा शेवटचा टप्पा अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना

समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे. हा व्यवसाय शास्त्रीय ज्ञानावर व मानवी संबंधांच्या कौशल्यांवर आधारित आहे. एखादया व्यक्तीला किंवा गटाला अशी मदत केली जाते, जेणेकरून सामाजिक व वैयक्तिक समाधान निर्माण होऊन स्वावलंबनाची प्रकिया सुरू होईल.

व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. त्याच्या ह्या भावनेतूनच समाजसेवेचा उगम झाला आणि सेवा केल्याने पुण्यप्राप्ती होते ही भावना उदयास आली. समाजसेवा ही प्राचीन काळातील धर्मभावनेची उत्पत्ती आहे. समाजकार्य ही एक प्रक्रिया आहे. विविध कामांच्या कड्यांच्या एकत्रीकरणातून ही प्रक्रिया निर्माण होते. ह्यात सातत्य असते. प्रक्रियेच्या कड्या परस्परांशी निगडित असतात. त्या एकमेकांपासून विलग नसतात. ही प्रक्रिया चक्राकार घडते. कधी मागे - पुढे, मागे - पुढे होत होत मार्गक्रमण करते. या प्रक्रियेतून समाजकार्य पुढे-पुढे जाते. विकास पावते. सेवार्थी व कार्यकर्ता यांच्यातील सकारात्मक उद्देशपूर्ण व्यवहार असा या प्रक्रियेचा अर्थ असतो. या प्रक्रियेतून समाजकार्याचे उद्देश प्राप्त केले जातात. उद्देश पूर्ण करणारी अनेकविध कामे होतात.

## २.२ एकात्मिक दृष्टीने सुरूवातीचा टप्पा (INDUCTION PHASE) आरंभावस्था अभ्यास

कोणत्याही मार्गाने कार्याचा आरंभ करताना व्यक्ती, गट किंवा समुदाय यापैकी कोणत्याही सेवार्थींना सेवा देताना, एकात्मिक पद्धतीने विचार होऊन आरंभ काळातील अभ्यास, निदान, मदत, मूल्यांकन होते.

या अवस्थेत पूर्वतयारी होते, योजना आखली जाते, हस्तक्षेपाची सुरुवात होते, अभ्यास होतो. अभ्यास-निदान करण्याच्या उद्देशांनी तसेच मदतकार्याच्या सर्व उद्देशांनी या टप्प्यावर विविध कामे होतात.

समाजकार्य प्रक्रियेची सुरूवात वास्तविक आरंभावस्थेच्याही पूर्वीपासूनच होते. आरंभावस्थेपूर्वी पूर्वतयारी होते. सेवेची गरज आहे, मदत हवी आहे! अशी मानसिकता सेवार्थात निर्माण केली जाते. मदतीची अपेक्षा करणारा / करणारे सेवार्थी भेटी दरम्यान काय घडेल, याची पूर्वकल्पना करून सेवा घेण्यास सुरूवात करतात. समस्येची जाणीव ठेवून उपलब्ध मदत कोणती त्याची सेवार्थीला जाणीव ठेवून स्वतःचे परीक्षण करून कार्यकर्ता सेवा देण्याची पूर्वतयारी करतो. सेवार्थीत असंतोष निर्माण करून, जबाबदारी हक्क व कर्तव्याची जाणीव निर्माण करून समाजकार्याचा आरंभ होतो.

या टप्प्यावर समाजकार्याची भूमिका सुरू होते. हस्तक्षेपांची पूर्वतयारी होऊन प्रत्यक्ष हस्तक्षेप सुरू होतो. हस्तक्षेपाची गरज, उपयोग व हस्तक्षेपाचे निश्चित क्षेत्र ठरविले जाते. हस्तक्षेपाची सीमारेषा-हद्द ठरवली जाते. हस्तक्षेप करण्याची गरज असणारी परिस्थिती आहे का? ती कोणती? हे कार्यकर्ता ठरवतो. हस्तक्षेप कोणकोणत्या स्तरावर करायचा हे ठरते. या नंतर हस्तक्षेप करण्याचा निर्णय होऊन, विशेष स्वरूपाचा हस्तक्षेप कार्यकर्ता करतो. कार्यकर्त्याच्या हस्तक्षेपात विविध वैशिष्ट्ये असतात. जसे हा हस्तक्षेप विशेष दृष्टिकोन ठेवून केला जातो. हा हस्तक्षेप क्षमतांचा विकास घडवतो. स्वयंपूर्णता-स्वयंजागृती निर्माण करतो. सेवार्थीला शक्ती देतो, सातत्याने बदल घडवतो. हा हस्तक्षेप सेवार्थीचा सर्वसमावेशक विचार करून केला जातो. पुढाकार घेऊन केला जातो. यात नातेसंबंधाचा उपयोग केला जातो. प्रत्येक ठिकाणी करण्यात येणारा हस्तक्षेप वेगवेगळया स्वरूपाचा असतो.

### २.२.१ सुरूवातीच्या काळातील वातावरण :

या आरंभकाळात जेव्हा अभ्यास होतो तेव्हा कार्यकर्ता व सेवार्थी विशिष्ट वातावरण अनुभवत असतात.

या सुरूवातीच्या काळातील वैशिष्ट्यपूर्ण वातावरणामुळे

i. गरजा कळतात, समस्या स्पष्ट होतात, समस्यांची कारणे स्पष्ट होतात.

ii. सेवांची निवड होते.

iii. सेवांच्या उपयोगाचा अंदाज येतो.

iv. अभ्यास करता येतो. (प्रारंभावस्थेतील कार्ये सुलभपणे करता येतात.)

v. दिशा स्पष्ट होते.

vi. भूमिका स्पष्ट करणे शक्य आहे. कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट होते.

vii. आत्मीयता स्थापित होते.

viii. नाते प्रस्थापित होते.

ix. कार्यकर्त्यांचे सेवार्थीला स्पष्टपणे कळतात.

x. मदतीची मागणी समोर येते.

### २.२.२ आरंभावस्थेतील घटना :

सूक्ष्म ते व्यापक स्तरावर सेवा देतांना सर्वदूर घडणाऱ्या या घटना असतात. समाजकार्याच्या आरंभावस्थेत पुढील घटना घडतात. (या घटना अन्य अवस्थांमध्ये घडतच राहतात).

i. कार्यकर्त्याकडून मुलाखती दरम्यान वातावरण निर्मिती केली जाते.

ii. सेवार्थीकडून माहिती मिळवणे.

iii. सेवार्थीकडून समस्या निवेदन घेणे.

iv. कार्यकर्त्यांची समस्या जाणणे.

v. सेवार्थीच्या दृष्टिकोनातून समस्या जाणणे.

vi. स्वतःची समस्या स्वतः समजून घेण्यास सेवार्थीला मदत करणे.

vii. सेवार्थीने कार्यकर्त्यास समजून घेणे.

viii. मुलाखती दरम्यान सेवार्थीकडून सहकार्य मिळवणे.

ix. सेवार्थीस समजून घेणे, त्याच्या गरजा जाणणे.

x. अभ्यास करणे, योजना आखणे.

xi. कार्यकर्ता व सेवार्थीकडून परस्परांची फेरनिवड.

xii. कार्यकर्ता व सेवार्थी यांचा परस्परांवर प्रभाव होणे.

### २.२.३ आरंभावस्थेतील कार्ये :

प्रथमावस्थेतील कार्यकर्त्याकडून होणाऱ्या कामांची यादी पुढील प्रकारे करता येते. (ही कार्य आरंभावस्थेपुरतीच मर्यादित नसतात तर ती पुढील अवस्थांमध्येही केली जातात. आरंभावस्थेतील कार्ये अन्य अवस्थांमध्येही सुरू असतात).

१. सेवार्थीला समजून घेणे, सेवार्थीवरील प्रभाव जाणणे.

२. आपल्या कार्यक्षेत्रात येणारी कामे जाणणे.

३. सुयोग्य सिद्धांतानुरूप नातेसंबंध निर्माण करणे.

४. सखोलीने मुलाखती घेणे.

५. अडचणी प्रस्तुत करण्यास गरजूला साहाय्य करणे.

६. माहितीचे संकलन करणे, छाननी करणे, सुसंगती मांडणी करणे, विचारांना दिशा देणे, विश्लेषण करणे, मिळणाऱ्या माहितीचा अन्वयार्थ लावणे.

७. निदान करणे.

८. सेवार्थीच्या गरजा व मागण्या अपेक्षा जाणणे, समस्येप्रति आणि मदतीप्रति असणारे दृष्टिकोन जाणणे.

९. सहभाग मिळवणे.

१०. सेवार्थी समोर आदर्श प्रस्तुत करणे.

११. उदासीनता दूर करणे, दडपण दूर करणे.

१२. स्पष्टीकरण देणे.

१३. समजून घेणे.

१४. माहितीच्या आधारे चित्र तयार करणे, सेवार्थीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुल्यापासून कामाची सुरूवात करणे.

१५. कारणे स्पष्ट करणे.

१६. मुद्यांवर लक्ष केंद्रित ठेवण्याची चर्चा घडवणे.

१७. सेवार्थीला त्याच्यातील क्षमतांबाबत जागरुक करणे, त्यांचा विकास घडवणे.

१८. सकारात्मक विचार करणे, प्रोत्साहन देणे.

१९. सेवार्थीचे वेगळेपण मान्य करून आदर करणे.

२०. विश्वास संपादन करणे.

२१. नेतृत्त्व करणे, नियंत्रण ठेवणे.

२२. सेवार्थीला जागरुक करणे.

### २.२.४ आरंभावस्थेत अभ्यास :

एकात्मिक पद्धतीने आरंभावस्थेत अभ्यास कसा होतो हे पुढील माहितीवरून स्पष्ट होते. सर्वदूर या विचारांनी होणारा अभ्यास एकात्मिक अभ्यास ठरतो. अभ्यास ही सतत चालणारी प्रक्रिया असते. कारण समाजकार्याचे सेवार्थी मानव असतात. ते सतत बदलतात. सुरूवातीच्या काळात प्रामुख्याने अभ्यास होतो. हे जरी खरे असले तरी पुढील टप्प्यावरही अभ्यास थांबत नाही. हेदेखील तितकेच खरे असते. अभ्यासासाठी मुलाखती, नातेसंबंध, आंतरक्रिया यांचा उपयोग केला जातो. अभ्यास करणाऱ्या कार्यकर्त्याचे दृष्टिकोन, वर्तन सिद्धांताप्रमाणे असते हे सैद्धांतिक ज्ञानावर आधारलेले असते. विविध कुशलतांच्या उपयोगाने कार्यकर्ता या टप्प्यावर अभ्यास या पायरीचे काम करतो.

जेव्हा एक किंवा जास्त मार्गाने अभ्यास करण्याचे कार्यकर्ता निश्चित करतो तेव्हा निवडलेल्या त्या मार्गात कोणत्या बाबींना महत्त्व आहे? त्या मार्गाने किंवा त्या मार्गांनी सेवा देण्यासाठी कोणती माहिती मिळवणे गरजेचे आहे. हे तो लक्षात घेतो व अशी माहिती मिळवण्यावर भर देतो. उदा. व्यवस्था मार्ग, मदत देण्यात उपयोगी ठरणार असेल तर सेवार्थीच्या भूमिकेच्या संदर्भात जास्त अभ्यास केला जातो; समस्या समाधानाच्या मार्गाने सेवा देण्यात येणे योग्य असेल तर अभ्यास होतो. जेव्हा कुटुंब केंद्रित सेवा प्रदान करायच्या असतात तेव्हा कुटुंबाचा अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. वर्तनविषयक मार्गाने अभ्यास करताना वर्तन घडवणाऱ्या प्रेरणांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. एकापेक्षा जास्त प्रकारांनी मदत करायची गरज आढळली तर त्या त्या मार्गात ज्या ज्या गोष्टीवर भर दिला जातो. त्या सर्वांच्या संदर्भात अभ्यास केला जातो.

अशा रीतीने व्यापक विचाराने, समजून घेऊन, संदर्भासह आरंभावस्थेत प्रामुख्याने अभ्यास केला जातो.

### २.२.५ समाजकार्याच्या विविध मार्गातील आरंभावस्थेचे अभ्यासाचे विवेचन :

समाजकार्याच्या विविध दृष्टिकोनात आरंभावस्थेचे व त्यात होणाऱ्या अभ्यासाचे त्या दरम्यानच्या कार्याचे वर्णन आढळते. त्याचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल. यांच्या आधारे अभ्यासाचा एकात्मिकतेने वरीलप्रमाणे आढावा घेतला आहे.

मनोसामाजिक मार्ग या टप्प्यावरील अभ्यासांतर्गत करण्याची कामे पुढीलप्रमाणे नमूद करतो.

इद्रम् अहं व सारासार विवेकाचा वातावरणाचा अभ्यास केला जातो. व्यक्तीमत्त्वाला जुळवून घेण्याच्या पद्धतीचा अभ्यास केला जातो. या मार्गानुसार अभ्यास म्हणजे मनोसामाजिक अध्ययन होय. ज्यात पुढील अभ्यास अंतर्भूत होतो.

i. वातावरणाचा - समस्येचा - व्यक्तीचा अभ्यास.

ii. वातावरणातील घटकांशी व्यक्तींच्या संबंधांचा अभ्यास.

iii. तथ्ये जाणणे.

iv. सुप्त मन जाणणे.

v. गरज असल्यास गरजेइतका इतिहास जाणणे.

vi. सेवार्थीच्या अपेक्षा जाणणे.

vii. सेवार्थीची मूल्ये भावना जाणणे.

वरील मुद्यांच्या उपयोगाने अभ्यास करावा असे हा मार्ग सांगतो किंवा जेव्हा वरील पद्धतीने अभ्यास केला जातो. जेव्हा वरील कामे केली जातात तेव्हा तो मनोसामाजिक मार्गाने केलेला अभ्यास असतो. ही अर्थातच सेवाकार्याची आरंभावस्था असते. (ह्यापैकी काही मुद्यांच्या आधारे अन्य मार्गही अभ्यास करतात असे आढळते.) अभ्यासादरम्यान या मार्गानुसार पुढील कार्ये केली जातात.

i. सेवा घेण्यास येण्यामागील कारणे जाणणे.

ii. कार्यकर्त्याच्या मदतीने उद्देश स्पष्ट करणे.

iii. सेवार्थीच्या वागण्याचा अंदाज लावून संपर्क करणे.

iv. सेवार्थीच्या मनःस्थिती व त्याच्याकडून सेवेचा उपयोग होणे या बाबींचा परस्पर संबंध जाणणे.

v. मनःस्थिती जाणून, बदलाला व मदत स्वीकारण्याला तयार करणे.

vi. प्रत्यक्ष मदतीस सुरूवात करणे.

मनोसामाजिक दृष्टिकोनाचे कार्य करताना येणाऱ्या सुरूवातीच्या टप्प्यातील (intial stage) मुलाखतीमध्ये सेवार्थींशी सहसंबंध प्रस्थापित करणे, सेवार्थीला उपचारात सहभागी करून घेणे, उपचारास सुरूवात करणे, मनोसामाजिक निदान व उपचार करण्यासाठी आवश्यक माहितीचे संकलन करणे ही कार्ये केली जातात. प्रकार्यत्मक मार्ग या अवस्थेत पूर्वतयारीने पुढील कामे घडवली असे नमूद करतो ही कामे करणे म्हणजेच अभ्यास करणे असे हा मार्ग मानतो.

i. वस्तुनिष्ठपणे आत्मपरीक्षण करण्यास सेवार्थीला मदत करणे.

ii. स्वतःला समजण्यास सेवार्थीस मदत करणे.

iii. सेवार्थीच्या सहभागाने कोणती निश्चित सेवा द्यायची हे स्पष्ट करणे.

iv. सेवा देता-देता सेवार्थीबरोबर घटनेला - समस्येला समजून घेणे.

v. जीवनात ज्यावेळी जे उपलब्ध असते ते त्यावेळी वापरण्याची क्षमता निर्माण करणे.

vi. पुढे काय घडणार याची निश्चित माहिती नसल्याने सेवार्थीच्या मनात विशिष्ट भावना असतात. ज्यांचा उपयोग करून बदल-विकासाला चालना देणे.

vii. सुरूवातीच्या वैशिष्ट्यपूर्ण चमत्कारिक काळाचा कल्याणासाठी पुरेपूर उपयोग करणे.

viii. या वैशिष्ट्यपूर्ण काळात कार्यकर्ता माहिती देणे, समजून घेणे, दडपण दूर करणे, प्रोत्साहन देणे, सेवार्थीला सक्रिय करणे इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण कामे करतो.

ix. सेवार्थीच्या सक्रिय सहभागामुळे त्याच्या शक्तीचा-क्षमतांचा उपयोग सामना करण्यात येतो. शक्ती वाया जात नाहीत.

x. समस्येच्या छोट्या भागावर काम करणे.

xi. प्रेमपूर्ण नातेसंबंध जाणीवपूर्वक निर्माण करणे.

अन्य मार्गही अभ्यास असताना यापैकी काही अनेक मुद्यांचा उपयोग करतात असे दिसते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यातील एकात्मक दृष्टीने प्रारंभीच्या अवस्थेची (Induction Phase) चर्चा करा.

## २.३ एकात्मिक दृष्टीने मध्यावस्था (CORE PHASE)

मध्यावस्था ही संपूर्ण सेवाकार्यातील प्रधान अवस्था असते. या अवस्थेत संपूर्ण समाजकार्याने उद्देश प्राप्त होतात. समाजकार्याचे उद्देश हेच या अवस्थेचे उद्देश असतात.

समाजकार्याच्या प्रमुख अवस्थेत म्हणजे मध्यावस्थेत निदान व प्रत्यक्ष मदत ह्या पायर्यांवरील कामे केली जातात. अर्थात येथेही अभ्यास सुरू असतोच, मूल्यांकन घेत

असतेच. सर्व प्रकारच्या सर्व स्तरांवरील सेवार्थीना सेवा देताना ह्या पायर्या महत्त्वपूर्ण असतात.

अभ्यास निदान व मदत ह्या पायर्या परस्परावलंबी व परस्पर पूरक असतात. ह्या पायर्या परस्परांबरोबर चालतात. (म्हणजेच आरंभ, मध्या परस्परांबरोबर चालतात) या प्रत्येक पायरीला अन्य पायर्यांमुळे अर्थ प्राप्त होतो. निदान अभ्यासाच्या आधारे होते म्हणूनच ते अर्थपूर्ण व दिशा देणारे ठरते. निदानासाठी अभ्यासाची गरज असते म्हणून अभ्यासाला महत्त्व असते. मदत ही या अभ्यासावर व त्या आधारे होणाऱ्या निदानावर अवलंबून असते. म्हणून या दोन पाययांवरील अचूकता, मदतीला व मदतीमुळे होणाऱ्या परिणामांना अचूकपणा देते. संपूर्ण समाजकार्य प्रक्रियेत या पायऱ्यांना महत्त्व असते. या पायर्या कामाचा आरंभ व मध्य व शेवट कसा असेल ते ठरवतात.

### २.३.१ एकात्मिक दृष्टीने निदान (Assessment) (Diagnosis) :

एकात्मिक दृष्टीने निदान करताना पुढीलप्रमाणे एकीकरण होऊन सर्व स्तरांवर (व्यक्ती, गट, समुदाय या स्तरावर) कार्य करता येते. अभ्यासल्याप्रमाणे विविध बाबतीत विविध मुद्यांवर भर देऊन होतो, अभ्यास जसा विविध संदर्भासह केला जातो. त्याचप्रमाणे निदानही विविध बाबतीत विविध स्तरांवर केला जातो. निदान ही मानसिक स्तरावर होणारी प्रक्रिया असते. येथे कामाचे मानसिक चित्रण होते. कामाची चौकट स्पष्ट होते. उद्देश स्पष्ट होतात. वास्तव आणि अपेक्षित यातील तफावत स्पष्ट होते. कामाचे स्वरूप व गरजा स्पष्ट होतात. कामाच्या सीमारेषा मर्यादा निश्चित होतात. सेवार्थींच्या गरजेप्रमाणे काम करण्यात निदानाची मदत होते.

स्वतः गरजू हा उत्तम निर्णायक असतो. गरजांचे, कारणांचे, स्वतःच्या भूमिकेतील कमतरताचे, समस्यांचे सर्वात उत्तम निदान स्वतः गरजू करू शकतो व समस्या सोडवण्याच्या सर्वात उत्तम उपाय, उत्तम मार्गही गरजूला माहीत असतो. हा समाजकार्यात विश्वास असतो. सबब सेवार्थींच्या सहभागाने होणारे निदान हे सर्वात उत्तम निदान मानले जाते.

निदान करण्यासाठी अभ्यास महत्त्वाचा असतो. कार्यकर्त्याने योग्य अभ्यास मार्गाने अभ्यास करणे आणि अभ्यास करताना जाणून घेणे - समजून घेणे, आवश्यक असते. या दोन्हींचा मेळ निदान करताना घातला जातो. संपूर्ण माहितीचे एकत्रीकरण करून संकलन करून योग्य माहितीची निवड करून माहितीची व सुसंबद्ध मांडणी करून निदान होते.

समाजकार्याच्या प्रत्येक मार्गात निदानाचे वर्णन दिलेले आहे. कार्यकर्ता यापैकी कोणत्याही किंवा सर्व मार्गांनी निदान करू शकतो. आपण केलेले निदान कोणत्या मार्गाच्या मार्गदर्शनानुसार केले आहे हे कार्यकर्त्याला स्पष्ट असणे आवश्यक असते.

### २.३.२ अ) निदानाचा अर्थ :

एकात्मिक दृष्टीने निदान करताना पुढीलप्रमाणे एकीकरण होऊन सर्व स्तरांवर (व्यक्ती, गट, समुदाय या स्तरावर) कार्य करता येते. अभ्यासल्याप्रमाणे विविध बाबतीत विविध मुद्यांवर

i. विविध गरजांचे - समस्यांचे निदान.

ii. प्रमुख गरज व प्रधान समस्येचे निदान, समस्येच्या कारणांचे, त्या कारणांच्या तसेच समस्येच्या परिणामांचे निदान.

iii. भूमिका व सामाजिक कार्यात्मकतेतील समस्यांचे निदान.

iv. सेवार्थी, त्याचे वागणे, त्याच्या भावना, सामाजिक परिस्थिती, सामाजिक नातेसंबंध यांचे निदान त्याचा अर्थ लावणे.

v. विविध कारणांचे, प्रमुख कारणांचे व कारणांच्या उगमस्थानाचे निदान, वस्तुस्थितीचे निदान.

vi. संभवनीय मदत, मदतीचे स्रोत व मदतीचे संभवनीय परिणाम यांचे निदान.

vii. आवश्यक मदतीचे निदान, उपयुक्त मदत प्रकाराचे निदान.

या सर्व निदानांचा अन्वयार्थ मध्यावस्थेत लावला जातो.

### २.३.३ विविध बाबतीतील निदान व त्या दरम्यानची कार्ये :

निदान म्हणजे पुढील विविध बाबींची निश्चिती करणे होय. निदान क्षेत्रांना पुढील कार्ये होतात. निदान करणारी ही कार्ये अभ्यासही करतात आणि उपचारही करतात हे येथे लक्षात येते. या मुद्यांच्या आधारे निदान करण्याने सर्व ज्ञानमार्गाचा समग्रतेने उपयोग होतो. म्हणजेच एकात्मीकरण होते.

#### १) समस्येच्या संदर्भात निदान :

समस्या काय आहे ती समस्या कशी निर्माण झाली. समस्या कुठे आहे व समस्या सोडवण्यासाठी काय करता येईल? गरजा काय ? त्या का निर्माण झाल्या? त्या का अपूर्ण राहिल्या? त्या कशा पूर्ण कराव्या? का पूर्ण करायच्या व त्या कशा पूर्ण करता येतील? हे निश्चित करणे म्हणजे निदान होय. समस्येची अशी व्याख्या करणे म्हणजे निदान होय.

म्हणजे निदान, अशा रीतीने शोध घेत निदान होते. तसेच मदतीची योजना करण्यात व मदतीची व्यूहरचना करण्यात महत्त्वाच्या असणाऱ्या बाबींचे निदान केले जाते. त्याचबरोबर असणाऱ्या सर्व समस्यांची व गरजांची क्रमवार यादी करून, प्रत्यक्ष कामासाठी त्यातून योग्य समस्यांची - निवड करणे म्हणजे निदान होय.

#### २) गरजांच्या संदर्भात निदान :

अपूर्ण गरजांची अग्रक्रमावर यादी करणे. गरजा पूर्ण कोण करणार? गरजा किती प्रमाणात होऊ शकतील? गरजा कशा पूर्ण करायच्या? त्याचे मार्ग काय? याबाबतीतील मदत, कोणत्या मदत मार्गानुसार (approach) करायची? गरज पूर्ण करण्यासाठी कोणत्या मदत प्रकारचा उपयोग करायचा? हे निश्चित करणे म्हणजे निदान होय. निदान करण्यासाठी ही कार्ये केली जातात.




**https://www.navarashtra.com**

### ३) बदलांच्या संदर्भात निदान :

कोणत्या बाबतीत कोणत्या स्तरावर, कसे, कोणते बदल घडवायचे? कोणते बदल घडू शकतील. बदल कसे घडतील? का घडवायचे? किती बदल होतील? बदल घडवण्यासाठी विविध स्तरांवर कोण-कोणते सहाय्य करायला हवे? कोणकोणती मदत करायची? कोणाला मदत करायची? निवडलेल्या मदतीचा प्रकार काय? मदत कोणत्या ज्ञान मार्गातून/ दृष्टिकोनातून निर्माण होते. हे ठरवणे म्हणजे निदान करणे आणि निदानासंबंधित कार्ये करणे होय.

### ४) विकासाच्या संदर्भात निदान :

कोणत्या बाबतीतील विकास घडणे आवश्यक आहे आणि असा विकास का आवश्यक आहे? आवश्यक क्षेत्रातील विकास किती घडेल? तो कसा-कोणत्या प्रकाराने घडवायचा? या विकासाकरिता कोणती मदत निवडायची? तीच का निवडायची? कोणत्या क्षमतांची निर्मिती करायची / वाढ करायची? का? कशी? याचप्रमाणे कोणत्या गुणांचा, कलांचा, कोणत्या शक्तींचा विकास घडवायचा? कसा? म्हणजेच ज्या समस्यांची उत्तरे शोधायची / ज्या गरजा पूर्ण करायच्या / जे विकास घडवायचे त्यासाठी कोणत्या कृती करायच्या ते निवडणे हे काम कोणत्या प्रकारच्या मदतीने करायचे ही निवड करणे, हीच अशीच निवड करणे, कसे हितावह आहे हे ठरवणे, म्हणजे निदान होय.

### ५) मदतीची निश्चिती :

वरील सर्व ठिकाणी कृतिशील मदत करताना कार्यकर्ता कोणत्या दृष्टिकोनाने (Approach/ Approaches) कोणत्या मदत मार्गाने सेवा देणार, याची निश्चिती करण्याचे, गरजेची मदत, कोणत्या प्रकारची मदत आहे (मदतीच्या वर्गीकरणातून ही निवड करणे) हे निश्चित करण्याचे कार्य करून निदान केले जाते.

### ६) मर्यादांच्या संदर्भात निदान :

सेवार्थीच्या मर्यादा कोणत्या, त्या कशा आणि कोणत्या मदतीने दूर करता येतील? किती प्रमाणात दूर करता येतील? कोणकोणती मदत करता येईल? कोणती करायची, हे निश्चित करणे म्हणजे निदान करणे होय, निदानादरम्यान ही कार्ये केली जातात.

### ७) भूमिकाविषयक निदान :

सेवार्थीच्या सामाजिक कार्यात्मकतेतील (सर्व भूमिकांची गोळाबेरीज म्हणजे सामाजिक कार्यात्मकता Social Functioning) महत्त्वाच्या भूमिका कोणत्या ते ठरवणे, ज्या भूमिकेशी भावनांचा-कर्तव्यांचा व व्यक्तीमत्त्वाचा संबंध असतो. अशा भूमिकेतील कोणत्या क्षेत्रात समस्या आहेत हे ठरवणे, कोणत्या समस्येला सोडवण्यापासून कामाची सुरूवात करायची? हे ठरवणे, म्हणजे निदान होय. एकावेळी एकापेक्षा जास्त भूमिकेतील एकापेक्षा जास्त समस्यांचे निवारण करण्याचे निश्चित केले जाऊ शकते.

### ८) अक्षमतासंबंधी निदान :

सेवार्थीच्या अकार्यक्षमतेची कारणे जाणणे, म्हणजे निदान होय. ही कारणे व्यक्तीगत वातावरण सामाजिक सहसंबंधाच्या जाळयातील सहसंबंधाच्या परस्पर मूल्यांत, परस्पर नातेसंबंधात, आंतरक्रियात, देवाणघेवाणीत, गटात समुदायात असतात. ही नेमकी कारणे कळली की नेमके उपचारही स्पष्ट होतात. सबब अक्षमता आणि कारणे जाणण्याचे कार्य या टप्प्यावर केले जाते.

### ९) चिंतेच्या संदर्भात निदान :

सेवार्थीच्या काळज्या-चिंता-अस्वस्थता (anxiety) यांची कारणे स्पष्ट होणे, ही कारणे भूतकाळात, वर्तमानकाळात की भविष्यकाळात आहेत हे स्पष्ट होणे म्हणजे निदान होय. हे निदान झाल्याने पुढील कार्य सुलभ होते.

### १०) संप्रेषणासंबंधी निदान :

आदानप्रदानातील समस्या निश्चित होणे, त्याची कारणे निश्चित होणे म्हणजे निदान होय. या प्रकारच्या कार्यामुळे परस्परांशी असणाऱ्या वागण्यामागील, परस्पराबद्दलच्या दृष्टिकोनामागील समस्येची कारणे निश्चित होतात, निदान होते.

### ११) नातेसंबंधविषयक निदान :

पुढील विश्लेषण होणे म्हणजे निदान होय. हे निदान करणारी कार्य मध्यावस्थेत घडतात. सामाजिक सहसंबंधाच्या जाळयात सेवार्थीचे स्थान काय? परस्पर नातेसंबंधांची स्थिती कशी आहे? सहसंबंधाची व्यवस्था व सहसंबंधातील अन्य व्यक्ती कशा आहेत? त्याचे सेवार्थाच्या दृष्टीने महत्त्व काय? आंतरक्रियाविषयक निदान काय?

### १२) वातावरणाचे निदान :

वातावरणात कोणत्या लोकांचा अंतर्भाव आहे / येथे काम करताना व्यक्तीचा, कुटुंबाचा इतरांशी असणारा संबंध लक्षात घ्यायचा आहे का? व्यक्ती-कुटुंब यांचा अन्य गटांशी तसेच समुदाय व समाज यांच्याशी असणारा संबंध लक्षात घेण्याची गरज आहे का? इ. बाबी जाणणे म्हणजे निदान होय. या वातावरणांकडून निर्माण होणारी समस्येची कारणे तसेच समस्या सोडवण्यात मिळू शकणारी मदत जाणणे, म्हणजे निदान होय. ही कार्ये करून निदान केले जाते.

**१३) आराखडा तयार करणे, निदान करताना आराखडा तयार करण्याचे कार्य केले जाते :**

अभ्यासातून, समस्यांचे उत्तर शोधण्याच्या हेतूने, विकासाच्या हेतूने, सेवार्थीचे चित्रण करणे आणि ते समजून घेणे म्हणजे निदान होय. याच समस्या दूर करण्यासाठी काय-काय घडायला हवे याची यादी केली जाते. काय केले म्हणजे, कोणी केले म्हणजे - कसे केले म्हणजे, समस्या सुटेल. गरज पूर्ण होईल - प्रगती होईल - बदल होतील - सुधारणा होतील. हे ठरवले की निदान होते. जे व्हायला हवे त्यातील प्रत्यक्षात खरोखर काय होईल - काय होऊ शकते याचा अंदाज घेणे म्हणजे निदान करणे होय.

पर्लमन यांनी निदानाचे पुढील प्रकार सांगितले आहेत.

i. प्रेरक शक्तीचे / चलशक्तीचे / चैतन्याचे निदान - डायनॅमिक डायग्नोसीस (Dynamic/ Diagnosis)

ii. चिकित्सक निदान (क्लिनिकल डायग्नोसीस) – Clinical Diagnosis

iii. वातावरणासंबंधीचे निदान, उत्पत्ती व वाढ याबाबतचे निदान (इटीऑलॉजिकल किंवा जेनेटीक डायग्नोसीस) (Etilogical or Genetic Diagnosis) कारणाचा शोध.

निदानाचे तीन उपयोग ब्रायर व मिलर सांगतात.

i. निदानामुळे समस्येचे वर्गीकरण होते.

ii. निदानामुळे केसचे वेगवेगळे पैलू जाणता येतात. ह्याला डायनॅमिक डायग्नोसीस म्हटले जाते. हे प्रदीर्घ निदान असते.

iii. निदानामुळे मदत करण्याची प्रक्रिया स्पष्ट होते.

या सर्व निदानांचा अन्वयार्थ मध्यावस्थेत लावला जातो.

## २.३.४ निदानाप्रत पोहोचण्याचे टप्पे :

बार्टलेट (Bartlet Hiy) आपल्या “कॉमन बेस ऑफ सोशल वर्क प्रॅक्टिस” या पुस्तकात मूल्यमापन करणाऱ्या व निर्णयाप्रत येण्याच्या पुढील पायर्या मांडतात. योग्य प्रकारे निदान करण्यासाठी या ५ पायर्यांचा अवलंब केला जावा असे ते म्हणतात.

१) घटना घडवणाऱ्या किंवा परिस्थिती निर्माण करणाऱ्या प्रमुख घटकांचे विश्लेषण करणे, त्यांना जाणणे.

२) सर्वात महत्त्वाचे घटक निवडणे, विविध कारणीभूत घटकातील आंतरसंबंध निश्चित करणे व त्यातील अशा बाबींची किंवा घटकांची निवड करणे की ज्या संदर्भात कार्य करायचे आहे.

३) गरजेच्या संदर्भात समाजकार्याचा हस्तक्षेप कुठे व कसा करावा याचा अंदाज घेणे व हा अंदाज घेताना ह्या हस्तक्षेपाचे काय परिणाम होतील हे ठरवणे.

४) कामाच्या / हस्तक्षेपाच्या निश्चित पद्धती निवडणे या चौथ्या पायरीवर हस्तक्षेप करण्यासाठी कोणते मार्ग प्रत्यक्षपणे निवडणार (Care Phase)? कोणत्या पद्धतीच्या उपचारांची निवड होणार? मार्गाचे एकत्रीकरण करणे गरजेचे आहे काय? प्रथम कोणत्या मार्गाचा अवलंब करायचा? हे ठरते. प्रथम कोणती मदत करायची, कोणकोणत्या मदतीची गरज आहे हे ठरते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यातील मध्यावस्थेची (Core Phase) चर्चा करा.

## २.४ एकात्मिक पद्धतीने मदत-उपचार

समाजकार्यात मध्यावस्थेत निदानाबरोबर प्रामुख्याने मदत केली जाते. ह्या दरम्यान अभ्यास ह्या पायरीवरील कामे व मूल्यांकन सातत्याने सुरू असतेच समाजकार्यातील हस्तक्षेपाला, हस्तक्षेपाच्या कृतीला (Interventive action) मदत व विचार अशी संबोधनही वापरली जातात. सेवा देणे ही सर्वात महत्त्वाची पायरी असते. त्यामुळे समाजकार्य सेवार्थीपर्यंत (व्यक्ती गट समुदाय समाज या सेवार्थीपर्यंत) पोहोचते. पायरी समाजकार्याचे प्रत्यक्ष उद्देश साध्य करते. म्हणूनच मदतीला समाजकार्याचा मार्ग (Helping Approach) असेही म्हटले जाते. बदल घडवणाऱ्या मदतीत लाभार्थींचा सक्रिय सहभाग सदा सर्वकाळ घेतला जातो. सेवार्थीचा सहभाग ही मदत करणाऱ्याची पूर्वअट असते.

### २.४.१ मदतीची व्याख्या अर्थ व विविध रूपे :

एकात्मिक दृष्टिकोनाचे जेव्हा मदतीचा विचार विविध स्तरांवर करायचा असतो. हा पुढीलप्रमाणे कार्य केले जाते.

स्मॉले यांनी द थेअरी ऑफ सोशल केस वर्कमध्ये उपचारांची व्याख्या करताना म्हटले आहे की, कोणत्याही व्यक्तीने किंवा गटाने (मोठ्या किंवा लहान) स्वतःच्या कल्याणासाठी व सर्वसामान्यपणे संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सेवेचा केलेला उपयोग म्हणजे उपचार होत. येथे सेवा उपलब्ध करून देणे हे कार्यकर्त्याचे कर्तव्य होते व त्या सेवांचा उपयोग करण्याची जबाबदारी व्यक्तीची - गटांची ठरते. (सेवेपर्यंत पोहोचून) सेवा निवडून सेवांचा लाभ देण्यात व्यक्तीचा/ गटाचा पुढाकार असणे अपेक्षित असते.

### २.४.२ मदत उद्देशपूर्ण असणे :

मदत किंवा उपचार म्हणजे निव्वळ उपाय करणे, बरे करणे, प्रतिबंध करणे नसून ती एक शिक्षित करणारी, त्यातून विकास व बदल घडवणारी, तसेच विचार-भावना व दृष्टिकोनात आमूलाग्र, मूलभूत स्वरूपाचे बदल घडवणारी, नातेसंबंध सुरळीत करणारी, बहुआयामी प्रक्रिया आहे. तिचे निश्चित स्वरूपाचे उद्देश आहेत. ती सल्ला सेवा आहे. ते मार्गदर्शन आहे.




https://social-work.in

समाजकार्यातील अभ्यास निदान आदी पायर्यांचा, सेवार्थी समस्या प्रक्रिया आदी घटकांचा, परस्परांच्या संदर्भात होणारा विचार मदतीला अर्थपूर्ण करतो. मदतीतून विकास घडणे, समस्यांना प्रतिबंध होणे अपेक्षित असते. समाजकार्याच्या सैद्धांतिक ज्ञानाला (व्याख्या, अर्थ, तत्त्व, सिद्धांत, मार्ग इत्यादींना) मानवतेच्या विचारांची जोड देऊन होणारे सेवाकार्य म्हणजे मदत असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यातील एकात्मिक मदत व उपचारांची चर्चा करा.

## २.५ समारोपावस्था (ENDING PHASE) शेवटचा टप्पा

विशिष्ट उद्देशाने समाजकार्याला सुरूवात केल्यानंतर आवश्यक असलेल्या परिस्थितीत बदल झाल्यास किंवा विशिष्ट समस्या संपुष्टात आल्यास समाज कार्यकर्ता आपले कार्य थांबवितो. कारण अपेक्षित असलेले बदल दिसून येतात. अशा वेळी समाजकार्याचा शेवटचा टप्पा म्हणून विशिष्ट स्वरूपाचे कार्य थांबविणे हे अपेक्षित असते.

### २.५.१ मूल्यांकनाचे मार्ग :

ज्यानुसार विचार व्हायला हवे, जे दृष्टिकोन असायला हवे जे विचार असायला हवे. तो कार्यकर्त्याच्या मनी होते का? ते आदर्शापासून किती दूर किंवा आदर्शाच्या किती जवळ होते हे तपासणे म्हणजेच मूल्यांकन होय. आदर्शाप्रमाणे काय, कसे व्हायला हवे? प्रत्यक्षात काय, कसे झाले? व काय कसे होऊ शकते? काय कसे करता येईल? (अपेक्षित) प्रत्यक्ष (शक्यतो) याचा पडताळा घेणे आदर्शपद्धतीने काय होण्यातील राहून गेलेल्या त्रुटी जाणणे म्हणजे मूल्यांकन होय. याबरोबरच उद्देश प्राप्त करण्यासाठी स्वीकारलेल्या कार्यपद्धतीचे, वर्तनाचे, कामादरम्यानच्या नातेसंबंधाचे, कार्यकर्त्यांच्या भूमिकांचे, कार्यक्रमाचे मूल्यांकन होते. होणाऱ्या प्रभावांच्या परिणामाचे मूल्यांकन होते यामुळे आदर्शापासून प्रत्यक्षाचे अंतर या दोन्हींतील तफावत स्पष्ट होऊन पुढील काम दर्जेदार होण्यास अपेक्षित पद्धतीने होण्यास सहाय्य होते. आदर्शापासून प्रत्यक्षाचे, अंतर कळल्यानंतर ते अंतर कमी करण्याच्या दिशेने करण्याचे प्रयत्न लक्षात येतात. त्यासाठी योजना करता येतात. व्यूहरचना आखता येतात. यानंतर त्रुटी दूर होऊन सेवांची परिणामकारकता वाटणे आणि हाच मूल्यांकनाचा अंतिम

हेतु असतो. मूल्यांकन कामादरम्यान पदोपदी होते. त्याचप्रमाणे कामाच्या अगदी शेवटीपण होते. म्हणजे अभ्यास करताना मूल्यांकन होते. निदान व मदत करताना सातत्याने मूल्यांकन होतेच. अशा रितीने शेवटच्या टप्प्याची ही पायरी आरंभाच्या टप्प्यापासून सुरू असते.

मूल्यांकनाच्या या टप्प्यांवर दिलेल्या सेवेची पुन्हा एकदा जाणली जाते. त्या कामांचे परिणाम जाणले जातात. सेवांचे उद्देश व त्यांचा प्रत्यक्ष प्रभाव यांचा ताळमेळ घातला जातो. ज्या उद्देशाने किंवा जे साधण्यासाठी किंवा जे बदल घडविण्याकरिता मदत केली. ते बदल मदतीमुळे घडले का? जे शिकविण्याच्या हेतूने कार्य केले ते शिक्षण झाले का? त्यातून स्वतःच्या जीवनाची उन्नती करण्याच्या क्षमता सेवार्थीत (व्यक्ती, गट, समुदाय या सेवार्थीत) निर्माण झाल्या का? ज्यांची अपेक्षा ठेवून कार्य केले त्या कार्यातून तेच निष्पन्न झाले का? ज्याची अपेक्षा नव्हती असे दिसले का? वाढीव परिणाम प्रभाव दिसेल का? याची पडताळणी केली जाते. कारण कोणत्याही अन्य व्यवसायाप्रमाणे समाजकार्य व्यवसायातदेखील उद्देश समोर ठेवून त्या उद्देशांच्या दिशेने पद्धतशीरपणे टप्पा-टप्प्याने कार्य होते. बदल विकास शिक्षण या प्रती हा व्यवसाय समर्पित असतो. या बाबी साधण्यात व्यवसाय सफल झाला. हे मूल्यांकनातूनच सिद्ध होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यातील समारोप अवस्था विशद करा.

## २.६ सारांश

समाजकार्यात अभ्यास, निदान, उपचार, अनुसरण ह्या चार पायर्या मानल्या जातात. त्या पूर्णपणे वेगळया करता येत नाहीत. सर्व पायर्या एकमेकांबरोबर एकाच विषयाच्या अभ्यासाबरोबरच उपचारांची सुरूवातही होते. अभ्यास व निदान सतत सुरू राहतो.

सुरूवातीच्या टप्पा, मुल्यावस्था व समारोपाचा टप्पा असेही समाजकार्याचे तीन भागांत वर्गीकरण केले जाते. ह्या कार्यात्मक मार्गाप्रमाणेच गोल्डस्टेन यांनी (१९७३) समाजकार्याचे तीन टप्पे मानले आहेत. प्रति स्थापनेचा टप्पा (cinduction) प्रमुख टप्पा (core) व समारोप (ending) पहिल्या टप्प्यात संपर्क होतो. मुख्य टप्प्यात समस्या समाधान होते. माहिती एकत्र होते. कृती घडते. पुनर्विचार, मूल्यांकन होऊन पुढील कृती ठरवली जाते व शेवटच्या टप्प्यात अंतिम मूल्यांकन केले जाते. प्रत्येक टप्प्यावर किंवा पायरीवर विशेष उद्देश व त्यानुरूप कार्ये अपेक्षित असतात. संपर्कावस्था (contact phase), करारावस्था (contract phase), कृतिप्रवणावस्था (action phase) असेही टप्पे संपूर्ण कामाचे सांगता येतात.

समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे. हा व्यवसाय शास्त्रीय ज्ञानावर व मानवी संबंधांच्या कौशल्यांवर आधारित आहे. एखादया व्यक्तीला किंवा गटाला अशी मदत केली जाते, जेणेकरून सामाजिक व वैयक्तिक समाधान निर्माण होऊन स्वावलंबनाची प्रकिया सुरू होईल.

## २.७ स्वाध्याय

- व्यावसायिक समाजकार्याच्या आरंभावस्थेचे विश्लेषण करा.
- समाजकार्याच्या मध्यावस्थेवर टिपण लिहा.
- समाजकार्यातील अवस्थेचे टप्पे सांगा.

## २.८ संदर्भसूची


- डॉ. प्राजक्ता टाकसाळे "एकात्मिक समाजकार्य"
- डॉ. प्राजक्ता टाकसाळे "व्यावसायिक समाजकार्य"
- प्रा. नीलप्रभा लक्कावार (लिळकर) "समाजकार्याची रूपरेखा"
- डॉ. स्फूर्ती कतरणी "मानसशास्त्र समाजकार्याकरिता" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
- प्रा. पुरुषोत्तम खोटे, "समाजकार्याची मुलतत्त्वे"
- भारती सहा "समाजकार्य परिचय"
- Chowdhari, D Paul, Introduction to Social Work, Atmaram and Sons 1964.
- Chowdhari, D. Paul, Handbook of Social Welfare, Atmaram and Sons, Delhi, 66.
- Das G. Advance Sociological Theories Nanu Enterprise Educational Publishers, Delhi 110006.


❖❖❖❖

# ३

# समाजकार्यकर्ता दृष्टिकोन, कौशल्य व तंत्र

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ समाजकार्याची संकल्पना

३.३ समाजकार्यकर्त्यांची संकल्पना

३.४ समाजकार्यकर्त्यांची कार्यपद्धती / स्वरूप

३.५ समाजकार्यकर्त्यांची वैशिष्ट्ये / गुणधर्म

३.६ समाजकार्यकर्त्यांच्या कार्याचे क्षेत्र

३.७ समाजकार्यकर्त्यांचे वर्गीकरण

३.८ समाजकार्यकर्त्यांकडे आवश्यक तंत्रे

३.९ समाजकार्यकर्त्यांकडील आवश्यक कौशल्ये

३.१० समाजकार्यकर्त्यांची भूमिका

३.११ सारांश

३.१२ अधिक माहितीकरिता

३.१३ प्रश्नसंच

## ३.० उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना पुढील बाबी समजतील.

१. समाजकार्याची आणि समाजकार्यकर्त्यांची संकल्पना समजून घेणे.

२. समाजकार्यकर्त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

३. समाजकार्यकर्त्यांच्या विविध कार्यक्षेत्रांचा अभ्यास करून समाजकार्यकर्त्याजवळ आवश्यक असणाऱ्या गुणांबाबत माहिती मिळवणे.

४. समाजकार्यकर्त्याला समाजकार्य करताना आवश्यक असणाऱ्या तंत्राबद्दल व कौशल्याबद्दल माहिती मिळवणे.

५. समाजकार्यकर्त्यांनी समाजकार्यामध्ये असलेली भूमिका समजून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

कल्याणकारी व्यवस्थेत नागरिकांच्या कल्याणाची सर्वस्वी जबाबदारी ही राज्यसंस्थां आणि तिच्या विविध संस्थांवर असते. नव आर्थिक धोरणाच्या काळात राज्यसंस्थां कल्याणकारी भूमिकेतून आणि कार्यक्षेत्रातून बाहेर पडत असली तरी तिथे निर्वात पोकळी निर्माण झाली नाही. राज्यसंस्थेची कल्याणकारी भूमिका बिगर-शासकीय वा स्वयंसेवी संस्थांनी आपल्या खांद्यावर घेतलेली दिसते. त्यांची बांधिलकी, विश्वासार्हता, व्यापकता आणि गुणवत्ता याबाबत बरीच भिन्न मतांतरे व विरोधी असली तरी कल्याणकारी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान दुर्लक्षित करता येणार नाही.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण समाजकार्याची आणि समाजकार्यकर्त्यांची संकल्पना समजून घेणार आहोत. समाजाशी संबंधित समाजविकासाचे कार्य करणारा व्यक्ती म्हणजे 'समाजकार्यकर्ता' अशी समाजकार्यकर्त्याची ढोबळ मनाने व्याख्या केली जाते. समाजकार्यकर्त्यांना समाजातील समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी अनेक स्वरूपाची कार्ये पार पाडावी लागतात. ही कार्ये पार पाडताना त्यांना अनेक कार्यपद्धतीचा वापर करावा लागतो. तसेच कार्य पार पाडण्यासाठी समाजकार्यकर्त्याच्या अंगी मूलभूत अशा स्वरूपाचे गुण असणे आवश्यक आहे. तसेच समाजविकासाची कामे पार पाडताना कार्यकर्त्यांचा विविध प्रकारच्या तंत्राचा आणि कौशल्याचा वापर करावा लागतो. समाजाच्या विकासामध्ये हा कार्यकर्ता महत्त्वाची भूमिका बजावत असतो.

प्रस्तुत प्रकरणामध्ये समाजकार्यकर्त्यांची संकल्पना, समाजकार्यकर्त्यांचे वर्गीकरण, समाजकार्यकर्त्याची कार्यपद्धती, समाजकार्यकर्त्यांकडील आवश्यक गुण, समाजकार्यकर्त्याला आवश्यक असणारी तंत्रे आणि कौशल्य व समाजकार्यकर्त्यांची समाज विकासातील भूमिका यांचा परामर्श घेण्यात आला आहे.

## ३.२ समाजकार्याची संकल्पना (CONCEPT OF SOCIAL WORK)

व्यावसायिक समाजकार्याचा अभ्यास करत असताना ते अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी सर्वप्रथम त्याच्या व्याख्या पाहणे आवश्यक ठरते. समाजकार्याची स्पष्ट व्याख्या करणे कठीण कार्य आहे. समाजकार्याचा विकास सर्व देशांत सारखा नाही.



https://rajkumargoyal.com

समाजकार्य ही मदत करण्याची प्रक्रिया आहे. दुसऱ्यांना मदत करण्याची भावना मानवजातीच्या निर्मितीपासूनच मानवाच्या अंगी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्राचीन काळापासून अनेक व्यक्ती आपल्या क्षमतेनुसार व समाजाच्या आवश्यकतेनुसार दुसऱ्यांना मदत करीत आला आहे. मात्र तेव्हा मदत करण्यामध्ये शास्त्रीयपणा नव्हता. पाश्चात्त्य देशात समाजकार्याचा रीतसर अभ्यास केला आहे. समाजकार्याच्या पद्धती, तंत्र, कौशल्य विकसित केले गेले व एक व्यवसाय म्हणून समाजकार्याला जगासमोर आणले. समाजकार्याची संकल्पना अधिक स्पष्टरीत्या समजण्यासाठी त्याच्या व्याख्यादेखील तयार करण्यात आल्या आहेत.

अभ्यासकांनी आणि विचारवंतांनी समाजकार्याच्या विविध व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **फिंक (१९४२) :** "समाजकार्याचे कार्य समाजाच्या त्या स्थितीचे सृजन करणे आणि व्यक्तीमध्ये त्या क्षमता विकसित करणे आहे. ज्या समाजातील सदस्यांसाठी अधिक चांगले जीवन जगण्याची क्षमता वाढवेल."

२. **Indian Conference of Social Work (1957) :** समाजकार्य ही एक कल्याणकारी क्रिया आहे. जी मानवी सेवा, तत्त्वज्ञान, वैज्ञानिक ज्ञान आणि तांत्रिक कौशल्यावर आधारित आहे. ज्यांचा उद्देश व्यक्ती, समूह व समुदायाला मदत करणे हा आहे. ज्यामुळे ते एक सुखी आणि संपूर्ण जीवन जगू शकतील.

३. **National Association of Social Workers (1970) :** "Social work is the proffessional activity of helping individuals, groups of communities to enhance of restore their capacity for social functioning & to create social conditions favourable to their goals."

४. **मुर्थी आणि राव (१९७०) :** समाजकार्य ती मदत आहे जी मानसिक, शारीरिक आणि संवेगात्मक किंवा नैतिक निर्योग्यताने पीडीत आहे. ज्याद्वारा व्यक्ती किंवा समूह आपली स्वतःची स्वयंसहाय्यता करण्यायोग्य होईल.

उपरोक्त व्याख्यावरून स्पष्ट होते समाजकार्य हे व्यावसायिक मदत कार्य आहे ज्याचा उद्देश व्यक्ती, समूह आणि समुदायांच्या क्षमतांचा विकास करते आणि त्यांना संघटित करणे आणि उद्देशांच्या पूर्ततेकरता अनुकूल सामाजिक परिस्थिती निर्माण करणे होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यावसायिक समाजकार्याची संकल्पना स्पष्ट करा.

## ३.३ समाजकार्यकर्त्यांची संकल्पना

"समाजाशी संबंधित समाजविकासाचे कार्य करणारा व्यक्ती म्हणजे समाजकार्यकर्ता होय." अशी ढोबळमानाने समाजकार्यकर्त्याची व्याख्या केली जाते. व्यावसायिक समाजकार्यकर्ता ही संकल्पना त्यापेक्षा वेगळी आहे. व्यावसायिक समाजकार्याचे विशेष प्रशिक्षण घेतलेला व्यक्ती हा 'व्यावसायिक समाजकार्यकर्ता' समजला जातो.

## ३.४ समाजकार्यकर्त्यांची कार्यपद्धती / स्वरूप



समाजामध्ये समस्या सोडविताना समस्येचे स्वरूप पाहून समाजकार्यकर्त्याला कार्य करावे लागते. समाजकार्यकर्त्यांना बऱ्याचदा एका वेळेस समस्येची सोडवणूक करण्यास विविध पद्धती वापराव्या लागतात. समाजकार्यकर्त्याच्या कार्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल. यालाच समाजकार्यकर्त्याच्या कार्यपद्धती असे देखील म्हणतात.

१. **निदानात्मक :** समाजकार्यकर्ता समाजामध्ये कार्य करत असताना समाजातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत असतो. समुदायातील समस्यांची सोडवणूक करताना कार्यकर्ता सर्वप्रथम समस्येचे मूळ शोधतो. म्हणजेच ही समस्या का व कशामुळे निर्माण झाली याचे कारण शोधतो आणि कारणाचे निदान करतो. समाजकार्यकर्त्याच्या समस्येमागील कार्यकारण भाव शोधण्याच्या आणि त्या समस्यांच्या कारणांचे निदान करण्याच्या कार्यालाच निदानात्मक कार्य असे म्हणतात.

२. **उपचारात्मक :** समस्येचे कारण नेमकेपणाने कळाल्यानंतर समाजकार्यकर्ता ती समस्या नष्ट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो. समाजातील तात्पुरता किंवा समूळ नाश करण्यासाठी कार्यकर्ता अनेक उपाय सुचवितो आणि या उपायांद्वारे समस्या सोडवितो. म्हणजेच समाजकार्यकर्त्याचे कार्य 'उपचारात्मक' स्वरूपाचे असते.

३. **प्रतिबंधात्मक :** समस्यावर उपाय शोधून ती नष्ट केली तरी ती समस्या समाजामध्ये पुन्हा उद्भवणारच नाही याची शाश्वती नसते. परिणामतः समाजकार्यकर्ता समस्या समुदायात पुन्हा पुन्हा निर्माण होऊ नये याकरता जनजागृतीचे कार्य करतो आणि अशा प्रकारचे उपाय सुचवितो की जेणेकरून ती समस्या समाजामध्ये पुन्हा उद्भवणार नाही. समाजकार्यकर्त्याचे हे कार्य 'प्रतिबंधात्मक' स्वरूपाचे असते.

४. **पुनर्वसनात्मक :** समस्येवर उपचारात्मक स्वरूपाचे कार्य समाजकार्यकर्ता करतो. एखाद्या समस्येमुळे त्या समस्येशी संबंधित असलेल्या व्यक्तींचे किंवा व्यक्तीसमुदायाचे जीवन संपूर्णपणे विस्कळीत होते. अशा व्यक्तींचा किंवा व्यक्तीसमूहाच्या पुनर्वसनाच्या दृष्टिकोनातून समाजकार्यकर्ता कार्यरत असतो. समस्याग्रस्त व्यक्तींचे व व्यक्ती समुदायांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने कार्यकर्त्यामार्फत केले जाणारे कार्य हे पुनर्वसनात्मक स्वरूपाचे असते.

५. **संशोधनात्मक :** एखादी समस्या उद्भवल्यानंतर त्या समस्येसंदर्भात व समस्येचे बाधित व्यक्ती व व्यक्तीसमूहाबद्दल माहिती मिळवण्याकरता समाजकार्यकर्त्याला संशोधन करणे गरजेचे असते. समस्येसंदर्भात आकडेवारी गोळा करणे, समस्येचे प्रमाण तपासणे यांसारख्या कार्यातून कार्यकर्त्याला समस्येच्या निर्मुलनासाठी किंवा उच्चाटनासाठी योग्य प्रयत्न करता येतात. संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षातून अनेक सूचना किंवा शिफारशीसंबंधित विभागाला समाजकार्यकर्ता सुचवू शकतो. त्याचे हे कार्य संशोधनात्मक स्वरूपाचे असते.

अशा प्रकारे समाजकार्यकर्ता निदानात्मक, उपचारात्मक, प्रतिबंधात्मक, पुनर्वसनात्मक, संशोधनात्मक स्वरूपाचे कार्य करतो. वर नमूद केलेल्या पद्धतीपैकी केवळ एखादीच पद्धत समाजकार्यकर्ता वापरतो असे नाही. बऱ्याचदा कार्यकर्त्याला एकाच वेळेस अनेक पद्धतींचा वापर करावा लागतो. समस्यांची सोडवणूक करताना समाजकार्यकर्त्याला प्रत्यक्ष व अ प्रत्यक्षपणे एकाच वेळेस सर्व पद्धतीचा वापर करणे अनिवार्य असते. कारण एखाद्या व्यक्तीचा समस्येमुळे तो स्वतः कुटुंब व समुदाय प्रभावित होतो त्यामुळे समाजकार्यकर्त्याला व्यक्तीची समस्या सोडवण्याकरता सर्व पद्धतीचा अवलंब करावा लागतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यकर्त्याची कार्यपद्धती सांगा किंवा समाजकार्यकर्त्याच्या कार्याचे स्वरूप विशद करा.

## ३.५ समाजकार्यकर्त्यांची वैशिष्ट्ये / गुणधर्म

समाजामध्ये 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' असतात. या वेगवेगळया प्रवृत्ती असलेल्या लोकांसोबत समाजकार्यकर्त्याला कार्य करायचे असते. समाजकार्यकर्त्याचा लोकांशी प्रत्यक्ष संबंध येतो. समाजकार्यकर्त्याला व्यक्तीसोबत, गटासोबत, समुदायासोबत कार्य करावे लागते. समाजात जागृती घडवण्यासाठी, शासनाच्या योजना समुदायात पोहचविण्यासाठी, व्यक्तीच्या समस्या सोडवण्यासाठी, गटाद्वारे गटाचा विकास साधण्यासाठी समाजकार्यकर्त्याला समाजाशी सातत्याने संबंध प्रस्थापित करावे लागतात. योग्य पद्धतीने कार्य करण्यासाठी आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाजकार्यकर्त्याच्या अंगी काही गुण आवश्यक असतात.

अमेरिकेतील 'विस्कॉनसिल' विद्यापीठाच्या कार्यशाळेने १९४६ मध्ये विस्तार कार्यकर्त्याच्या अंगी कोणकोणते गुण असावेत याची सूची दिली होती. त्यानुसार दूरदर्शिता, नियोजन क्षमता, कार्य सुरू करण्याची शक्ती, साधनसंपत्ती, सत्यनिष्ठा, विश्वास, साहस, न्यायप्रियता, चिकाटी, चतुरता, वक्तव्य इ. गुण समाजकार्यकर्त्याकडे आवश्यक आहेत.

समाजकार्यकर्त्याचे गुण पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. समाजकार्यकर्ता हा लोकांशी व्यवस्थितरीत्या व प्रभावीपणे कार्य करण्यासाठी लोकांच्या समस्या समजून घेणारा असावा. ज्या क्षेत्रात तो कार्यरत आहे. त्या क्षेत्राची त्याला संपूर्ण माहिती असावी.

२. ज्या लोकांसोबत, गटासोबत, समुदायासोबत काम करत आहे तिथल्या समस्या, संस्कृती, त्यांची भाषा, याची माहिती समाजकार्यकर्त्याला असणे आवश्यक आहे.

३. समाजकार्यकर्ता हा कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीत समायोजन साधणारा असावा.

४. समाजकार्यकर्ता प्रामाणिक, मनमोकळया स्वभावाचा, मेहनती व उच्च बुद्धीगुणांक असलेला हवा.

५. समाजकार्यकर्त्याला आपल्या कार्याविषयी त्याला जबर आत्मविश्वास असायला हवा तसेच योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्या अंगी असावी.

६. कार्यकर्ता लोकांच्या सुख-दुःखात सहभागी असणारा असावा.

७. समाजकार्यकर्त्याच्या कार्याचे स्वरूप दिखाऊ नसावे तो आपल्या कार्याशी प्रामाणिक असावा.

८. निश्चित केलेले उद्देश साध्य करण्यासाठी तो दृढ निश्चयी असावा. उद्देश साध्य करण्यासाठी त्याने सर्व दिशेने प्रयत्न करायला हवे.

९. समाजकार्यकर्ता संशोधक वृत्तीचा असावा.

१०. आपल्या कार्यात वक्तशीर राहून लोकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणारा असावा.

११. आपल्या कार्याला अधिक गती देण्यासाठी तो उत्साही असावा.

१२. समुदाय विकासाची क्षमता त्यामध्ये असावी. योजना तयार करून अंमलबजावणी करण्याची क्षमता त्याच्यात असावी.

१३. कार्य करत असताना विविध संस्थां, संघटना, समुदाय व लोक यांच्यामध्ये त्याला योग्य रीतीने समन्वय साधता आला पाहिजे.

१४. कठीण परिस्थितीला धैर्याने तोंड देणारा, संकटातून मार्ग काढणारा, सहकारी वृत्तीचा असावा.

१५. तो विनयशील, सभ्य, सुसंस्कृत व शांत स्वभावाचा व लोकांचा मित्र असावा तो स्वार्थी नसावा.

१६. लोकांचा अनादर न करता त्यांचे प्रथम ऐकून घेणारा आणि त्यांच्या समस्यांवर विचार करून लोकांच्याच मदतीने उपाय शोधून समस्या सोडविण्यास मदत करणारा असावा.

१७. तो सेवाभावी वृत्तीचा व दुसऱ्यांच्या प्रती मदतीची भावना ठेवणारा असावा.

१८. स्थानिक पुढाऱ्यांमार्फत कार्य करणारा व लोकांना मार्गदर्शन करणारा असावा.

१९. आपले मत समोरच्यावर न लादता समोरच्या व्यक्तीचे ऐकून घेणारा असावा.

२०. वेगवेगळया तंत्राचे, कौशल्याचे ज्ञान व त्या तंत्रकौशल्याचा वापर योग्य त्या ठिकाणी करण्याचे ज्ञान त्याला असावे.

२१. नेतृत्त्व विकासाला चालना देणारा व नवीन ज्ञानाद्वारे समाजविकास घडवून आणणारा असावा.

२२. आपल्या विषयाचे सखोल ज्ञान ठेवणारा, ज्ञान विस्तृत, अत्याधुनिक ठेवण्याकरता साहित्य वाचून, संशोधकांना भेटून, प्रशिक्षण घेऊन, नवीन कल्पना व ज्ञान आत्मसात करून ज्ञानात सातत्याने भर घालणारा असावा.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यकर्त्याची वैशिष्ट्ये किंवा गुणधर्म सांगा.

## ३.६ समाजकार्यकर्त्यांच्या कार्याचे क्षेत्र

समाजकार्यकर्त्याला समाजात वेगवेगळया वयाच्या, लिंगाच्या, धर्माच्या, वेगवेगळया मनोवृत्तीच्या, वेगवेगळया समस्यांनी ग्रस्त असलेल्या, वेगवेगळया भागात राहणाऱ्या, वेगवेगळी भाषा बोलणाऱ्या, वेगवेगळया स्तरांतील लोकांसोबत कार्य करायचे असते. या सर्व विभाजनावरून समाजकार्यकर्त्याच्या कार्याचे क्षेत्र ठरवले जाते. समाजकार्यकर्त्याच्या कार्याचे क्षेत्र पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. बाल कल्याण (Child Welfare)

२. महिला कल्याण (Women Welfare)

३. युवा कल्याण (Youth Welfare)

४. अपंग कल्याण (Welfare of Disabled)

५. वृद्ध कल्याण (Welfare of Aged)

६. समुदाय विकास (Community Development)

७. श्रम कल्याण (Welfare of Labour)

८. अपराध सुधार प्रशासन (Criminology & Correctional Administration)

९. शालेय समाजकार्य (School Social Work)

३. वैद्यकीय व मानसोपचार (Medical & Psychiatric)

११. मागास आणि दुर्लक्षित घटक (Vulnerable Group)

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यकर्त्याच्या कार्यक्षेत्रांविषयी चर्चा करा.

## ३.७ समाजकार्यकर्त्याचे वर्गीकरण

प्रशिक्षण, कार्यक्षेत्र, लिंग, विशेष कुशलता, इत्यादींच्या आधारे समाजकार्यकर्त्याचे वर्गीकरण केले जाते. Youngly यांनी 'Social action and Social Work' या आपल्या पुस्तकात समाजकार्यकर्त्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

१. रूढीबद्ध कार्यकर्ता (Stereo type)

२. अलिप्त राहणारा कार्यकर्ता (Fencerider)

३. प्रपोगंडा करणारा (Propogandist)

४. उदारमतवादी (Liberal)

**समाजकार्यकर्त्याच्या कार्याच्या आधारेदेखील वर्गीकरण करता येते :**

१. व्यक्ती सहाय्यकर्ता (Case Worker)

२. गटकार्यकर्ता (Group Worker)

३. समुदाय संघटक (Community Organiser)

४. संशोधक (Researcher)

५. प्रशासक (Administrator)

६. सक्रिय कार्यकर्ता (Activist)

**लिंगाच्या आधारे समाजकार्यकर्त्याचे वर्गीकरण :**

१. स्त्री समाजकार्यकर्ता

२. पुरुष समाजकार्यकर्ता

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यकर्त्यांच्या वर्गीकरणावर टीप लिहा.

## ३.८ समाजकार्यकर्त्यांकडे आवश्यक तंत्रे

समाजामध्ये व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. या वेगवेगळया प्रवृत्ती असतात. या वेगवेगळया प्रवृत्ती असलेल्या लोकांसोबत समाजकार्यकर्त्याला कार्य करायचे असते. एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात काम करत असताना त्या व्यक्तीकडून, गटाकडून व समुदायाकडून योग्य प्रतिसाद मिळवणे आवश्यक असते. हा प्रतिसाद मिळविण्यासाठी समाजकार्यकर्त्याला काही तंत्र आवश्यक असतात व प्रतिसाद मिळवण्यासाठी समाजकार्यकर्त्याला विविध तंत्राचा व कौशल्याचा वापर करावा लागतो.

**तंत्र (Techniques) :** अमेरिकन असोसिएशन ऑफ सोशल वर्कर्सने व्यक्तीसहाय्य करताना वापरण्यात येणाऱ्या तंत्रांचे एकूण सात गट गेले आहेत.

१) सेवार्थ्यावरील तणाव दूर करण्यासाठी वापरण्यात येणारी तंत्रे.

२) सेवार्थीचे मूळ मुद्याकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी वापरण्यात येणारी तंत्रे.

३) सेवार्थ्याला अडचणीच्या, नकोशा वाटणाऱ्या पण अढळ असणाऱ्या बाबी स्वीकारायला लावण्यासाठी वापरण्यात येणारी तंत्रे.

४) सेवार्थीकडून संरक्षण तंत्रांचा होणारा वापर रोखण्यासाठी व टाळण्यासाठी वापरायची तंत्रे.

५) सेवार्थीच्या निर्णयांना प्रभावित करण्यासाठी वापरली जाणारी तंत्रे.

६) सेवार्थीला विचार करण्यास, विश्लेषण करण्यास, सावरण्यास, निर्णयाप्रत येण्यास, कृती करण्यास, विचार व्यक्त करण्यास लागणारा वेळ समजून घेण्यास वापरण्यात येणारी तंत्रे.

७) सेवार्थीला अडचणीच्या काळात उभारण्यासाठी, मदत करण्यासाठी वापरण्यात येणारी तंत्रे.

वरील गटवारीवरून लक्षात येते की, मुलाखत घेताना सेवार्थ्यासोबत अथवा अशिलासोबत संबंध प्रस्थापित करण्यासाठी तंत्रांचा उपयोग होतो. एर्ल सॅल्सबेरी यांनी वरील सात प्रकारच्या गटातील तंत्रांची यादी पुढीलप्रमाणे दिली आहे.

१) सेवार्थ्याच्या परिस्थितीचे गांभीर्य शक्य तितके कमी करणे.

२) समस्येची तीव्रता कमी करणे.

३) समस्येचे स्वरूप लहान व सौम्य करणे.

४) सेवार्थीवरील दबाव कमी करणे.

५) आनंदी वातावरण तयार करणे.

६) स्पष्टीकरण देणे.

७) वस्तुस्थिती स्पष्टपणे मांडणे.

८) संभाव्य परिणामांचे पूर्वानुमान लावणे.

९) संरक्षण यंत्रणेचा वापर करण्यापासून रोखणे.

१०) बोलण्याच्या माध्यमातून अधिकार प्रस्थापित करणे.

११) घाईने निर्णय घेण्यापासून थोपविणे.

१२) मिळालेल्या माहितीचा उपयोग करून घेणे.

१३) सेवार्थ्याकडून मिळालेल्या माहितीची तपासणी करणे.

१४) सेवार्थ्याकडून खरी माहिती काढून घेणे.

तंत्रे ही सेवार्थीवरील ताण कमी करण्यासाठी मदत करतात. सेवार्थीला मुख्य मुद्याकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी मदत करतात. अवघड गोष्टी स्वीकारण्यास सेवार्थीला मदत करताना सेवार्थीला संरक्षण यंत्रणा वापरण्याची गरज भासणार नाही. असे वातावरण निर्माण करतात. काही तंत्राचा वापर निर्णयांना प्रभावित करण्यासाठी केला जातो. मुलाखतीमध्ये सहजता निर्माण करण्यासाठी काही तंत्रे वापरली जातात. तर काही तंत्रे सेवार्थीला समजून घेण्यासाठी वापरली जातात.

सेवार्थीकडून योग्य माहिती, प्रतिसाद मिळवण्यासाठी व त्याची समस्या योग्य रीतीने हाताळण्यासाठी व्यावसायिक समाज कार्यकर्ता सेवार्थीला माहीत नसणारी माहिती उपलब्ध करून देतो. त्याला नेमक्या मुद्यांपर्यंत पोहचण्यासाठी मदत करतो. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये

कार्यकर्ता शाब्दिक आणि अशाब्दिक तंत्रांचा वापर करून सेवार्थीचा प्रतिसाद मिळवत असतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यकर्त्याकडे आवश्यक असणाऱ्या तंत्रांवर टिप्पण लिहा.

## ३.९ समाजकार्यकर्त्यांकडील आवश्यक कौशल्ये

समाजकार्यकर्त्याला समुदायात कार्य करत असताना व्यक्तीसहाय्य कार्य, गट, कार्य, समुदाय संघटन, सामाजिक संशोधन, सामाजिक प्रशासन व सामाजिक क्रिया या पद्धतीच्या वापरात अनेक कौशल्याचा उपयोग करावा लागतो. बरीच कौशल्ये समानतेने सगळीकडे वापरली जातात आणि प्रत्येक पद्धतीत काही विशेष कौशल्ये वापरावी लागतात. परिस्थितीनुसार वेगवेगळया कौशल्याचा वापर समाजकार्यकर्ता करत असतो. एकापेक्षा जास्त किंवा अनेक कौशल्यांचा एकत्रित उपयोग समाजकार्यकर्त्याला करावा लागतो. समाजकार्यकर्ता पुढील कौशल्याचा वापर वेळोवेळी करत असतो.

१) ऐकून घेण्याचे कौशल्य

२) संवाद साधण्याचे कौशल्य

३) संघटन कौशल्य

४) मत मांडण्याचे किंवा पटवून देण्याचे कौशल्य

५) योग्य निर्णय घेण्याचे कौशल्य

६) नेतृत्त्व कौशल्य

७) निरीक्षक कौशल्य

८) लोकांकडून काम करून घेण्याचे कौशल्य

९) वेळेचा सदुपयोग करण्याचे कौशल्य

१०) उपलब्ध साधनांचा वापर करण्याचे कौशल्य

११) अहवाल लेखनाचे कौशल्य

१२) सादरीकरणाचे कौशल्य

## ३.१० समाजकार्यकर्त्याची भूमिका

समाजामध्ये कार्य करत असताना समाजकार्यकर्त्याला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. भूमिका पार पाडत असताना समाजकार्यकर्ता कौशल्य, तंत्र, ज्ञान यांचा वापर करतो. कार्यकर्त्याचा दृष्टिकोन, मूल्य, दर्जा, क्षमता, विचार, व्यक्तीमत्त्व, सराव, ज्ञान त्याची प्रगल्भता यांचा भूमिकांवर प्रभाव पडतो. कार्यकर्त्याचा दर्जा, गुणवत्ता, गुणवैशिष्ट्ये, उद्देश या बाबी त्याची भूमिका निश्चित करतात.

समाजकार्यकर्त्याच्या वेगवेगळ्या तज्ज्ञांनी समाजकार्यकर्त्याच्या भूमिकांच्या संदर्भात आपले मत प्रतिपादित केले आहे. अभ्यासकांनी आणि विचारवंतांनी समाजकार्यकर्त्याच्या भूमिका पुढीलप्रमाणे विशद केल्या आहेत.

- शोधणारा
- वकील
- मूल्यांकन करणारा
- प्रसारक, विस्तारक
- साधने एकत्र करणारा
- सल्लागार
- संशोधक
- काळजी घेणारा

'चार्लस ग्रोसेर' यांनी समुदायात कार्य करताना समाजकार्यकर्त्याच्या पुढील भूमिका सांगितल्या आहेत.

- सामर्थ्यदाता
- सक्रिय कृतिप्रवण
- वकील
- दलाल

'बिस्नो' यांनी समाजकार्यकर्त्याच्या नऊ भूमिका सांगितल्या आहेत.

- प्रतिपक्षी
- सलोख्याची भूमिका
- विकासात्मक
- पुनर्रचना करणारी भूमिका
- सोय उपलब्ध करून देणारा
- ज्ञानवृद्धी व ज्ञानाची चाचणी करणारी भूमिका
- शिस्त लावणारी भूमिका
- नियम कायदे यांची अंमलबजावणी करणारी भूमिका
- नियम बनवणाऱ्यांची भूमिका

समाजकार्यकर्त्याला विविध स्तरांवर एकाच वेळी भूमिका वापराव्या लागतात. सर्व तज्ज्ञांनी सांगितलेल्या भूमिका लक्षात घेता समाजकार्यकर्त्याच्या सर्वसामान्य भूमिका पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **मदतगार (Helper) :** समाजकार्यकर्ता हा नेहमी मदतीला तत्पर असायला हवा. गरजू व्यक्तीला मदतीची केव्हाही गरज पडू शकते. अशा वेळेस कोणत्याही प्रकारची टाळाटाळ न करता समाजकार्यकर्ता मदतगार (Helper) म्हणून भूमिका बजावत असतो.

२) **सामर्थ्यदाता (Enabler) :** समाजकार्यकर्त्याच्या अंगी मदत करण्याचे सामर्थ्य असायला हवे. आवश्यक त्या सर्व बाबींची माहिती त्याला असणे गरजेचे आहे. जेणेकरून तो गरजू व्यक्तींना पाहिजे ती माहिती पुरवू शकतो किंवा त्याला माहितीचे स्रोत माहीत असणे आवश्यक आहे. जेणेकरून तो माहिती संबंधित स्रोतांकडून मिळवून संबंधित अशिलाला मदत करू शकतो. समाजकार्यकर्त्याला समुदायामध्ये 'सामर्थ्यदात्यां'ची भूमिका पार पाडावी लागते.

३) **प्रोत्साहक (Encourager) :** 'समाजकार्यकर्ता' हा नेहमी प्रोत्साहन देणारा असायला हवा. त्याला प्रोत्साहक म्हणून भूमिका पार पाडायची असते. कार्यकर्त्याला सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करून समोरच्या व्यक्तीला निराश न करता नैराश्यातून बाहेर काढायचे असते. या करता समाजकार्यकर्त्याला अशिलाला सतत प्रोत्साहन द्यावे लागते. अशा प्रकारे समाजकार्यकर्ता प्रोत्साहकाची भूमिका पार पाडत असतो.

४) **मार्गदर्शक (Guide) :** 'समाजकार्यकर्ता' हा नेहमी मार्गदर्शक असतो. नेमक्या कोणत्या दिशेने व्यक्तीला कार्य करायचे आहे. कोणता मार्ग निवडायचा आहे याचे मार्गदर्शन समाजकार्यकर्ता करत असतो. एखाद्या बाबीसाठी अनेक पर्याय समोर असले तर व्यक्ती गोंधळतो. तेव्हा सर्व पर्यायांचे गुणदोष सांगून योग्य पर्याय निवडण्यास तो समस्याग्रस्त व्यक्तीला सक्षम बनवितो. याबाबतीत समाजकार्यकर्ता मार्गदर्शकाची भूमिका पार पाडत असतो.

५) **सुलभीकरणकर्ता (Facilitator) :** समाजकार्यकर्ता एखादी कठीण असणारी बाब सोपी करून आपल्या अशिलापर्यंत पोहोचवितो. एखादी अवघड प्रक्रिया सोपी करून समाजाला समजेल, उमजेल अशा सोप्या भाषेत त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे कार्य समाजकार्यकर्ता करतो. समाजकार्यकर्ता सुलभीकरण करून समुदायापर्यंत आवश्यक ती माहिती पोहोचविण्याचे, समस्या हाताळण्याचे कार्य करतो.

६) **शिक्षक (Teacher) :** समाजकार्यकर्ता हा एक शिक्षकदेखील असतो. तो अनेक गोष्टींचे ज्ञान समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य करत असतो. एका शिक्षकाजवळ असणारे सर्व गुण समाजकार्यकर्त्याजवळ असणे आवश्यक आहेत. विविध गोष्टींचे ज्ञान समाजापर्यंत पोहचविताना समाजकार्यकर्ता 'शिक्षकाची' भूमिका बजावत असतो.

७) **संशोधक (Researcher) :** समाजकार्यकर्त्याला समुदायात 'संशोधक' म्हणून भूमिका पार पाडावी लागते. एखाद्या घटनेची, स्थितीची, समस्येची यथार्थ माहिती पुरविण्यासाठी समाजकार्यकर्त्याला सांख्यिकीय दृष्टिकोनातून माहिती मिळवावी लागते. अशा वेळेस समाजकार्यकर्ता संशोधक म्हणून भूमिका पार पाडत असतो.

८) **प्रशासक (Administrator) :** बऱ्याच वेळा समाजकार्यकर्त्याला अनेक व्यक्तींसोबत कार्य पार पाडावे लागते. अशा वेळेस अनेक व्यक्तींसोबत काम करत असताना त्याला सर्वांकडून योग्य पद्धतीने काम करून घेण्यासाठी समाजकार्यकर्त्याच्या अंगी प्रशासकाचे गुण असणे अतिशय आवश्यक असते. अनेक लोकांकडून काम करून घेताना समाजकार्यकर्ता प्रशासकाची भूमिका बजावतो.

९) **पर्यवेक्षक (Supervisor) :** 'समाजकार्यकर्ता' हा समाजात सातत्याने पर्यवेक्षण करत असतो. जेणेकरून तो आपल्या कार्यात निर्णय घेताना त्याच्या निरीक्षणात आलेल्या बाबींचा तो योग्य उपयोग करून घेऊ शकेल. निर्णयातील महत्त्वाचा आधार म्हणून परिस्थिती, घटनांकडे पाहिले जाते. त्यामुळे अनेक बाबींमधील बारकावे समाजकार्यकर्त्याला माहीत असणे आवश्यक असते. पर्यवेक्षणाच्या माध्यमातून कार्यकर्ता अनेक बाबी जाणून घेतो. अशा प्रकारे समाजकार्यकर्ता समाजात कार्य करत असताना पर्यवेक्षकाची भूमिका पार पाडतो.

१०) **उपचारक (Therapist) :** 'समाजकार्यकर्ता' हा 'उपचारक' देखील असतो. तो नेहमी समस्येचे कारण शोधून ती समस्या सोडविण्याच्या दिशेने प्रयत्न करतो ती समस्या पुन्हा तयार होणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करतो. ती समस्या हाताळण्यास संबंधित व्यक्तीला सक्षम बनवतो. समाजकार्यकर्त्याला 'उपचारकाची' भूमिका निभवावी लागते.

११) **संघटक (Organiser) :** समाजकार्यकर्त्याला समुदायातील लोकांमध्ये काम करावे लागते. त्यामुळे त्याला समाजाची बांधणी कशी करायची याचे ज्ञान अवगत असणे आवश्यक असते. यासाठी समाजकार्यकर्ता उत्तम 'संघटक' असायला हवा. 'समाज' हा विविध धर्मात, पंथात, भाषेत आणि आर्थिक स्तरांमध्ये विभागलेला असतो. वेगवेगळया चालीरीती पाळणारे, विविध समस्यांनी ग्रस्त असलेले, विविध विचारसरणीचे लोक समुदायात असतात. समुदायात काम करत असताना विविध प्रकारच्या लोकांना सांभाळून घेऊन काम करावे लागते. त्याचप्रमाणे विविध प्रकारच्या संघटना तयार करण्यासाठी, संघटनेत काम करण्यासाठी, समाजकार्यकर्ता हा उत्तम संघटक असणे आवश्यक असते. 'संघटकाच्या' भूमिकेतून तो समुदायाचा विकास समुदायामार्फत योग्य पद्धतीने करू शकतो.

१२) **सक्रिय कार्यकर्ता (Activist) :** एखाद्या बाबीसंबंधी समुदायात जनजागृती करण्यासाठी त्या समस्येला योग्य न्याय मिळेपर्यंत समाजकार्यकर्त्याला सातत्याने सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्य करावे लागते. बऱ्याच वेळा सक्रिय कार्यकर्ता हा व्यावसायिक कार्यकर्ता असतातच असे नाही. परंतु जर व्यावसायिक

समाजकार्यकर्त्याने सक्रिय कार्यकर्त्याची भूमिका पार पाडली तर तो अधिक प्रभावी ठरू शकतो.

उपरोक्त भूमिकांसोबतच समाजकार्यकर्ता व्यक्तीसहाय्य कार्यकर्ता व गटकार्यकर्ता संरक्षक, वकील यांसारख्या भूमिका बजावीत असतो. अनेक वेळा समाजकार्यकर्त्याने एका वेळेस अनेक भूमिका बजवाव्या लागतात. विविध परिस्थितीनुसार समाजकार्यकर्त्याच्या भूमिका वेगवेगळया असू शकतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यकर्त्यांची भूमिका विशद करा.

## ३.११ सारांश

समाज कार्यकर्त्याला बहुविध प्रकारची कार्ये करायची असतात. त्याच्याकडून करण्यात येणाऱ्या कामानुसार त्याच्या भूमिका निश्चित होतात. यामध्ये मदतकर्त्यांची भूमिका, शिक्षकाची भूमिका, पुरस्कर्त्यांची भूमिका, तंज्ज्ञांची भूमिका, योजनाकाराची भूमिका, तसेच सामाजिक आंदोलकाची भूमिका, गट सहाय्यकर्त्यांची भूमिका, संशोधनकर्त्यांची भूमिका यांचा अंतर्भाव होतो. या भूमिका पार पाडत असताना कार्यकर्त्याला विविध क्षेत्रांत कार्य करावे लागते. समाजकार्यकर्ता म्हणून कार्यकर्त्याची विचारांची पद्धत, वागण्याची पद्धत, एकाच प्रकारची असते. समाजकार्य शिक्षणातून निर्माण झालेले विचार, भावना, कौशल्ये व तंत्रे यांच्या सहाय्याने समाजकार्यकर्ता आपल्या अनेक भूमिका पार पाडत असतो.

## ३.१२ अधिक माहितीकरता

१) समाजकार्यपद्धती, क्षेत्र, विचारधारा व समाजसुधार –

लेखक : डॉ. संजय साळीवकर

प्रकाशन : श्री. मंगेश प्रकाशन

२) व्यावसायिक समाजकार्य शिक्षण व व्यवसाय

लेखक : डॉ. देवानंद शिंदे

प्रकाशन : डायमंड प्रकाशन

३) समाजकार्यकर्ता (एक व्यावसायिक)

लेखक : डॉ. देवानंद शिंदे

प्रकाशन : मंगेश प्रकाशन

## ३.१३ प्रश्नसंच

१) समाजकार्याची संकल्पना स्पष्ट करून समाजकार्यकर्त्याच्या कार्याचे स्वरूप विशद करा.

२) समाजकार्यकर्त्यांची संकल्पना स्पष्ट करून समाजकार्यकर्त्याकडे आवश्यक असणाऱ्या गुणांबाबत चर्चा करा.

३) समाजकार्यकर्त्याच्या विविध कार्यक्षेत्रांविषयी चर्चा करून समाज कार्यकर्त्याकडे समाजकार्यासाठी आवश्यक असलेली तंत्रे विशद करा.

४) समाजकार्यकर्त्यांच्या कार्यासाठी आवश्यक असणारी विविध कौशल्ये सांगून समाजविकासातील कार्यकर्त्यांची भूमिका विशद करा.

❖❖❖❖

# ४

## समाजकार्याचे क्षेत्र – (व्याप्ती)

**घटक रचना :**

४.० पाठाची उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ कुटुंब कल्याण व बालकल्याण सेवा क्षेत्र

४.३ महिला कल्याण

४.४ युवक कल्याण

४.५ वृद्ध कल्याण

४.६ विकलांग व्यक्तीचे कल्याण

४.६.१ विकलांग व्यक्तीचे विविध प्रकार

४.६.२ विकलांग व्यक्तीच्या समस्या

४.६.३ विकलांग व्यक्तीसाठी कार्यरत बिगर शासकीय संस्थां

४.७ सारांश

४.८ पारिभाषिक शब्द आणि अर्थ

४.९ स्वाध्याय

## ४.० पाठाची उद्दिष्टे

समाजकार्यातील विविध क्षेत्र समजून घेण्याच्या उद्देशाने या प्रकरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. समाजकार्याची संकल्पना समजून घेणे.

२. समाजकार्यातील विविध क्षेत्रांबद्दल माहिती मिळवणे.

३. बालविकासाची संकल्पना समजून घेऊन बालविकासातील अडथळ्यांचा अभ्यास करणे.

४. महिला कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आणि कार्यक्रमांचा आढावा घेणे.

५. युवा कल्याणाची संकल्पना समजून घेणे आणि युवकांच्या विकासासाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांबाबत माहिती मिळवणे.

६. वृद्धांच्या व अपंगांच्या समस्या लक्षात घेऊन त्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा घेणे.

## ४.१ प्रस्तावना

सदर प्रकरणांच्या अभ्यासामुळे समाजकार्याची व्याप्ती म्हणजे समाजकार्य कोणकोणत्या घटकांसंबधी कार्य करू शकते, कितपत खोलवर जाऊ शकते हे समजणार आहे. समाजकार्याला कार्यक्षेत्राची खरंतर मर्यादा नाही. जिथे समाज तिथे समाजकार्य पोहचले. ती कार्यक्षेत्रही या अभ्यासातून समजणार आहेत.

व्यावसायिक समाजकार्य समजून घेताना त्याची व्याप्ती समजून घेणे महत्त्वाचे आहे. असे म्हटले जाते की, जिथे माणूस तिथे समस्या, जिथे समस्या तिथे समाजकार्याची गरज. समाजकार्याला खरंतर मर्यादा असू नयेत. सर्व गटांसाठी, स्त्री, पुरुष, अपंग, वृद्ध, अपराधी, रुग्ण या विविध प्रकारच्या मानवाचे कल्याण म्हणजे समाजकार्याची व्याप्ती होय. समाजकार्याच्या सदर व्याप्तीनुसार समाजकार्याची प्रमुख क्षेत्र पुढीलप्रमाणे आहेत.

१) कुटुंब व बालकल्याण सेवा क्षेत्र.

२) महिला कल्याण.

३) युवक कल्याण.

४) वृद्ध कल्याण.

५) विकलांग कल्याण.



https://www.lokmat.com

## ४.२ कुटुंब कल्याण व बालकल्याण सेवा क्षेत्र

यात माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व अवस्थांमध्ये मानवाला दिल्या जाणाऱ्या सेवांचा समावेश होतो. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर असणाऱ्या गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्याचे कार्य या क्षेत्राच्या अंतर्गत केलले जाते. स्त्री-पुरुष, बालक, युवक, प्रौढ, पालक, अपंग, वृद्ध अशा सर्वांना अपेक्षित असणाऱ्या सेवांचा यात समावेश होतो. कुटुंबाचा प्रत्येक घटक या सेवांचा महत्त्वाचा भाग असतो. कुटुंब केंद्रस्थान मानून कुटुंबाला आपल्या सदस्यांच्या गरजा पूर्ण करता याव्यात, त्यांचे संरक्षण करता यावे यासाठी त्यांना पाठिंबा देता यावा यासाठी प्रयत्न केले जातात. कुटुंब व त्यातील सदस्यांना बलशाली करण्यासाठी

त्या क्षेत्रात कार्य केले जाते. कुटुंबाला आवश्यक असणाऱ्या सेवा उपलब्ध नसतील तर त्या निर्माण करणे, कुटुंबापर्यंत पोहचविणे हे कार्य या सेवा क्षेत्राद्वारे केले जाते.

मानवाच्या जीवनात कुटुंबाला महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंब हा व्यक्तीच्या जीवनाचा पाया असून समाजाला स्थैर्य देण्याचे, नागरिक पुरवण्याचे कार्य कुटुंब करते. कुटुंबातील सदस्यांच्या परस्पर संबंधांना बळकटी देण्यासाठी ते संबंध टिकवून ठेवण्यासाठी कुटुंबाला व त्यातील सदस्याला सेवा पुरविल्या जातात. कुटुंबनियोजन हा कार्यक्रमही याच क्षेत्रात येतो. कुटुंब कल्याण सेवा कुटुंबातील तीन संबंधांना सुदृढ करते. कुटुंबातील तणाव, कौटुंबिक विघटन, वैवाहिक समस्या, कुटुंबात होणारे शोषण, हिंसा, अनैतिक व्यवहार, व्यक्तीची अपेक्षा व कुटुंबसदस्यांचा विकास हे सर्व विषय या क्षेत्रात अंतर्भूत आहेत.

कुटुंबाचे महत्त्व लक्षात घेऊन, समाजाची सर्वात लहान पण सर्वात महत्त्वाची संस्थां स्थिर ठेवण्याच्या दृष्टीने, अस्तित्वात असलेल्या कुटुंबाच्या अभावांना दूर करण्याच्या उद्देशाने, कुटुंबाला शक्तिशाली करण्यासाठी कुटुंबाला केंद्रस्थानी ठेवून हे क्षेत्र कार्य करते. या दिशेने उपलब्ध सेवा कुटुंबापर्यंत पोहचण्याचे, सेवा निर्माण करण्याचे, योजना आखण्याचे कार्य या क्षेत्रात होते.

कुटुंब नसल्यास कुटुंबाची अनुपस्थिती भरून काढणे  व कुटुंब जी काळजी सदस्यांना पुरविते, ज्या पद्धतीने सदस्यांच्या गरजा पूर्ण करते, त्या गरजा पुरवण्याची व्यवस्था निर्माण करणे अशी कार्ये कुटुंब कल्याण क्षेत्रात केली जातात. (supportive, supplimentry, services, substitute services)

जी कार्य वास्तविक कुटुंबांने पार पाडायची असतात परंतु काही कारणाने जेव्हा कार्ये पार पाडणे कुटुंबाला शक्य नसते, काही कारणाने ही कार्ये कुटुंब व्यवस्थितरीत्या पार पाडू इच्छित नाहीत त्या वेळेस या अकार्यक्षमतेमुळे कुटुंब मोडू नये याकरता कुटुंबाला पाठिंबा देणार्या सेवा या क्षेत्राअंतर्गत पुरविल्या जातात. कुटुंब सदस्यांच्या परस्पर नातेसंबंधांना बळकटी आणण्यासाठी व हे संबंध टिकवून ठेवण्यासाठी कुटुंबाला व त्यातील सदस्यांना सेवा दिल्या जातात. संरक्षणात्मक सेवा (protective services) हा कुटुंब कल्याणाचा भाग होतो पुनर्वसनात्मक आणि प्रतिबंधात्मक या क्षेत्राचा भाग आहे.

कुटुंबातील भूमिका, ताण–तणाव, असमाधान, असमायोजन, असामंजस्य, भांडणे, कौटुंबिक विघटन, कुटुंबातील वाद, वैवाहिक समस्या, कुटुंबातील अपूर्णता व अभाव, कुटुंबात होणारे शोषण, कुटुंबातील अनाचार अनैतिकता, कौटुंबिक हिंसा (Family violence), कुटुंबात होणारी उपेक्षा, वंचना, कुटुंबसदस्यांचा विकास हे विषय  क्षेत्रात अंतर्भूत होतात.

कुटुंबकल्याणाच्या उद्देशाने तयार होणाऱ्या  आरोग्य – शिक्षणविषयक धोरणांतर्गत, शासकीय व ऐच्छिक संघटनांकडून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या आणि कार्यक्रमांचा उपयोग या क्षेत्रात केला जातो. बालकांसंबधीचे धोरण, स्त्री- विषयक – वृद्धांसंबधीचे राष्ट्रीय धोरण , युवक – अपंग यांच्या संबंधातील धोरणे - योजना तसेच अन्य योजनांचे ज्ञान उपयोगात आणून या क्षेत्राद्वारे समाजाला सेवा दिल्या जातात, कायद्याचा आधार घेतला जातो.

कुटुंब कल्याण संस्थांची व सेवांची यादी पुढीलप्रमाणे करता येईल. कुटुंब नियोजन सेवा, पूरक आहार सेवा, आरोग्यसेवा, पाळणाघरे, घरपोच सेवा, सल्लासेवा केंद्र, महिला आधार केंद्र, युवा केंद्र, मनोरंजन केंद्र, वाचनालये, प्रिशक्षण शिबीरे, दवाखाने, दत्तक सेवा, अपंग सेवा, आर्थिक सहाय्य सेवा, कुटुंब कल्याण कायदे, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, अल्पावास सेवा, रात्रनिवारा कुटुंब जीवन , इत्यादी.

**बालकल्याण**

१८ वर्षाखालील मुलास बालक म्हटले जाते. काही ठिकाणी ही वयोमर्यादा काही कार्यक्रमांसाठी, काही कायद्यांसाठी यापेक्षा कमी किंवा जास्त आहे. भारतात १४ वर्षाखालील व १८ वर्षाखालील बालकांची संख्या भारतात एकूण लोकसंख्येच्या अनुक्रमे ३० ते ४० सर्वसाधारणतः असते. बालकांत, सामान्य बालकांचा आणि अपंग बालकांचा विचार केला जातो. अपंगामध्ये मानसिकदृष्टया, शारिरीकदृष्टया व सामाजिकदृष्टया अपंग बालकांचा समावेश होतो. जसे मनोदुर्बल , मनोरूग्ण ही मानसिक, मूक – बधिर, अस्थिस्नायूंचे अपंगत्व, अंध ही शारीरिक तसेच अनाथ, शोषित, उपेक्षित, टाकून दिलेली, पळून गेलेली, बाल अपराधी, बाल वेश्या, भिक्षा मागणारी मुले ही सामाजिकदृष्टया अपंग समजली जातात.

बाल कल्याण सेवा पुरविताना देशातील बालकांचे स्वरूप लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. वेळोवेळी होणाऱ्या सर्वेक्षणातून हे स्वरूप स्पष्ट होते. मुलामुलींची संख्या, खेडे - शहर आदिवासी भागातील मुले, शिक्षणासंबंधीची मुलांची माहिती, जन्मदर, मृत्यूदर, बालकांचे आरोग्य उपलब्ध आरोग्य सेवा, आहारासंदर्भात बालकांचे विश्लेषण, बालआजार , लसीकरण, शाळागळती, अपंग बालकांची संख्या, बालकल्याण संस्थांचे विवरण, बालकांवरील अत्याचार आणि बालशोषण, बालमजूर, बालमानांची संख्या, बालविवाह, बालिकांची परिस्थिती अशा विविध मातांच्या आधारे, बालकांची संख्या व बालकांचे स्वरूप जाणून, बालकल्याण धोरण आखून सेवांची व योजनांची आखणी केली जाते.

**बालकल्याणाचा अर्थः**

"Child welfare means (if any economic program is enviasaged nothignshort of the total well - being of the child. It comproises the totality of measures, technical, educational or social, intended to give each individual on equallty of opportunity for growth & development."

या शब्दात योजना विभागाने बालकल्याणाची व्याख्या केली आहे. बालकांचे संपूर्ण कल्याण साधणे, कल्याण साधताना वाढीच्या विकासाच्या समान संधी उपलब्ध होण्यासाठी सर्व प्रकारच्या शैक्षणिक, तांत्रिक, सामाजिक सेवा उपलब्ध करून देणे, साधने प्रदान करणे हा बालकल्याणाचा अर्थ होतो.

बाल कल्याणांतर्गत विशेष काळजी घेण्याची गरज असणाऱ्या बालकांचा वर्गही अंतर्भूत केला जातो. जसे अपंग व अनाथ बालक संविधान बालकाला कायद्याद्वारे संरक्षण देते. उदा. कारखाना अधिनियम, १९४८, बालन्याय कायदा, इ.

बालकल्याणात सामान्य बालक, अपंग बालक यांच्याबरोबर बाल कामगार, वंचित बालक याचाही विचार होतो. बालापराधी व सामाजिकदृष्ट्या पीडित बालकांचाही समावेश होतो.

उपेक्षित (Neglected) बालक, रस्त्यावर राहणारे बालक (Street child), पळून गेलेले / आलेले बालक, शोषित (exploited), बालक, वंचित बालक (deprived), अपमानित बालक, ज्या बालकाबरोबर गैरवर्तन केले गेले असे बालक (abused), इ. या क्षेत्रात विचार होतो.

पुढील स्थितीच्या संदर्भात या क्षेत्रात कार्य केले जाते.

१) मुलांच्या गरजा पूर्ण न होणे किंवा पूर्ण न करणे.
२) मारहाण ( शारीरिक तसेच मानसिक मारहाण)
३) भीक मागण्यास लावणे.
४) दलाल म्हणून मादक पदार्थांच्या व्यवसायात त्यांचा वापर करणे.
५) दुर्लक्ष करणे, एकटे ठेवणे, कोंडणे
६) बालवेश्या
७) लैंगिक शोषण होणे
८) शिक्षण थांबवणे
९) कामास लावणे
१०) अत्याचार होणे
११) मानव व्यापार
१२) बालहत्या
१३) बालविवाह, इ.

बाल कल्याणसेवा, संस्थांत्मक (Institutional) व असंस्थांत्मक (non-institutional) या दोन प्रकारच्या मानल्या जातात.

**संस्थांत्मक सेवा :** यामध्ये अनाथालये, गरजू मुलांसाठी (Institutional) उदाहरणार्थ, कुष्ठरोगाची मुले, क्षयरोगग्रस्तांची मुले, जेल भोगणाऱ्या महिलांची मुले (फॉस्टर होम), अविवाहित महिलांच्या मुलांसाठी निवास व सांभाळ, बालगुन्हेगार मुलामुलींसाठी निरीक्षण ग्रहे, भावनिकदृष्टया अस्थिर मुलांसाठी निवारा, उपचार केंद्र यांचा समावेश होतो.

**संस्थांबाह्य सेवा :**

**अ) सर्वसाधारण मुलांसाठी :** पाळणागृहे, पूर्व प्राथमिक शाळा, दिवसा काळजी घेणारे केंद्र (Day care centre) बालवाडी, अंगणवाडी, मनोरंजन व छंदवर्ग, ग्रंथालये, बालमार्गदशर्न केंद्र यांचा समावेश होतो.

ब) विशेष मुलांसाठी : मानसिकदृष्ट्या अपंग मुलामुलींसाठी शाळा, अंध, अपंग, मुलांसाठी शिशुग्रहे, विशेष मुलांसाठी भत्ते, दत्तक योजना आदींचा समावेश होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) कुटुंब कल्याण व बालकल्याण क्षेत्रातील कार्यावर चर्चा करा.

## ४.३ महिला कल्याण

महिला हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. समाजाचा अर्धा भाग म्हणजे महिला होत. म्हणूनच स्त्रियांचा विकास म्हणजे पर्यायाने समाजाचा विकास होय. जेथे स्त्री महिला मागासलेली असते ते घर, तो समाजही मागासलेला व अप्रगतच असतो. सन २०४ च्या जनगणनेनुसार भारताच्या लोकसंखेत स्त्रियांचे प्रमाण ४८.५ इतके असून १००० पुरुषांमागे ९४३ स्त्रिया असे प्रमाण आहे. ०-६ वर्ष वयोगटात तर स्त्रियांचे प्रमाण १००० पुरुषांमागे ९१९ इतके चिंताजनक आहे.

**स्त्रियांची स्थिती :** भारतीय स्त्रीच नव्हे तर जागतिक स्तरांवर स्त्रियांचा विचार केला असता असे आढळते की, समाजाचा अर्धा भाग असणाऱ्या स्त्रियांना समाजात नेहमीच दुय्यम दर्जा देण्यात आला आहे. महिलांकडून ज्या कामांची अपेक्षा केली जाते किंवा तिच्याकडे जी भूमिका दिली जाते ती महत्त्वाहीन समजली जाते. घरकाम, बालकांची देखरेख, स्वयंपाकघर सांभाळणे ही परंपरेने स्त्रीकडे येणारी कामे दुय्यम मानून महिलांना गौणत्व दिले जाते. या पद्धतीने तिला दुबळे केले जाते. दुबळे ठरविले जाते व तिचे शोषण होत राहते. महिलांच्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या जवळपास सर्वच क्षेत्रांत स्त्रीवर /महिलांवर अन्याय होतो. स्त्रियांच्या दुय्यम दर्जाला अनेक घटक कारणीभूत आहेत.

महिलांच्या प्रगतीत समाजाचा दृष्टिकोन बाधा आणतो. तो समाजाच्या, घराच्या प्रगतीत महिलांना सहभागी होऊ देत नाही. महिलांना त्यांच्या प्रगतीपासून वंचित ठेवले जाते किंवा ती वंचितच राहते. महिलांच्या प्रगतीला पोषक वातावरण व संधी मिळत नाही.

या दृष्टीने स्त्रियांचा समान विकास घडवून स्त्रियांना माणूस म्हणून जगता यावे, विकासाच्या समान संधी मिळाव्या, स्त्री आहे म्हणून भेदभाव केला जाऊ नये, त्यांचा सर्व थरांवर सहभाग वाढवावा अशा अनेक उद्देशांनी स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या कल्याणकारी सेवांचा अंतर्भाव स्त्रीकल्याण क्षेत्रात व्हायला हवा व होतो. स्त्रियांचा समान विकास आधुनिक समाजाची गरज आहे.

शोषित, पिडीत, उपेक्षित, फसवणूक झालेल्या स्त्रियांचा विचार या क्षेत्रात होतो. या क्षेत्रात स्त्री जीवनाशी संबंधित पैलूंचा अंतर्भाव होतो, जसे – स्त्रियांवर होणारे अत्याचार, मारहाण (घरात व घराबाहेर) स्त्रियांचा छळ (शारीरिक व मानसिक), स्त्री कर्मचारी व स्त्री कामगारांना येणाऱ्या समस्या, स्त्रियांचे शोषण, स्त्रियांवर होणारा हिंसाचार, बलात्कार, स्त्रियांना पळवणे, स्त्री-विरोधी घटना जसे – हुंडा, परिभक्तास पुरुषांकडून व्यभिचार, पतीकडून व्यभिचार, कुटुंब नियोजनाशी संबधित घटना, लादलेले मातृत्व (विवाह जीवनातील व अन्य), स्त्री म्हणून दिली जाणारी भेदभावाची वागणूक (घरात वा घराबाहेर), यांसारख्या अनेक बाबींशी संबंधित स्त्री कल्याणाचे कार्य करणाऱ्या संस्थां कार्यरत आहेत.

**स्त्री कल्याणाचे काम करणाऱ्या संस्थां :** स्त्री कल्याणाचे काम करणाच्या अनेक संस्थां कार्यरत आहेत. स्त्रियांना विविध सोयी व सवलती मिळत आहेत. केंद्रीय समाजकल्याण मंडळ, महिला आयोग, महिला धोरणे, महिला आरक्षण, माता बालक आरोग्य सेवा, कुटुंब सल्ला सेवा, कायदा सल्ला सेवा, महिला मंडळे, स्त्रियांसाठी वसतिगृहे, ग्रह, स्टेट होम,

मनोरुग्ण स्त्रियांसाठी संस्थां, स्त्री – उद्योगाला प्रोत्साहन सेवा – कार्यक्रम – संस्थां कार्यरत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्री कल्याणविषयक कार्याचा आढावा घ्या.

## ४.४ युवक कल्याण

युवक कल्याण हा कुटुंबकल्याणाचा एक भाग होतो. १४-३० वर्ष वयोगटातील व्यक्तीला युवक म्हणता येते. युवकांच्या गरजा वैशिष्टयपूर्ण असतात. या काळाचे काही उपविभागही होतात. किशोरावस्थेत शारीरिक व मानसिक बदल अत्यंत वेगाने घडतात. या बदलांना तोंड देणे त्यांना कठीण जाते. या काळात इतरांकडून सहानुभूतीने समजून घेणे हवे असते, इतरांनी सहनशीलनेने, शांतपणे वागणे, मुभा देणे, स्वातंत्र्य देणे हवे असते. अधिकार हवे असतात परंतु त्यांच्यावर कोणी अधिकार चालवलेला चालत नाही. त्यांना स्वतःच्या क्षमता कळू लागलेल्या असतात. स्वतः निर्णय घ्यायला आवडेल. अनेकदा चुकीचे निर्णय घेतात. आपण मोठे की लहान हा प्रश्न असतो. हा  ताणतणावाचा काळ असतो. मानसिक तणाव बरेचदा वरवर असतो. स्वतःच्या शरीराबद्दल भावना व नात्याबद्दल प्रश्न असतो. अपरिपक्वता असते.

युवकांच्या अनेक गरजा पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्रगल्भ व जबाबदार प्रौढात रूपांतर होण्याच्या दिशेने व्यक्तीमत्त्व विकास होतो.

२) संरक्षित  वातावरणातून बाहेर पडणे व भावनिक स्वातंत्र्य मिळविणे कोणत्याही लाटेत वाहून न जाता विचारात स्थैर्य निर्माण होणे.

३) विरुद्ध लिंगाशी जुळवून घेणे. विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींशी व समवयस्कांशी संबंध प्रस्थापित करणे.

४) व्यवसाय शोधणे, प्रिशक्षण घेणे व आत्मनिर्भरलेल्या दिशेने वाटचाल करणे.

५) व्यक्तीमत्त्व विकासाचा जाणीवपूर्वक विचार घेण्याची जबाबदारीने निर्णय घेण्याची सवय होते.

आजच्या जगातील युवकांपुढे अनेक आव्हाने आहेत. त्यांच्या समस्याही फार मोठया आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, मूल्यांचा ऱ्हास, संधी व साधनांचा अभाव, शिक्षणाचा अभाव इ.ढासळत्या सामाजिक मूल्यांचा सर्वात मोठा बळी तरुण ठरतो व त्यातून वेश्यावृत्ती, एडस , गुप्तरोग, बेशिस्तपणा, टीबीचा प्रभाव अशा स्थितीचा जन्म होतो. मानवी मनाला स्वस्थ ठेवण्यासाठी ज्या सुरक्षिततेच्या भावनेची गरज असते. त्याचा मोठया प्रमाणावर अभाव तरुणांच्या मानवी जीवनात आढळतो, आज तरुणांवर दिशाहीनतचे बेजबाबदारपणाचे, कर्तृत्वहीनचे आरोप होतात. समाजात आढळणाऱ्या अन्य समस्या तरुणांना प्रभावित करीत असतात.

**तारुण्य वास्तविकता :** अनेक क्षमतांनी व वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असते. त्या शक्तींचा योग्य वापर झाल्यास समाजाला योग्य नेतृत्व व नागरिक मिळतात. समाजाचे परिवर्तन करण्यास हा वर्ग तरुणांचे महत्त्व, वैशिष्टय, गरज व क्षमता लक्षात घेऊन शासनाकडून व ऐच्छिक

संस्थांकडून वेळोवेळी पावले उचलली जातात. या माध्यमातून युवक कल्याण साधण्याचे प्रयत्न होतात. जसे- मतदानाचा अधिकार वयाची १८ वर्षे झाल्यावर मिळवणे, लग्नाचे वय कायद्याने निश्चित करणे, आंतरजातीय विवाहास मान्यता, वेगवेगळे शिक्षण व प्रिशक्षण कार्यक्रम, व्यक्तीमत्त्व विकास घडवणार्या योजना व कार्यक्रम, स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारे कार्यक्रम, युवकांतील क्रियाशक्तीला योग्य दिशा देणारे कार्यक्रम व संघटना जसे, 'N.S.S, N.C.C.' स्काऊट गाऊड, छात्र संघटना छात्र सेना, युवा केंद्र, नेतृत्व शिबीरे, युवा महोत्सव, युवा मार्गदशर्न, व्यवसाय मार्गदशर्न, इ.

समस्याग्रस्त – अपंग युवकांसाठी विविध संस्थां कार्य करतात. भारतात युवक कल्याण धोरण आखले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) युवक कल्याणातील कार्याचा आढावा घ्या.

## ४.५ वृद्ध कल्याण (WELFASE OF AGED)

भारतात वृद्धांची म्हणजे ६० वर्षावरील व्यक्तींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ६.८ आहे. (१९९१). वृद्ध म्हणजे समाजाची अनुभव संपत्ती होय. आपल्या आयुष्याचा सुवर्णकाळ त्यांनी कुटुंब व समाजासाठी दिलेला असतो : त्यामुळे समाज त्यांचा ऋणी असतो. सन २०१३ मधील स्थितीनुसार वय ६५ वर्षे वरील वृद्धांची संख्या भारतात सरासरी ८.३ आहे.

वृद्धांची संख्या भारतात तसेच जगात उत्तरोत्तर वाढते आहे. वाढलेली आयुर्मयादा हे त्याचे प्रमुख कारण आहे. हा वर्ग आता इतरांवर अवलंबित असतो. तो आयुष्याच्या या टप्प्यावर उत्पादन करण्यास असमर्थ असतो.

वृद्धावस्था ही जीवनचक्रातील विशिष्ट अवस्था आहे. यावेळी त्याची घरात व समाजात भूमिका बदललेली असते. क्रियाशीलता, शारीरिक व मानसिक क्षमता यांत फरक पडलेला असतो. क्रियाशीलतेत शिथिलता आलेली असते. जबाबदाऱ्या, अपेक्षा, कर्तव्ये बदललेली असतात. मोकळा वेळ असतो. अशा वेळी बदलत्या परिस्थितीशी समायोजन करून, स्वतःचे अस्तित्व स्वतःला व इतरांना हवेहवेसे व उपयोगाचे ठेवण्यात यश मिळवणारे वृद्ध सुखमय जीवन व्यतीत करतात. आयुष्याची तरतूद करण्याइतकी जागरूकता व मानसिकता तयार करणारी तरुण पिढी सुनियोजित वृद्धापकाळाचा अनुभव घेऊ शकते.

वृद्ध व्यवस्थेतील समस्याही महत्त्वपूर्ण असतात. त्यात आरोग्यविषयक समस्या, आर्थिक समस्या व समायोजनाच्या समस्या प्रामुख्याने नोंदवाव्या लागतील, वृद्धावस्थेत येणारी अपंगत्वता हा मोठा भाग येथे असतो. त्याचे प्रमाण १००००० : ८४४ आहे.

भरपूर मोकळा वेळ ही वृद्धांची समस्या बनते. बदलत्या काळात व कुटुंबाच्या बदलत्या स्वरूपामुळे वृद्धांचे कुटुंबातील स्थान डळमळीत होत आहे. उपेक्षित, एकूण दुर्लक्षित, नकोसे झालेले, पीडित, शोषित वृद्ध ही आजच्या समाजाची वास्तविकता आहे. वृद्धांना अनेक प्रकारच्या मानसिक व भावनिक समस्या आज आढळतात. एकटेपणा ही समस्या असते. अलीकडील काळात संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंब पद्धत अस्तित्वात येत आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वृद्धांची काळजी घेण्यास कुटुंबात कोणीही

उपलब्ध नसते. अलीकडे लहान कुटुंबामुळे काळजी घेण्यास कोणी नसल्याची वृद्धांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. अशा निराधार वृद्धांसाठी त्यांची दैनंदिन काळजी व कामे करण्यासाठी घरपोच सेवा, बाहेरची कामे करून देण्याची सेवा. आजारपणात काळजी वाहण्याची सेवा, इ. काळाची गरज बनत आहे.

या समस्या दूर करून सुखावह वृद्धावस्या वृद्धांना प्राप्त व्हावी म्हणून, विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात, ज्यात सामाजिक सुरक्षा, आयुर्विमा, पेन्शन, वृद्धाश्रम, इस्पितळे, निराधार योजना, मंडळे इ. समावेश होतो. रा. धोरण, योजना याद्वारे वृद्ध कल्याण (Welfare of aged) सेवा समाजास पुरविल्या जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१) वृद्ध कल्याणावर टीप लिहा.

## ४.६ विकलांग व्यक्तीचे कल्याण

विकलांगता हा शारीरिक, मानसिक, आकलनात्मक , बौद्धिक, भावनिक, विकासात्मक वा यापैकी काही गोष्टींच्या एकत्रित क्षतीचा (impairment) चा परिणाम असतो. विकलांगता ही जलापासून असू शकते अथवा जीवनाच्या एखाद्या टप्प्यावर निर्माण होऊ शकते.

विकलांगता ही संज्ञा कडबोळं (Umbrella) स्वरूपाची आहे. यामध्ये विभिन्न क्षती, कृतींवर मर्यादा आणि सहभागावर असलेल्या निर्बंधाचा समावेश होतो. शरीर कार्ये वा रचनेतील समस्या म्हणजे क्षती होय, कोणतेही काम वा कृती करताना व्यक्तीला भेडसावणारे अडथळे म्हणजे कृतीवरील मर्यादा (activity limitation) होय, तर सहभाग निर्बंध (participation restriction) म्हणजे व्यक्तीला जीवन परिस्थितीमध्ये (life situations) गुंतण्यात येणाऱ्या समस्यांचा अनुभव होय. अशा प्रकारे विकलांगता हे गुंतागुंतीचे घटित असून ते व्यक्तीच्या शरीराची वैशिष्ट्ये आहेत आणि ती व्यक्ती वास्तव्य करत असलेल्या समाजाची वैशिष्टये या दोघांमधील अंतरसंबंधाचे प्रतिबिंब होय.

एखाद्या व्यक्तीला गतकाळामध्ये काही क्षती पोहोचलेल्या असतील किंवा व्यक्तीशः वा एखाद्या गटाचा संकेत वा प्रमाणकानुसार एखादी व्यक्ती विकलांग म्हणून पात्र होऊ शकते. मानसिक संतुलन (याला मनोविश्लेषण वा मानसिक विकलांगता) या नावानेही ओळखले जाते आणि विविध प्रकारच्या दुर्धट आजारामुळे देखील विकलांगता प्राप्त होते.

काही अभ्यासकांच्या मते, काही ठराविक स्थितीचे वर्णन करण्याकरता (उदा. कर्णबधिरता) विकलांगता या संज्ञेचा वापर करू नये. या बाबी विकासातील तफावत म्हणून विचारात घ्यावी.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) आरोग्य अनुभवाच्या संदर्भात क्षती, विकलांगता आणि अपंग या संज्ञाची व्याख्या केलेली आहे.

**क्षती (Impairment):** मानसिक, शारीरिक वा शरीर रचनेतील वा कार्यातील कोणतीही हानी किंवा विकृती होय.

**विकलांगता (Disability):** सामान्य स्थितीतील कोणत्याही मनुष्याला पार पाडता येणाऱ्या कृती वा त्याच्या आवाक्यातील कृती पार पाडण्यावरील कोणतेही निर्बंध वा क्षमतेचा अभाव म्हणजे विकलांगता होय.

**अपंग (Handicap):** संबंधित व्यक्तीला क्षती वा विकलांगता या कारणांमुळे वय, लिंग, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांवर आधारित सर्वसामान्य भूमिकांची पूर्तता करणाऱ्या त्या व्यक्तीला असलेल्या मर्यादा किंवा प्रतिबंध होय.

**भारतातील विकलांग व्यक्तींची स्थिती :**

२००१ च्या जनगणनेनुसार देशात २.१९ कोटी लोक विकलांग आहेत. एकूण लोकसंख्येमध्ये त्यांचे प्रमाण २.१३% आहे. यामध्ये दृष्टी, श्रवण, वाचा, हालचाल आणि मानसिक विकलांगता असणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो. ७५% विकलांग व्यक्ती ग्रामीण भागात राहतात, ४९% विकलांग लोकसंख्या साक्षर आहे तर केवळ ३४% विकलांग व्यक्तींनाच रोजगार आहे. सुरुवातीच्या काळात आपला सर्व भर हा वैद्यकीय पुनर्वसनावर होता तर आता आपला थर सामाजिक पुनर्वसनावर आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार विकलांग व्यक्तीमध्ये १२.६ दशलक्ष पुरुष तर ९.३ दशलक्ष महिला होत्या. दर १ लाख लोकसंख्येमागे विकलांग व्यक्तीचा दर (संख्या) २,१३० होता यामध्ये पुरुष आणि स्त्रियांची संख्या अनुक्रमे २,३६९ व १,८७४ होती.

संपूर्ण देशभरामध्ये विकलांग व्यक्तीची सर्वाधिक संख्या उत्तर प्रदेशामध्ये (३.६ दशलक्ष) होती. त्यानंतर बिहार, प. बंगाल, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या राज्यांचा क्रम लागतो.

**४.६.१ विकलांगतेचे विविध प्रकार :**

**१) दृष्टी विकलांगता :** २००१ च्या जनगणनेमध्ये एकच डोळा असणाऱ्या व्यक्तीला विकलांग मानले होते. २००१ च्या जनगणनेमध्ये अशा व्यक्तीला दृष्टीतील विकलांगता मानण्यात आली नाही. २००१ च्या जनगणनेवेळी गणनाकारांना अधूक दृष्टीची खात्री करून घेण्यासाठी एक साधी सोपी चाचणी सांगण्यात आले. २००१ च्या जनगणनेच्या वेळेस अशी सूचना देण्यात आली नव्हती.

**२) श्रवण विकलांगता :** २०४ च्या जनगणनेच्या वेळी ज्या व्यक्ती श्रवणयंत्रांचा वापर करतात त्यांची विकलांग म्हणून गणना करण्यात आली. अशा व्यक्तींची गणना २००१ च्या जनगणनेत विकलांग म्हणून केलेली नव्हती. २००१ च्या जनगणनेत ज्या व्यक्तीला एका कानाने ऐकण्यात अडचण होती पण दुसरा कान सामान्यपणे कार्यरत होता त्यांना श्रवण विकलांग म्हणून विचारात घेण्यात आले.

**३) वाचा विकलांगता :** २००१ च्या जनगणनेमध्ये वाचा विकलांगतेबाबत अधिक स्पष्टपणे व्याख्या नमूद केलेली आहे. उदा. एखादी व्यक्ती एका (single) शब्दामध्ये बोलत असेल आणि तिला पूर्ण वाक्यामध्ये बोलणे शक्य नसेल तर त्या व्यक्तीची वाचा विकलांग म्हणून गणना केली जाते.

**४) हालचाल विकलांगता :** २००१ सालच्या जनगणनेमध्ये हालचाली संदर्भातील विकलांगतीच्या अर्थामध्ये नवीन बाबींचा समावेश करण्यात आला.

१) पक्षाधान असणारी व्यक्ती (paralysis).

२) सरपटणारी व्यक्ती (crawl)

३) मदतीच्या सहाय्याने चालू शकणारी व्यक्ती.

४) सांधे / स्नायू याबाबत तीव्र दुखणे किंवा कायमस्वरूपी दुखणे असणारी व्यक्ती.

५) शरीर हालचालीचे संतुलन आणि समन्वय साधताना अडचणी असतील.

६) कुष्ठरोग वा अन्य कारणांमुळे शरीरातील संवेदना संपुष्टात आली असल्यास.

७) शारीरिक व्यंग असणे. उदा. पाठीवर कुबड असणे.

**५) मासिक मंदपणा :** २०४ मध्ये या वर्गवारीचा नव्याने समावेश करण्यात आला. २०४ च्या जनगणनेत मानसिक विकलांगतेअंतर्गत मानसिक मंदपणा व्याप्त करण्यात आला होता.

**६) अन्य :** विकलांगतेच्या संपूर्ण व्याप्तीसाठी २०४ पासून या नव्या वर्गवारीचा समावेश करण्यात आला. या पर्यायाचा वापर मुलाखतदाराला प्रश्नावलीमध्ये नमूद असलेल्या विकलांगतेची नोंद करण्यासाठी होतो. जेव्हा माहिती देणारी व्यक्ती विकलांगतेच्या प्रकाराबाबत ठाम नसते अशा वेळी तिला विकलांगतेची नोंद करण्याकरता या पर्यायाचा वापर करता येतो.

**७) बहुविध (multipal) विकलांगता :** २०४ च्या जनगणनेच्या वेळी या नव्या वर्गवारीचा समावेश करण्यात आला. यामध्ये जास्तीत जास्त ३ प्रकारच्या विकलांगतेची नोंद करता येते.

**तक्ता : विकलांगतेच्या प्रकारानुसार विकलांग लोकसंख्येचे प्रमाण (%)**

| विकलांग प्रकार | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| दृष्टी | १८.८ | १७.६ | २०.२ |
| श्रवण | १८.९ | १७.९ | २०.२ |
| वाचा (बोलणे) | ७.५ | ७.५ | ७.४ |
| हालचाल | २०.३ | २२.५ | १७.५ |
| मानसिक निवृत्ती | ५.६ | ५.८ | ५.४ |
| मानसिक आजार | २.७ | २.८ | २.६ |
| इतर | १८.४ | १८.२ | १८.६ |
| बहुविध | ७.९ | ७.८ | ८.१ |

### ४.६.२ विकलांग व्यक्तीच्या समस्या :

विकलांगता कोणत्याही स्वरूपाची असली तरी विकलांग व्यक्तींना काही समान स्वरूपाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. उदा. शारीरिक विकलांगता असणाऱ्या आणि मानसिक विकलांगता असणाऱ्या व्यक्तींच्या काही विशिष्ट अशा समस्या असतील तर विकलांगतेमुळे काही सर्वसाधारण समस्या या व्यक्तींना भेडसावतात.

विकलांगच्या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) अल्प प्रमाणात साक्षरता :** सर्व प्रकारची विकलांगता असणाऱ्या व्यक्तीमध्ये विशेषतः बालकांमध्ये साक्षरता अल्प प्रमाणात आढळते. ग्रामीण भागातील शाळा-महाविद्यालये ही

दूर अंतरावर असतात. त्याचबरोबर या शिक्षण संस्थांमध्ये विकलांग व्यक्तींच्या शिक्षणाची गरज लक्षात घेता पायाभूत सुविधांचा आणि योग्य मार्गदशर्काचा अभाव असतो. विकलांग व्यक्तींच्या बाबत उपलब्ध असलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, सर्व प्रकारच्या विकलांगता असणाऱ्या व्यक्ती प्राथमिक शिक्षणापुढचे शिक्षण घेताना आढळत नाहीत.

**२) कौशल्यांचा अभाव :** बहुसंख्य विकलांग व्यक्तींना व्यक्तिगत स्वच्छता राखणे, नीटनीटकेपणा, प्रवास, शौचालयाचा वापर आणि व्यक्तीगत स्वच्छता इ. मूलभूत कौशल्ये शिकवली जात नाहीत. त्याचबरोबर सामाजिक संवादासाठी आवश्यक असणारी कौशल्ये उदा. संभाषण, श्रवण, कौशल्ये त्यांना शिकवली जात नाहीत. तसेच विकलांग व्यक्तींना रोजगारासंदर्भात आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती नसल्याने त्यांची सर्व क्षेत्रांत हेळसांड होते.

**३) आत्मसन्मान आणि आत्मविश्वासाचा अभाव :** बहुसंख्य विकलांग व्यक्तींना आपल्या क्षमतेबाबात साशंकता असल्याने त्या कुटुंबातील अन्य सदस्य, मित्र-मैत्रिणी, सामाजिक संपर्क आणि रोजगार या सर्व व्यक्ती – घटकांपासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात. ग्रामीण भागामध्ये विकलांग व्यक्तीची चेष्टामस्करी मोठया प्रमाणावर केली जाते. विकलांगता हा सामाजिक कलंक मानल्याने विकलांग व्यक्तींच्या मनामध्ये स्वतःविषयी न्यूनगंड वाढीस लागतो.

**४) पालकांची अतिकाळजी :** अनेक पालक आपल्या विकलांग पाल्याची अधिक काळजी घेतात यामुळे मुलांना स्वतंत्रपणे घडण्यात अनेक अडचणी येतात. बहुसंख्य विकलांग व्यक्ती आपल्या लहानसहान कामासाठी आई- वडील, भाऊ, बहीण, मित्र-मैत्रीण यांच्यावर विसंबून राहिल्याने त्यांना स्वतंत्रपणे कार्य करता येत नाही.

**५) आरोग्याचे प्रश्न :** अनेक विकलांग व्यक्तींना योग्य औषधोपचार योग्य वेळी उपलब्ध न झाल्याने त्यांचे आरोग्य ढासळते. याचबरोबर विकलांग व्यक्तींच्या विशेष गरजा विचारात न घेता त्यांना योग्य सहाय्य साधनांचा पुरवठा नाही केला तरी त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

उपरोक्त सर्वसाधारण समस्यांसोबतच विकलांग व्यक्तींना भेडसावणाच्या शैक्षणिक व रोजगाराच्या संधीमधील असमानता या दोन समस्या अधिक मूलभूत स्वरूपाच्या आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत.

### ४.६.३ विकलांग व्यक्तींसाठी कार्यरत भारतातील प्रमुख बिगर शासकीय संस्थां :

**१) अर्थ - आस्था :** ही संस्थां १९९३ साली स्थापन झाली . या संस्थेचे प्रारंभीचे नाव आस्था असे होते. ही संस्थां बालके आणि विकलांग व्यक्तींकरिता काम करते. बालके, विकलांग व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत काम करणे, माहितीचा प्रसार करणे, विकलांग व्यक्तींच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या विषयांबाबत संशोधने करणे इ. हे या संस्थेचे मिशन होय. या संस्थेचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे तिने बालके आणि विकलांग व्यक्तीच्या मदतीसाठी (ABILINE’) नावाने हेल्पलाइन सुरू केली आहे.

**२) एनेबल इंडिया (Enable India) :** ही एक विश्वस्त संस्थां असून विकलांग व्यक्तीचे सक्षमीकरण करणे हे तिचे मिशन होय. विकलांग व्यक्तींना सहानुभूतीची नव्हे तर सकारात्मक वातावरणाची गरज असते. यावर या संस्थेचा भर आहे. ही संस्थां विकलांग व्यक्तींना रोजगार, रोजगार पूर्व सेवा, पूरक शिक्षण, समुपदेशन आणि अन्य संस्थांना तांत्रिक शिक्षण, सेवा, प्रिशक्षण पुरवण्याचे काय करते. ही संस्थां विकलांग व्यक्तींना प्रामुख्याने प्रिशक्षण देऊन आणि त्यांचे समुपदेशन करून त्यांना मुख्य प्रवाही श्रमशक्तीमध्ये सहभागी होण्यास सक्षम बनवते. ही संस्थां १९९९ साली स्थापन झाली. दृष्टीविषयक, शारीरिक आणि श्रवणदृष्ट्या विकलांग व्यक्तींचे सक्षमीकरण, पूरक शिक्षण, कठोर प्रिशक्षण आणि साहाय्यभूत साधनांच्या पुरवठ्याने विकलांग व्यक्तींचे पुनर्वसन करणे, विकलांग व्यक्तींकरता रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्यांना हुशार आणि स्वतंत्र बनवणे ही या संस्थेची उद्दिष्टे आहेत.

**३) आदी (AADI) :** आदी (Action for Ability & Development & Inclusion) ही संस्थां १९७८ पासून कार्यरत आहे. या संस्थेचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे असून ग्रामीण क्षेत्रातील कार्याबाबतचे कार्यालय हरयाणा येथे आहे. बालके आणि विकलांग व्यक्तींना समान, पोच असणाऱ्या गुणवत्तापूर्ण सेवा पुरविणे हे या संस्थेचे मिशन आहे.

**४) विकास :** ही संस्थां १९८६ साली स्थापना झाली असून ओडिशामधील १४ अविकसित जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे. ही संस्थां बालकांचे शिक्षण, उपजीविकेच्या संधी पुरविणे आणि विकलांग व्यक्तींना आधार देणे आणि त्याद्वारे आदिवासी आणि ग्रामीण समुदायांना आत्मनिर्भर करण्याचे उद्दिष्ट बाळगते. ही संस्थां विकलांगांबाबतच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क, मूलभूत आरोग्य सेवांचा हक्क, समान संधीचा हक्क, शाश्वत उपजीविकेचा हक्क, सन्मानपूर्वक जगण्याचा हक्क आणि सुशासनाचा हक्क याबाबतीत कार्यरत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) विकलांग व्यक्तीच्या समस्या सांगा.
२) विकलांगतेचे विविध प्रकार सांगा.

## ४.७ सारांश

समाजकार्य व्यवसाय म्हणून कार्य करण्यासाठी काही मर्यादा नाहीत . जिथे समस्या असते तिथे समाजकार्य पोहचत असते. व्यक्ती, गट व समुदायांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील आहे. समस्या निर्माण होऊ नयेत यासाठीही समाजकार्य प्रयत्नशील आहे. समाजकार्य, व्यवसाय म्हणून ज्ञान, तत्त्वे, कौशल्य, मुल्ये व पद्धती याने युक्त व सुसज्ज असला तरी अजूनही समाजकार्य व्यवसाय इतर व्यवसायांप्रयाणे मान्यता पावलेला नाही.

## ४.८ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**१) सेवा क्षेत्र :** समाजकार्याच्या या क्षेत्राद्वारे गरजूंसाठी कल्याणकारी सेवा प्रदान करण्याचे काम केले जाते. त्या क्षेत्रास सेवा क्षेत्र असे म्हणतात. उदा. बालकल्याण क्षेत्र, अपंग कल्याण क्षेत्र, इ.

**२) संस्थांत्मक सेवा :** निवासी संस्थेत रहाणाऱ्या लाभार्थ्यांना त्याच संस्थेद्वारा ज्या सेवा पुरविण्यात येतात. त्यास संस्थांत्मक सेवा म्हटले जाते.

**३) संस्थांबाह्य सेवा :** कुटुंबात व समुदायात रहाणाऱ्या सेवार्थीस वा गरजेस अनुसरून वैयक्तीक अथवा सेवाभावी संस्थेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवेला संस्थांबाह्य सेवा म्हटले जाते. उदा. विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिक्षणासाठीची मदत, प्रतिपालकत्व, इ.

## ४.९ स्वाध्याय

१) भारतातील समाजकार्याची विविध क्षेत्रे विशद करा.

२) व्यावसायिक समाजकार्यातील कुटुंब व बालकल्याण सेवा क्षेत्रांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची चर्चा करा.

३) समाजकार्यातील महिला कल्याणांतर्गत करता येण्यासारख्या विविध सेवा स्पष्ट करा.

४) समाजकार्यातील वृद्ध व विकलांगासाठी करता येणाऱ्या विविध सेवा स्पष्ट करा.

५) समाजकार्याची व्याप्ती विशद करा.

६) समाजकार्यातील युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत होणारे विविध उपक्रम सांगा.

❖❖❖❖

# ५

# वैद्यकीय चिकित्सा, कामगार, कल्याण, अपराध व सुधार क्षेत्र

**घटक रचना :**

५.० पाठाचे उद्देश

५.१ प्रस्तावना

५.२ वैद्यकीय चिकित्सा

५.३ कामगार कल्याण

५.४ अपराध व सुधारात्मक सेवा

५.५ सारांश

५.६ स्वाध्याय

५.७ संदर्भ सूची

## ५.० पाठाचे उद्देश

या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. वैद्यकीय चिकित्सेच्या व्याख्या समजावून घेणे.

२. वैद्यकीय समाज कार्यकर्त्यांची भूमिका समजावून घेणे.

३. कामगार कल्याणाचा अर्थ समजावून घेणे.

४. कामगार कल्याण अंतर्गत क्षेत्राचा अभ्यास करणे.

५. अपराध क्षेत्राचे स्वरूप समजावून घेणे.

६. सुधार क्षेत्राची व्याप्ती अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

समाज हा मानवापासून तयार झालेला आहे. समाजात निरनिराळ्या समस्या निर्माण होत असतात. या समस्या सोडविण्यासाठी व्यावसायिक समाज कार्याची वेगवेगळी क्षेत्रे उदयास आली आहेत. यामध्येच समाजकार्याचा व्यवसाय हे समजावून घेणे आवश्यक आहे. समाजकार्य हे वेगवेगळ्या घटकांवर आधारित आहे. आरोग्यविषयक समस्या असणाऱ्या व्यक्तींना वैद्यकीय सेवा क्षेत्राची गरज असते. कामगारांच्या जीवनाशी निगडित समस्या

सोडविण्यासाठी कामगार कल्याण सेवा क्षेत्र आवश्यक असते तर समाजात समाज मान्यतेच्या विरोधात वागणाऱ्यांना अपराध समजले जाते. त्यांच्या मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी अपराध व सुधार सेवा क्षेत्र समाजकार्यात उदयास आले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत सध्या व्यावसायिक समाजकार्याची व्याप्ती वाढत आहे.

## ५.२ वैद्यकीय चिकित्सा

मानवाच्या शारीरिक आजाराचा, त्याच्या मानसिक व सामाजिक परिस्थितीशी निकटचा संबंध असतो. या अवस्थेत सुधारणा होण्याने किंवा मदत मिळण्याने शारीरिक आजार नष्ट होण्यास जीवन सामान्य व सुदृढ होण्यास मदत होते. रुग्ण हा माणूस असतो. अनारोग्याच्या काळात मानवाची मानसिक अवस्था बिघडलेली असते. त्यामुळे रुग्णाच्या मानसिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक असते. मानसिक व सामाजिक समस्या असणाऱ्या रुग्ण शारीरिक आजारापासून बरा होण्यास अधिक वेळ लागतो. त्याच्यावर होणार्या औषधोपचारांना हवा त्या प्रमाणात प्रतिसाद देत नाही. कारण आजार बरा होण्यास मानसिक शक्तीची गरज असते. रुग्णाला मानसिक आधार देण्याची गरज असते. आरोग्याच्या समस्येला तोंड देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण करणे गरजेचे असते. हेच काम वैद्यकीय समाज कार्यकर्ता करत असतो. आजारावर योग्य उपचार देण्याच्या मार्गात येणारे विविध प्रकारचे अडथळे दूर करण्याचे कार्य या क्षेत्रात केले जाते.




https://rashtriyashiksha.com

### ५.२.१ वैद्यकीय समाजकार्याची व्याख्या :

वैद्यकीय समाज कार्यकर्ता प्रत्येक रुग्णाच्या कौटुंबिक व मानसिक अप्रसिद्ध गोष्टीशी परिचित असतो. आज वैद्यक क्षेत्रात विशिष्टीकरणाकडे वळलो आहोत. आपण विशिष्टीकृत संस्थांचा उपयोग करत आहोत. त्या इतक्या मोठया असतात की व्यक्ती रुग्णालयाच्या संरचनेत हरवून जाते. व्यक्तीवर फक्त रुग्ण म्हणून लक्ष केंद्रित केले जाते. एक माणूस म्हणून त्याच्याकडे बघितले जात नाही. रुग्णाची मानवीय बाजू लक्षात घेतली जात नाही. म्हणूनच आजच्या वैद्यकीय विज्ञानाच्या प्रगतीला दिवसेंन्दिवस आजारी माणसाच्या गरजा बिकट होत चालल्या आहेत. रुग्णाला मदत करणे अनेक गोष्टीवर अवलंबून आहे. व्यक्तीच्या आजाराचा प्रकार रुग्णाची सामाजिक व मानसिक अवस्था, आजारपणातील गरजा पूर्तीची साधने इ. गोष्टी समजावून घेण्यासाठी वैद्यकीय समाज कार्यकर्त्याची गरज असते. म्हणून वैद्यकीय समाज कार्यकर्त्याची व्याख्या पुढील प्रमाणात मांडण्यात आली आहे.

"आरोग्यविषयक समस्या असणाऱ्यांना समाजकार्याच्या पद्धतीद्वारे व ज्ञानाच्या आधारे गरजेनुसार मदत करणे आणि आरोग्य सेवा देताना समाजकार्यातील पद्धतीचा व तत्त्वज्ञानाचा उपयोग करणे म्हणजे वैद्यकीय समाज कार्य होय."

वैद्यकीय समाज कार्यकर्ता रुग्णाच्या भावना, गरजा, परिस्थिती आणि त्याच्या आजाराला कारणीभूत घटक यांच्या सह एक सामाजिक सजीव प्राणी म्हणून समजावून घेण्याचा प्रयत्न करतो म्हणून वैद्यकीय समाजकार्य रुग्णाच्या सामाजिक आणि शारीरिक भावनांचा मेळ साधून सक्रिय नामे संबंधद्वारे रचनात्मक शेवट घडवितो.

**आपली प्रगती तपासा :**

१) वैद्यकीय समाजकार्याच्या व्याख्या सांगा.

### ५.२.२ वैद्यकीय समाज कार्याचे महत्त्व :

वैद्यकीय सेवेत समाज कार्याचे स्थान महत्त्वाचे आहे. आजारी व्यक्तीच्या आजाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन घेण्यात येत असलेल्या उपचाराबद्दलचे मत यांचा संबंध आजाराशी असतो. रुग्णाला आपुलकीची वागणूक देऊन समस्यांची सोडवणूक करण्यामध्ये समाजकार्यकर्त्याचे स्थान महत्त्वाचे असते. वैद्यकीय समाजकार्याचे महत्त्व आपल्याला पुढील घटकांच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

१. रुग्णाची सामाजिक व मानसिक स्थिती जाणून घेणे.

२. रुग्ण व्यक्तीवर असलेला मानसिक तणाव जाणून घेऊन तो दूर करणे.

३. आजाराशी संबंध असणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४. औषधोपचार काळात येणाऱ्या समस्या दूर करणे

५. औषधोपचार योग्य प्रकारे करून घेण्याच्या मार्गातील अडथळे दूर करणे.

६. रुग्णाच्या समस्येवर शास्त्रशुद्ध व पद्धतशीरपणे उत्तर शोधणे.

७. रुग्णाचे मनोबल इच्छाशक्तीचा विकास घडविणे

८. रुग्णाला बरे होण्यास सहाय्यभूत ठरणारे वातावरण निर्माण करणे.

वैद्यकिय समाजकार्यात रुग्णाची पार्श्वभूमी पूर्णपणे समजावून घेतली जाते. त्यानंतर आवश्यक असलेल्या सेवा पुरविल्या जातात. काही सेवा प्रत्यक्ष तर काही सेवा अप्रत्यक्ष स्वरूपाच्या असतात. व्यक्तीसहाय्य सेवांचा पुरवठा केला जातो.

### ५.२.३ वैद्यकीय समाजकार्यकर्ता :

रुग्णाला मिळणाऱ्या सेवांची देखरेख कार्यकर्ता करतो. आवश्यक असलेली माहिती मिळवून रुग्णास आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका समाजकार्यकर्ता करीत असतो. समाजकार्यकर्त्यांचे कार्य रुग्णाच्या मनो-सामाजिक घटकांपर्यंत मर्यादित असते.

रुग्णाला मनो-सामाजिक कारणांमुळे किंवा परिस्थितीमुळे योग्य तेऱ्हेचे उपचार घेण्यास अडथळे येत असतील किंवा उपचार घेणे कठीण होते. त्यावेळी वैद्यकीय समाजकार्यकर्ता

कार्य करतो. रुग्णावर उपचारांचा ज्या कारणामुळे अपेक्षित परिणाम होत नाही. ती कारणे दूर करणे हे समाजकार्यकर्त्यांचे कार्य असते.

वैद्यकीय सेवा घेतल्यानंतर रुग्ण आजारापासून मुक्त व्हावा व पुन्हा आरोग्यविषयक समस्या निर्माण होणार नाहीत अशी परिस्थिती रुग्णाच्या जीवनात असावी याकडे वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता लक्ष देतो. रुग्णाच्या सामाजिक पार्श्वभूमीवर, आजार, उपचार व पुनर्वसनावर वैद्यकीय कार्यकर्त्याचे लक्ष असते. ज्या रुग्णांना आपला आजार माहीत नसतो तो मान्य करण्याची तयारी नसते, त्यांना सातत्याने उपचार घेण्यात मानसिक स्थिती अडचण निर्माण करणे अशा रुग्णांना कार्यकर्ता मदत करतो.

रुग्णाच्या मनातील भीती, दहशत, दडपण दूर करण्याचे कार्य सामाजिक कार्यकर्ता करतो. दवाखान्यातील वातावरणाशी समायोजिक होण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता सहाय्य करतो. रुग्णांचे शारीरिक आजार, मनोआजार व त्यांना होणार्या प्रक्रियांचे ज्ञान कार्यकर्त्यांना असते. या क्षेत्रात शिक्षण संशोधन व जनजागृतीचे कार्यक्रम आखणे हे कार्य समाज कार्यकर्त्याचे असते.

आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी रुग्ण ज्या समुदायातून येतात. ज्या क्षेत्रातून येतात त्या क्षेत्रापर्यंत वैद्यकीय समाज कार्यकर्ता पोहोचतो वैद्यकीय समस्या निर्माण होण्यासाठी जे घटक जबाबदार असतात त्याचे ज्ञान वैद्यकीय कार्यकर्त्याला असते. वैद्यकीय समाज कार्यकर्त्याचे क्षेत्र व्यापक असते. यामध्ये बालक व माता यांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा, विविध आजारांनी पीडित गुप्तरोगी, विविध मनोरुग्णालये, ग्रामीण क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र, क्षयरोग उपचार केंद्र, व्यसनाधीन व्यक्तींवर उपचार करणारी केंद्र इ. घटकांचा समावेश होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) वैद्यकीय समाज कार्यकर्त्याची भूमिका स्पष्ट करा.

## ५.३ कामगार कल्याण

**प्रस्तावना :**

कामगार हा समाजाचा फार मोठा व अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सामाजिक कामगार व त्यांचे जीवन समाजस्थितीचे प्रतीक असतात. कामगार हा समाजाचा व पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कामगारांचे जीवन महत्त्वाचे भाग आहेत. कामाच्या ठिकाणचे जीवन व त्या व्यतिरिक्तचे वैयक्तिक जीवन, कौटूबिक व सामाजिक जीवन या दोन्ही घटकांचा परस्परावर प्रभाव असतो. दोन्ही घटकांच्या कार्यक्षमता एकमेकांना पूरक असतात. कामाच्या ठिकाणी योग्य स्थिती, वातावरण, सोयी सवलती असल्याने कामगारांचे जीवन सुखमय होते. कामाव्यतिरिक्त जीवनात समायोजना, शांतता, सुस्थिती असते. कामगारांच्या गरजा योग्य त्या प्रमाणात पूर्ण होत असतात तेव्हा कामगार कामाच्या ठिकाणी पूर्ण कार्यक्षमतेत आपले ध्यान करतो.

कामगारांमध्ये संघटित कामगार व असंघटित कामगार असे दोन प्रकार आढळून येतात. संघटित कामगार औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रशासकीय क्षेत्रामध्ये काम करणार असतात. तर असंघटित कामगार शेती क्षेत्र , शेती जोड व पुरक उद्योगांचे क्षेत्र मच्छीमार क्षेत्र, मिठागर क्षेत्र, बिडी कामगार, कष्टकरी कामगार इत्यादींचा समावेश होतो. संघटित कामगारांना कामगार कायद्याअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवांचा आर्थिक उपयोग होतो. संघटित कामगारांना लागू होणारे कायदेदेखील आधुनिक काळात निर्माण झाले आहेत. मात्र समाजामध्ये याबाबत फारशी जनजागृती झालेली नाही. समाजकार्याच्या माध्यमातून कामगारांच्या दृष्टिकोनात बदल केल्याने सर्व कामगारांचे कल्याण साधता येईल.

### ५.३.१ कामगार कल्याणाचा अर्थ व व्याख्या :

आपल्या नेहमीच्या व्यावहारिक भाषेत कुशल कामगार व अकुशल कामगार असा उल्लेख केला जातो. शारीरिक श्रमाबरोबर मानसिक श्रम किंवा बौद्धिक श्रम अशी श्रमाची वर्गवारी केली जाते. "परिश्रमिक मिळविण्यासाठी करण्यात आलेल्या सर्व शारीरिक, मानसिक व बौद्धिक प्रयत्नांना श्रम म्हणतात. कोणत्याही प्रकारचे श्रम करत असताना श्रम करत्या व्यक्तीला व त्याच्या कुटुंबाला संरक्षणाचे व सर्वांगीण विकासाचे घटक पुरविले जातात त्याला कल्याण असे म्हणतात. कामाच्या स्वरूपानुसार परिस्थितीनुसार, काळानुसार घटनेनुसार व व्यक्तीनुसार कल्याण या शब्दाच्या अर्थाबाबत अत्यंत तीव्र स्वरूपाचे मतभेद आढळून येतात.

**https://www.dainikchaluwartha.com**

कामगार कल्याण या संज्ञेची निश्चित अशी व्याख्या करण्याचे काम फार अवघड आहे. कामगार कल्याण ही संज्ञा अपरिहार्यपणे लवचिक असल्यामुळे वेगवेगळ्या विद्वानांनी कामगार कल्याणाचा अर्थ व व्याख्या वेगवेगळ्या केलेल्या आहेत.

१. कामगाराच्या शारीरिक, बौद्धिक, नैतिक, आर्थिक व कौटुंबिक प्रगतीकरिता करण्यात आलेली कोणतीही बाब म्हणजे कामगार कल्याण होय.

२. कामगारांना योग्य वातावरणात, परिस्थितीत काम करता यावे म्हणून देण्यात येणाऱ्या सेवा तसेच स्वस्थ सुदृढ ठेवण्यात व मनोबल उंचावण्यास देण्यात येणाऱ्या सेवा व सवलती म्हणजे कामगार कल्याण होय.

३. कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता, सर्वसाधारण सुविधा व कार्यक्षमतेमध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने करण्यात आलेले कार्य म्हणजे कामगार कल्याण होय.

४. कामगारांची काम करण्याची व राहण्याची परिस्थिती, कामगारांचे आरोग्य, शिक्षण व कार्यक्षम यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने आणि कामगारांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रयत्नांना कामगार कल्याण असे म्हणतात.

कायद्याने ठरवून दिल्याप्रमाणे किंवा कल्याणासाठी विकासासाठी सामान्यतः ज्या बाबींची अपेक्षा केली जाते त्या बाबींचा कामगार कल्याणात अंतर्भाव होतो. या बाबी कामगारांना कामाच्या ठिकाणी तसेच अन्यत्रही उपलब्ध करून दिल्या जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१) कामगार कल्याणाचा अर्थ व व्याख्या सांगा.

### ५.३.२ कामगार कल्याणाची तत्त्वे :

कामगार कल्याणाच्या विविध कार्याचा कामगारांवर, मालकांवर आणि पूर्ण समाजावर कोणता परिणाम होतो त्याचा विचार करत असताना कामगारांच्या कल्याणाकरिता त्यांना आवश्यक असलेल्या सोयी व सवलती उपलब्ध करून देण्याची प्रमुख जबाबदारी मालकाची असते. ही जबाबदारी पार पाडतना मालकांनी गामगार कल्याणाच्या तत्त्वाचे योग्यरीतीने पालन केल्यास मालकाने कामगारांना उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांचा अपेक्षित परिणाम घडू शकतो.

१. कामगारांच्या हितासाठी मालकाने काही सवलती दिल्या आहेत म्हणून काही मालक पुरेशा प्रमाणात कामाचा मोबदला देण्याचे टाळतात. कोणत्या परिस्थितीत कामगार कल्याणाचे कार्य हे पुरेशा मजुरीचा पर्याय होऊ शकत नाही. कामगारांना पुरेशी मजुरी न देता मालकाने कामगारांच्या हिताकरिता काही सोयी व सवलती उपलब्ध करून दिल्यास याचा चांगला परिणाम होण्याऐवजी उलट परिणाम होण्याचीच शक्यता आहे.

२. कामगारांच्या कल्याणाकरिता विभिन्न सोयी सवलती उपलब्ध करून देत असताना मालकाने कामगारांना विविध गरजांचा व इच्छेचा विचार करणे अगत्याचे असते. अशिक्षित कामगांराच्या किंवा गरिब कामगारांच्या अनेक गरजा असतात या सर्व गरजा भागविण्याकरिता योग्य ती सोय एकदम करणे कोणत्याही मालकाला कधीच शक्य होत नाही याकरिता कामगारांच्या गरजांची तीव्रता लक्षात घेऊन क्रम ठरविणे आवश्यक असते.

३. मालकाने कामगारांकरिता उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांचा कामगारांनी उपयोग करून घेतलाच पाहिजे अशी त्यांच्यावर शक्ती करणे मुळीच योग्य होणार नाही. कारण अशा सोयींवर कामगारांनी बहिष्कार टाकल्यास कामगार कल्याणाचे मूळ उद्दिष्ट सरळ होऊ शकणार नाही.

४. मालकाने उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा केवळ कामगारांच्या उपयोगाकरिता असतात. कामगार कल्याणासाठी सोयी निर्माण करताना कामगारांच्या प्रतिनिधीचे पूर्ण सहकार्य घेणे आवश्यक असते.

५. कामगार कल्याणाच्या सुविधांचे उद्दिष्ट कामगारांचे कल्याण साधणे हे असते. कामगारांवर कामगार संघटनांचा प्रभाव पडू नये उलट या कामगार संघटनांची कामगारांवर असलेली पकड कमी व्हावी या हेतूने मालकांनी कामगार कल्याणाच्या विविध योजना आणल्या आहेत. त्यामुळे कामगार काम करत असल्याने उत्पादन क्षेत्रात वाढ होऊन उद्योग फायद्यात जातात.

६. कामगारांच्या मनात मानसिक गुलामगिरीची भावना उत्पन्न करावी या विशिष्ट हेतूने काही मालक श्रम कल्याण कार्याचे आयोजन करतात. कामगारांच्या हिताकरिता काही आवश्यक सोयी उपलब्ध केल्यामुळे आपण त्यांच्यावर उपकार करीत आहोत ही कारखानदाराची भावना असेल. तर त्यामुळे सुद्धा श्रम कल्याण कार्याचा अपेक्षित परिणाम होऊ शकत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) कामगार कल्याणाची तत्त्वे स्पष्ट करा.

### ५.३.३ कामगार कल्याणाची व्याप्ती :

कामगार कल्याणाची व्याप्ती मोठी आहे. कामाचे स्वरूप, कामाच्या ठिकाणी असणारे धोके, कामगारांचा निवास आणि राहण्याचे ठिकाण यावरून कामगार कल्याणाची व्याप्ती ठरविली जाते. कामगारांना व कामगारांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना संरक्षण मिळावे. यांच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण व्हावे यासाठी कामगार कल्याणात अनेक गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यामधील महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे -

१) कामगारांना निवासविषयक सोयी उपलब्ध करून देणे.

२) कामगारांना व कुटुंबियांना वैद्यकीय सोयी उपलब्ध करून देणे.

३) कामगारांना विश्रांती गृहाची सोयी करणे.

४) कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या सोयी उपलब्ध करून देणे.

५) कामगारांना खाणावळ व्यवस्था उपलब्ध करून देणे व सवलतीच्या दरात सर्व पदार्थ उपलब्ध करून देणे.

६) कामगारांच्या भविष्याची सोय करणे.

७) कामगाराचा कामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू झाल्यास त्याचा कुटुंबियांना योग्य मोबदला देणे.

८) कामगारांची कार्यक्षमता वाढण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे.

९) अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी तक्रार निवारण कक्ष सुरू करणे.

१०) मुलांच्या शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे किंवा मुलांच्या शिक्षणाचा खर्च उचलणे.

११) कामगारांच्या मुलांसाठी पाळणाघर, मनोरंजन केंद्र, खेळाचे मैदान इ. सोयी उपलब्ध करून देणे.

१२) कामाचे ठिकाण व निवास व्यवस्था यामधील अंतर अधिक असल्यास वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध करू देणे.

असे कल्याणकारी कार्यक्रम कामगारांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन आखले जातात. येथे कामगार महत्त्वाचा मानला जातो. कामगारांच्या खर्या गरजा जाणल्या जातात व त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. कामगार कल्याणाच्या सर्व सुविधा कामगारांना दिल्यास कामगारांकडून समाधानकारक काम केले जाते त्याचे फायदे मालकांना मिळतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) कामगार कल्याणाची व्याप्ती स्पष्ट करा.

**५.३.४ कामगार कल्याणाचे महत्त्व :**

कोणत्याही उत्पादन क्षेत्रात प्रगती करणाऱ्या प्रत्येक देशात कामगार कल्याणाच्या कार्याला विविध दृष्टीने महत्त्व असते. भारतात आजच्या परिस्थितीत कामगार कल्याण कार्याचे महत्त्व खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) कामगारांच्या उपस्थितीत सुधारणा :**

कामाच्या शोधात खेडयातून शहरात आलेल्या कामगारांना रोजगार मिळाल्यानतंर ते अनेक कारणाने खेडयात परत जातात. त्यामुळे कामाच्या उपस्थितीवर त्याचा परिणाम होतो पण अशा कामगारांना कामगार कल्याण अंतर्गत कामाच्या ठिकाणी निवास व्यवस्था करून दिल्यास कामगार नियमित कामावर येऊन त्यांच्या उपस्थितीत सुधारणा होते.

मालकाने कामगारांकरिता स्वतःहून कधी उपलब्ध सोयी व सवलती उपलब्ध करून दिल्यास व कामगारांनी सोयी सवलतीचा उपयोग करून घेतल्यास मालक व कामगार या दोन वर्गातील संबंधामध्ये तणाव निर्माण होत नाही. मालकाच्या प्रति आस्था व सद्भावना आहे. या गोष्टीची व्यवस्थित जाणीव कामगारांना झाली तर मालक-कामगार संबंधांमध्ये सुधारणा होऊन कामगारांच्या भूमिकेमध्ये क्रांतिकारक बदल घडून येतो.

**३. कामगारांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारतो :**

मालकाने कामगारांच्या कल्याणासाठी विविध प्रकारच्या सुविधा निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून दिल्यास कामगारांच्या जीवनमानात निश्चितपणे सुधारणा होते. कामगारांचे उत्पन्न अपुरे असल्यामुळे स्वतःला व कुटुंबाला वैद्यकिय सुविधांचा लाभ घेता येत नाही. मुलांचे शिक्षण पूर्ण करता येत नाही. इतर आवश्यक सुविधा प्राप्त करण्याकरिता असमर्थ ठरतात. मालकाने कामगारांकरिता या सुविधा उपलब्ध करून दिल्यास कोणताही खर्च न करता कामगार आपल्या जीवनमानात सुधारणा करू शकतो.

**४) कामगारांच्या कार्यक्षमतेत सुधारणा :**

कामगार कल्याणाच्या विविध कार्याचे योग्य रीतीने नियोजन व संचालन करण्यात आल्यास कामगारांना त्याचे अनेक फायदे सहजपणे प्राप्त होतात. त्यामुळे कामगारांच्या

कार्यक्षमतेमध्ये वाढ घडून येते. कामगारांची वाढलेली कार्यक्षमता उत्पादनाच्या पातळीत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे मालकाला त्याचा आधिक फायदा मिळतो.

**५) कामगारांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास :**

कामगार कल्याणाच्या विविध उपक्रमांमुळे कामगारांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्याकरिता आवश्यक असलेल्या वातावरणाची निर्मिती होते. कामगार कल्याण कार्य म्हणजे केवळ कामगारांना आवश्यक असलेल्या विविध सोयींची उपलब्धता एवढेच नव्हे. कामगार कल्याणाच्या उपक्रमांमुळे कामगारांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास तर घडून येतोच पण शिवाय रचनात्मक पद्धतीने विचार कसा करावा हे सुद्धा त्यांना समजू लागते.

**६) कामगारांचे मनोबल वाढते :**

कामगारांच्या संदर्भात मनोबल म्हणजे कामगारांची स्वतःची जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व परिश्रम करण्याची इच्छा व तयारी असा होतो. कामगार हा विशिष्ट समूहाचा घटक असल्यामुळे कामाच्या ठिकाणी व बाहेर सामाजिक जीवन जगत असतो. कामगार कल्याण उपक्रमातून आपल्या गरजा पूर्ण होत असतील तर त्याचे सामाजिक इतर प्रतिष्ठा उंचावते. त्यामुळे मनोबल उंचावते. त्याचा उत्पादकतेवर अनुकूल परिणाम होतो.

**७) वर्ग कलहाच्या तीव्रतेमध्ये घट होते :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वर्गकलह अपरिहार्य असतो हे कार्यमार्क्स यांनी प्रतिपादन केलेले मुख्य सूत्र आहे. जेव्हा मालक कामगारांच्या प्रति आपल्या जबाबदाऱ्या टाळतात आणि कामगारांचे शोषण करून स्वतःचा आर्थिक विकास साधतात तेव्हा वर्ग कलह वाढत जातो. पण मालकाने कामगारांच्या कल्याणाकरिता निरनिराळ्या उपक्रमांची सुरुवात केली की आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साधून मालक-कामगार वर्ग कलह निश्चितपणे कमी करता येतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) कामगार कल्याणाचे महत्त्व सांगा.

## ५.४ अपराध व सुधारात्मक सेवा

कायद्याच्या विरोधात वागणाऱ्या समाजातील व्यक्तींमुळे समाजात समस्या घातक प्रवृत्ती निर्माण होतात. त्यांच्या पासून समाजाचे संरक्षण करण्याकरिता ज्या व्यवस्था केल्या जातात त्याला सामाजिक सुरक्षा म्हणतात.

समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती, बालगुन्हेगार अनैतिक कामात गुंतलेल्या स्त्रिया, वेश्या, अविवाहित माता, पळून गेलेली मुलेमुली, भिक्षेकरी यांचा व त्यांच्या संदर्भातील कामाचा यात समावेश होतो. समाज मान्यतेच्या विरोधात वागणार्यांना असे वागण्यापासून रोखते व जे अशी प्रवृत्ती करतात त्यांच्यात सुधारणा साधणे, त्यांच्यात परिवर्तन आणणे हे कार्य ज्या क्षेत्रा अंतर्गत केले जाते त्याला सुधारात्मक सेवा असे म्हटले जाते.

सुधारात्मक सेवांमध्ये शिक्षेपेक्षा सुधारणेवर लक्ष केंद्रित केले जाते. अशा समाजविरोधी वागण्याची कारणे समजून घेतली जातात. त्यासाठी व्यक्ती आणि तिच्या वातावरणाचा अभ्यास केला जातो. वातावरणाच्या संभाव्य निष्ठा जाणून घेतल्या जातात. व्यक्तीच्या वर्तनात सुधारणा करून व्यक्तीचे संपूर्ण पूनर्वसन घडविले जाते. व्यक्तीला असामाजिक वर्तन करण्यास प्रवृत्त करणाऱ्या परिस्थितीमध्ये सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला जातो.

**५.४.१ सुधारात्मक सेवा :**

**१) अपराध्यांना सेवा :**

अपराध्यांना दिल्या जाणाऱ्या सेवामध्ये कल्याणकारी सेवा मुक्त कारागृह पॅरोल, पुनर्वसनात्मक सेवा इत्यादी घटकांचा समावेश होतो.

**२) बाल अपराध्यांना सेवा :**

बाल अपराध्यांच्या सेवामध्ये बाल न्यायालय निरीक्षण गृह, संरक्षण गृह, संरक्षक वसतिगृह, संरक्षित कर्मशाळा, बाल सुधारगृह इत्यादी घटकांचा समावेश होतो.

**३) वेश्यांना व संकटग्रस्त स्त्रियांना सेवा :**

स्त्रियांच्या सुधारात्मक क्षेत्रामध्ये पुनर्वसन सेवा स्टेट होम, स्वयंरोजगार निर्मितीचे केंद्र इत्यादी स्वरूपाच्या पुनर्वसनात्मक सेवा दिल्या जातात.

**४) भिक्षेकऱ्यांना सेवा :**

भिक्षेकऱ्यांच्या पुनर्वसन सेवेमध्ये त्यांच्या वयानुसार सेवांचा पूरवठा केला जातो भिक्षेकरी लहान मुले असतील तर त्यांना संरक्षित कर्मशाळेत ठेवले जाते. त्यांना शिक्षण देण्याचे कार्य केले जाते इतर भिक्षेकऱ्यांना रिसिष्टिंग सेंटर पुनर्वसन केंद्र इत्यादी सेवा दिल्या जातात.

समाजाचे प्रस्थापित कायदे मोडणाऱ्या व असामाजिक रीतीने वागणाऱ्या व्यक्तीला अटक केल्यापासून होते. व्यक्तीचे संपूर्ण पुनर्वसन होईपर्यंत ते सूरू राहते. जेथे अपराध समाज विघातक वर्तन यांना आजार मानले जाते. त्याला कारणे असणाऱ्या कमकुवत बुद्धीचा अयोग्य वातावरणाचा, दारिद्र्याचा विचार केला जातो. अशा व्यक्तींचे पुनर्वसन करून त्यांना समाज उपयोगी बनवले जाते. समाजाचे जबाबदार नागरिक होण्यास आवश्यक वातावरण निर्माण केले जाते. कारण या व्यक्ती समाजाचे घटक असतात.

अपराध व सुधारात्मक सेवा पुरवणारा कार्यकर्ता कायदा व विशेषतः सामाजिक न्याय जाणणारा असतो. सुधार व पुनर्वसन हे त्याचे कार्यक्षेत्र असते. शिक्षेच्या क्षेत्रात शिक्षेतून सुधारणा घडविण्यास अनुकूल परिस्थिती कार्यकर्ता निर्माण करतो. समस्या निर्माण करणारी परिस्थिती जाणून त्याचे विश्लेषण करून कार्यकर्ता प्रतिबंधात्मक उपचारात्मक सेवा देतो. मानवाचा अभ्यासक असणारा कार्यकर्ता व्यक्तीचे संपूर्ण पुनर्वसन करतो. अयोग्य वर्तनास अटकाव करणे, रोखणे, सुधारणे, योग्य दिशा देणे व शिक्षा देणे ही त्याची कामे असतात. येथे गुन्हा किंवा समाजविरोधी वर्तनाला आजार मानला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१) अपराध व सुधारात्मक सेवा यावर टीपण लिहा.

## ५.५ सारांश

समाज हा परिवर्तनशील आहे. समाजात सतत बदल होत असतात. समाजाची प्रगती होत असली तरी समाजात अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. सामाजिक समस्यांचे स्वरूपदेखील समाज परिवर्तनाप्रमाणे बदलत आहे. त्यामुळे समाज कार्याची व्याप्ती वाढत आहे. स्वयंसेवी समाजकार्याबरोबर व्यावसायिक समाज कार्याचा उदय झाला आहे. समाज कार्य एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार समाजकार्याच्या क्षेत्रात बदल झालेला दिसून येतो. कुटुंब कल्याण, बाल कल्याण, युवक कल्याण, महिला कल्याण, वृद्ध कल्याण, अपंग कल्याण, कामगार कल्याण अशी अनेक समाजकार्याची क्षेत्रे उदयास आली आहेत. वैद्यकीय चिकित्सा व सुधार क्षेत्र यामध्येदेखील समाज कार्याचे महत्त्व वाढत आहे.

वैद्यकीय क्षेत्रात मोठया प्रमाणात प्रगती झाली असली तरी वैद्यकीय सुविधा प्राप्त करून घेण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. सर्वसामान्य समाजाला हा खर्च न परवडण्यासारखा आहे. म्हणून वैद्यकीय क्षेत्रात समाज कार्याला खूप मोठी संधी आहे. वैद्यकीय क्षेत्रातील समाजकार्याचे महत्त्व वाढत आहे. वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे समाजकार्यकर्ते उदयास आले आहेत. आपल्या देशातील औद्योगिक विकासाबरोबर ग्रामीण भागात रोजगारीच्या संधी वाढत आहेत. उत्पादन क्षेत्रात मालक आणि कामगार असे दोन घटक महत्त्वाचे आहेत. मालक अधिक संपत्ती मिरवण्याच्या नादात कामगार कल्याणाकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे म्हणून समाजसेवचे कामगार कल्याण क्षेत्र निर्माण झाले आहे. कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी या क्षेत्रातदेखील समाज कार्याची संधी निर्माण झाली आहे. कामगारांना व कुटुंबियांना मूलभूत सुविधा प्राप्त करून देण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार समाजात गुन्हेगारी प्रवृती फोफावत आहे. दिवसेंदिवस अपराधांचे प्रमाण वाढत आहेत. अत्याचार होत आहेत. अशा विविध प्रकारच्या अपराध्यांना शिक्षा करण्याच्या हेतूने व अपराधाचे स्वरूप पाहून सुधारण्याच्या संधी देण्यासाठी समाजकार्याचे हे क्षेत्र निर्माण झाले आहे.

## ५.७ स्वाध्याय

१) वैद्यकीय समाजकार्याचे सविस्तर वर्णन करा.

२) समाजकार्यातील वैद्यकीय पद्धतीचे स्पष्टीकरण करा.

३) वैद्यकीय समाजकार्याची व्याख्या सांगून त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

४) अपराध व सुधार क्षेत्राचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

५) कामगार कल्याणाचा अर्थ सांगून कामगार कल्याणाची तत्त्वे स्पष्ट करा.

६) अपराध व सुधारात्मक क्षेत्राची सविस्तर माहिती द्या.

७) वैद्यकीय समाजकार्यातील समाज कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट करा.

## ५.६ संदर्भ सूची

१) प्राजक्ता टाकसाळे, व्यावसायिक समाजकार्य विचारधारा व इतिहास

२) रा. ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे आणि पद्धती नवी रामदेसपेठ, नागपूर, ४४००१०.

३) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

४) प्रभाकर देशमुख श्रमाचे अर्थशास्त्र विद्या प्रकाशन नागपूर, ४४०००२.

❖❖❖❖

# ६

# व्यक्तीकार्य व गटकार्य

**घटक रचना :**

६. ० पाठाचे उद्देश

६.१ प्रस्तावना

६.२ समाजकार्याच्या पद्धती

६.३ व्यक्ती कार्य

६.४ गटकार्य

६.५ सारांश

६.६ स्वाध्याय.

६.७ संदर्भ सूची

## ६.० पाठाचे उद्देश

समाजकार्याच्या विविध पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. समाज कार्याच्या पद्धती अभ्यासणे

२. व्यक्तीकार्याच्या व्याख्या अभ्यासणे

३. व्यक्तीकार्याचे उद्देश अभ्यासणे

४. व्यक्तीकार्याचे घटक समजावून घेणे

५. व्यक्तीकार्य प्रकियेच्या पायऱ्या अभ्यासणे

६. गटककार्याचा अर्थ समजावून घेणे

७. गटकार्याचे उद्देश समजावून घेणे

## ६.१ प्रस्तावना

समाजकार्याचा अभ्यास विषय तसेच कार्यक्षेत्र समाज हा आहे. समाजाचे स्वरूप, गरजा आणि समस्या समाजकार्य करताना विचारात घेतल्या जातात. समाजाच्या गरजा ज्या घटकामुळे विशिष्ट रूप धारण करतात. त्यामुळे समाजात समस्या निर्माण होतात. त्याचा

विचार समाजकार्य करताना केला जातो. रंजलेले-गांजलेले दु:खी-कष्टी दुबळे लोक अथवा जनसमूह यांना खासगी अथवा सार्वजनिक रीत्या मदतीप्रीत्यर्थ पुरविलेली सेवा. विसाव्या शतकात सामाजिक बांधीलकीच्या कल्पना प्रसृत व विकसित झाल्यानंतर, ही संकल्पना प्रामुख्याने भरभराटीस आली व विकसित झाली; तथापि यूरोपमध्ये खासगी औदार्याला संघटित आणि संस्थात्मक स्वरूप देण्याचे प्रयत्न इंग्लिश पुअर लॉव्दारे इ. स.१६०१ मध्ये करण्यात आले. ही कृती रास्त आणि न्याय असली, तरी तिचा प्रत्यक्षात विकास गेट बिटन, जर्मनी आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशांत एकोणिसाव्या शतकात झाला. समाजाच्या हितासाठी व विकासार्थ असलेली ही संकल्पना मोठी व व्यापक आहे.

सध्याच्या युगात व्यावसायिक समाज कार्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे समाजकार्याची व्यापी सतत वाढत आहे. व्यावसायिक समाज कार्याच्या एकूण सहा पद्धती आहेत त्यामध्ये व्यक्तीकार्य व्यक्तीला सेवा देण्याची एक प्राथमिक पद्धत आहे. ही सेवा सर्व प्रकारच्या सामान्य व्यक्तींसाठी उपलब्ध असते. व्यक्ती जीवन सुखी, समाधानी व समृद्ध व्हावे हा व्यक्तीकार्यामागील हेतू असतो.

व्यक्तिकार्याबरोबर गटकार्य हादेखील व्यावसायिक समाजकार्यात महत्त्वाचा घटक आहे. गट हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. समाजात जगण्याची इच्छा असणारा, गरज असणारा, समाजात जगण्याची आवड असणारा मानव कधीही एकटा राहू शकत नाही. समाजातील विशिष्ट गटामध्ये विविध स्वरूपाच्या समस्या निर्माण होत असतात या समस्या सोडविण्यामध्ये समाजकार्यकर्ता भूमिका पार पाडत असतो.

## ६.२ समाजकार्याच्या पद्धती

समाजकार्याच्या एकूण सहा पद्धती आहेत या पद्धतींचा एकवार विचार करणे आवश्यक आहे. या पद्धतींमध्ये समाविष्ट असणाऱ्या मूलभूत तत्वाचा अभ्यास करणे व ती समाजावून घेणे समाजकार्यकर्त्यास अतिशय आवश्यक आहे. तसेच ते लोकांना त्यांचे जीवन अधिक समाधानकारक जगण्यासाठी मदत करण्याचे मूळ तत्त्व आहे. म्हणून समाजकार्याच्या सहा पद्धती समाजावून घेणे आवश्यक आहेत.

### १) सामाजिक व्यक्तीकार्य :

प्रत्येक व्यक्ती त्याच्या सामाजिक, आर्थिक व शारीरिक वातावरणाला वेगवेगळ्या प्रतिक्रिया देते. आणि त्यामुळे एका व्यक्तीची समस्या व्यक्तीच्यापासून भिन्न असते. समाजकार्य क्षेत्रात व्यक्तीकार्याद्वारे वैयक्तिक सेवा देण्यात येतात. जेणेकरून व्यक्तीला तिच्या वातावरणाशी समायोजना साधण्यासाठी मदत प्राप्त होते.

### २) सामाजिक गटकार्य :

गटाच्या माध्यमातून व्यक्तीला समाजात सहसंबंध प्रस्थापित करण्यास त्यातून विकासाच्या संधीचा लाभ घेण्यास व विकास साधण्यास मदत केली जाते. सहसंबंध प्रस्थापित करण्याच्या क्षमतेचा विकास होण्यास व संधीचा उपयोग करण्यास गटाचा, गटात होणाऱ्या कार्याचा, कार्यक्रमांचा, गटातील वातावरणाचा, गटसंबंधाचा उपयोग केला जातो.

**३) समुदाय संघटन :**

यात समुदायावर कार्याचे लक्ष केंद्रित केले जाते. समुदायाला संघटित करून स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यास, समस्या सोडविण्यास सहाय्य केले जाते.

**४) सामाजिक क्रिया :**

संपूर्ण समाज किंवा समाजाच्या मोठया भागाला भेडसावणाऱ्या समस्येला संघटितरीत्या संपूर्ण समाजाच्या सहकार्याने उत्तर शोधण्याचे कार्य या पद्धतीच्या अंतर्गत केले आते.

**५) सामाजिक संशोधन :**

सामाजिक समस्या समजण्यासाठी मूलभूत सांख्यिकी माहितीचा शोध या पद्धतीद्वारे घेतला जातो. त्यामुळे वस्तुस्थिती व गरजेवर आधारित कार्य करणे सुलभ जाते.

**६) सामाजिक कल्याण प्रशासन :**

समाजकार्याच्या व्यवस्थापिक व आर्थिक बाजूंची देखरेख या पद्धतीद्वारे होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाज कार्याच्या पद्धती सांगा.

## ६.३ व्यक्तीकार्य

व्यक्ती समाज कार्याचा केंद्रबिंदू आहे. व्यक्ती हा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीमुळे समाज आहे. व्यक्ती समाजात अनेक भूमिका पार पाडते या भूमिका जोपर्यंत व्यक्ती सुव्यवस्थित पार पाडते तोपर्यंत तिचे जीवन सुखी असते, परंतु जेव्हा अपेक्षेप्रमाणे भूमिका पार पाडल्या जात नाहीत तेव्हा तिचा परिणाम व्यक्तीच्या नातेसंबंधावर होतो व समस्या निर्माण होतात. नातेसंबंधाचे व्यक्तीच्या जीवनात महत्त्व असते. व्यक्तीच्या विकासात समस्यांचे अडथळे येण्याने विकास थांबतो. समस्या व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहाराला प्रतिकूलपणे प्रभावित करतात व प्रसंगी इतरांच्या विकासातही बाधा निर्माण करतात.

व्यक्ती समाजशील असल्याने समाजाशिवाय तिचे अस्तित्व नाही . व्यक्ती जशी असेल तसा समाज असतो. समाजाच्या स्वरुपावर व्यक्तीचे स्वरूप अवलंबून असते म्हणून समाजाच्या प्रगतीसाठी व्यक्तीची प्रगती होणे आवश्यक असते. समाजात योग्य स्वरूपाच्या व्यक्ती असाव्या या उद्देशाने व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून व्यक्तीला सहाय्य करणारी समाजकार्याची व्यक्तीकार्य पद्धती आहे.

मदतीची गरज असणाऱ्या अनेक व्यक्ती समाजात असतात. त्यातील ज्या व्यक्तींची विविध निकषांच्या आधारे व्यक्ती कार्याकरिता निवड केली जाते त्या व्यक्तीकार्याच्या सेवार्थी होतात. ह्या सेवार्थी व्यक्ती वैशिष्टयपूर्ण असतात. त्यांची मानसिकता, त्यांच्या समस्या मनोवृत्ती गरजा वेगळ्या असतात. तिचा विविध पैलूंतून संपूर्ण अभ्यास केला जातो. तिला कोणती मदत करता येईल व कोणती मदत आवश्यक आहे. याचा शोध घेतला जातो. नंतर मदतीची रूपरेषा कार्यक्षेत्र ठरते.

### ६.३.१ व्यक्तीकार्यांच्या व्याख्या :

व्यक्तीकार्य हा समाजकार्याची पद्धती असल्याने समाजकार्याच्या व्याख्येचा संदर्भ येथे घेता येतो. व्यक्तीकार्याच्या व्याख्या वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळ्या प्रकारे केल्या आहेत. त्यातील काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

“सामाजिक समायोजन करताना येणाऱ्या ज्या समस्यांना व्यक्ती आपल्या प्रयत्नाने समाधानकारकरीत्या हाताळू शकत नाही. ज्या समस्यांचे आपल्या प्रयत्नांनी सोडवू शकत नाही त्या समस्यांचे समाधान शोधण्याकरिता जी पद्धती समाजकार्यकर्ते उपयोगात आणतात. त्या पद्धतीला व्यक्तीकार्य असे म्हणतात.

**फ्लोरेन्स हॉलीस :**

एक एक मानव व त्यांचे सामाजिक वातावरण यांच्यातील समायोजनाला जाणीवपूर्वक प्रभावित करून या द्वारे व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविणार्या प्रकियांचा समाजकार्यात अवलंब करणे म्हणजे व्यक्तीकार्य होय.

**मेरी रिचनंड :**

माणूस ज्या समाजात, ज्या वातावरणात, ज्या जगात राहतो त्यातील व्यवस्थेमुळे त्यातील परिस्थितीतून काही समस्या निर्माण होतात. अशा समस्यांपैकी काही समस्या सोडविण्यात एका व्यक्तीने म्हणजेच कार्यकर्त्याने व्यक्तीकार्याच्या पद्धतीने दुसऱ्या व्यक्तीला म्हणजेच सेवार्थीला केलेली मदत म्हणजे व्यक्तीकार्य होय.

व्यक्तीला तिच्या सामाजिक समायोजनात इतरांशी होणाऱ्या आंतरक्रियात परस्पर सहसंबंधात समस्या उद्भवतात. या समस्या अशा असतात की त्यांना योग्य प्रकारे समाधानकारकपणे स्वतःच्या प्रयत्नांनी उत्तर देणे व्यक्तीला शक्य नसते. व्यक्ती या समस्यांना तोंड देऊ शकत नाही. समस्यांचा सामना तिला करता येत नाही अशा समस्यांना तोंड देण्यास प्रदान केलेली मदत म्हणजे व्यक्तीकार्य होय.

वरील व्याख्यावरून हे स्पष्ट होते की, एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला मदत करते. पहिली व्यक्ती ही समाजकार्यकर्ता असते तर दुसरी व्यक्ती म्हणजे समस्या असणारा सेवार्थी असतो. व्यक्तीला म्हणजे सेवार्थीला तिच्या परिस्थितीमुळे, सभोवतालच्या वातावरणातील परिस्थितीमुळे समाजातील घटनांमूळे इतरांशी होणाऱ्या आंतरक्रियांमुळे समस्या निर्माण झालेल्या असतात. या समस्या सोडविण्यासाठी स्वतःचे प्रयत्न अपुरे पडतात तेव्हा व्यक्तीकार्यात समाज कार्यकर्ता हस्तक्षेप करतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यक्ती कार्याच्या व्याख्या स्पष्ट करा.

### ६.३.२ व्यक्तीकार्याचे उद्देश :

व्यक्तीकार्याचे उद्देश समाजकार्याच्या मूलभूत उद्देशातून निर्माण होतात. समाजातील वेगवेगळ्या समस्याग्रस्त व्यक्तींच्या समस्या सोडवून व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे व्यक्ती कार्यात अपेक्षित आहे. म्हणून व्यक्तीकार्याचे आपल्याला पुढीलप्रमाणे उद्देश सांगता येतील.

व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविताना प्रामुख्याने मनो-सामाजिक विकास अपेक्षित असतो. शारीरिक, बैाद्धिक, नैतिक, आर्थिक विकास अशा विकासाच्या वेगवेगळ्या पैलूंबाबत कार्य करताना या पैलूंच्या मनो-सामाजिक विकासाची बाजू लक्षात घेतली जाते. विकासासाठी विविध कलागुण क्षमतांचा विकास घडविणे आवश्यक असते.

१. **व्यक्तीच्या समस्या सोडविणे :** इतरांच्या मदतीशिवाय ज्या समस्या सोडविणे किंवा परिस्थिती हाताळणे, परिस्थितीशी सामना करणे व्यक्तीला शक्य नसते त्या समस्यांचा सामना करण्यात व्यक्तीला मदत करणे, समस्या सोडविण्यासाठी व्यक्तीला सक्षम करणे .

२. स्वतःच्या भूमिका पार पाडण्यास व्यक्तीला सक्षम करणे, इतरांशी सुयोग्य सहसंबंधी निर्माण करण्यास सक्षम करणे, समाजात समायोजना करण्याच्या क्षमतांचा विकास घडविणे स्वतःच्या समस्या व्यक्ती स्वतः ओळखू शकेल त्या दूर करेल इतकी तिची क्षमता विकसित करणे, स्वतःच्या भूमिका पार पाडण्यात भूमिकेनुसार वागण्यात येणारे अडथळे दूर करण्यास सक्षम करणे.

३. **व्यक्तीच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे :** व्यक्ती विकासासाठी सभोवतालचे वातावरण पोषक असावे लागते. यामध्ये व्यक्तीच्या कुटुंबातील वातावरण व्यक्ती ज्या समाजात राहतो तेथील वातावरण किंवा ज्या विभागात राहतो तेथील वातावरण व्यक्ती विकासाला अनुकूल करण्यासाठी व्यक्तीत सकारात्मक दृष्टी निर्माण करणे हा व्यक्तीकार्याचा मुख्य उद्देश असतो.

४. **व्यक्तीच्या जीवनात समाधान व आनंद निर्माण करणे :** समस्याग्रस्त व्यक्तीच्या जीवनात समाधान निर्माण होईल पुन्हा समस्या उद्भवणार नाहीत यासाठी त्या व्यक्तीमध्ये क्षमता विकसित करणे व्यक्तीच्या दृष्टिकोनाबद्दल घडवून आणणे व्यक्तीच्या जीवनात आनंद निर्माण होईल अशा प्रकारचे पोषक वातावरण तयार करणे.

५. व्यक्तीचा विकास वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतो यामध्ये शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्थिती हे घटक महत्त्वाचे आहेत. मात्र आर्थिक स्थितीचा बरा-वाईट परिणाम व्यक्ती विकासावर होत असतो. म्हणून आर्थिक विकासाचे मार्ग सुचविणे, अवलंब करण्यासाठी सक्षम करणे किंवा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा व्यक्तीकार्याचा उद्देश असतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यक्तीकार्याचे उद्देश स्पष्ट करा.

### ६.३.३ व्यक्तीकार्याचे घटक :

व्यक्तीकार्याचे चार घटक आहेत. यामध्ये व्यक्ती समस्या, स्थान व प्रक्रिया यांचा समावेश होतो.

**१) व्यक्ती :**

समस्याग्रस्त व्यक्तीला व्यक्तीकार्य सेवेसाठी स्वीकारल्यानंतर तिला सेवार्थी म्हटले जाते. व्यक्ती मानव असते. व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सिद्धांत व तत्त्वज्ञानावर आधारित असतो. व्यक्ती समस्याग्रस्त व गरजू असते. दडपण अज्ञात, विशिष्ट मानसिकता, इच्छाशक्तीचा अभाव यामुळे तिची इच्छाशक्ती खुंटलेली असते. तिच्या प्रयत्नात परिपूर्णता नसते. नकारात्मक मनोभावना निर्माण झालेली असते. समस्या सोडविण्याचा मार्ग सापडत नाही. अशा वेळी व्यक्तीच्या समस्येची पार्श्वभूमी जाणून घ्यावी लागते. व्यक्तीचे सहकार्य, सहभाग मिळवावा लागतो. व्यक्तीच्या स्वतःच्या अपेक्षा लक्षात घेणे आवश्यक असते.

**२) समस्या :**

समस्या म्हणजे जीवन सुखी, समाधानी होण्याच्या मार्गातील अडसर होय. समस्या म्हणजे प्रगतीत निर्माण होणारे अडथळे होय. समस्या प्रत्येकाला असतातच, समस्यांना अनेक घटक कारणीभूत असतात. त्यामुळे मूळ कारण जाणून घेणे आवश्यक असते. प्रत्येक समस्येला उत्तर असते. समस्या सुरुवातीला साध्या, सोप्या, सरळ व लक्षण स्वरूपाच्या असतात. पण त्याकडे योग्य वेळी, योग्य प्रकारे लक्ष न पुरविले गेल्यास त्या वाढतात, क्लिष्ट होतात, गंभीर स्वरूप धारण करतात. त्यामध्ये कौटुंबिक समस्या, बालविकासाच्या समस्या, वृद्धाच्या समस्या, अपंगत्वाच्या समस्या, व्यसनाधीनतेच्या समस्या, आर्थिक समस्या, व्यावसायिक समस्या इ. समावेश होतो. पण जेव्हा या समस्या सोडविण्याच्या प्रयत्नांना यश येत नाही तेव्हा मदतीकरता तज्ज्ञ म्हणून समाज कार्यकर्त्यांची मदत घेतली जाते.

**३) स्थान :**

सेवा पुरवणारी संस्थां किंवा व्यक्ती म्हणजे स्थान होय, त्यांचा संपूर्ण सेवा कामावर प्रभाव असतो. त्याच्या कार्यप्रणालीनूसार व्याप्तीनूसार, उद्देशानुसार नीतिनियमानुसार सेवा पुरविल्या जातात सेवा पुरविणारा कार्यकर्ता असतो. एकाच प्रकारच्या सेवा देणार्या एकापेक्षा जास्त संस्थां किंवा व्यक्ती असतात. सेवार्थी व कार्यकर्ता त्यांच्या संबंधावर कार्यकर्त्याचा कामाचा प्रभाव असतो.

**४) प्रक्रिया :**

समाजकार्य ही एक प्रक्रिया आहे. हे कार्य विशिष्ट पद्धतीने व टप्प्याटप्प्यांनी केले जाते. आकलन व विश्लेषण करून मदत कार्य केले जाते. निरीक्षण तथ्य संकलन निदान करून मदतीची रूपरेषा ठरते यामध्ये प्रमुख चार तत्त्वे मानले जातात. अर्थात हे तत्त्वे परस्पर पूरक असतात. एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. अभ्यास, निदान, उपचार व अनुसरण या चार टप्प्यांवर प्रक्रिया चालू असते. समाज कार्यकर्ता व्यक्तीला समजावून घेऊन गरजूंच्या सहानुभूतीने विचार करतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यक्तीकार्याचे घटक सांगा.

## ६.३.४ व्यक्तीकार्य क्रियेच्या पायऱ्या :

व्यक्तीकार्य क्रियेच्या एकूण चार पायऱ्या आहेत. यामध्ये अभ्यास, निदान उपचार व अनुसरण अशा व्यक्तीकार्याच्या पायऱ्या मानल्या जातात. समस्याग्रस्त व्यक्तीच्या समस्या जाणून घेतल्यानंतर क्रमाक्रमाने व्यक्ती कार्याला सुरुवात होते. समस्याग्रस्त व्यक्तीला ताबडतोब मदत केली जात नाही तर तिच्या समस्या जाणून घेतल्या जातात. त्यानुसार पुढच्या कार्याची रूपरेषा ठरविली जाते. म्हणून व्यक्तीकार्य प्रक्रियेत खालील पायऱ्या महत्त्वाच्या मानल्या जातात.

### १. अभ्यास :

व्यक्तीकार्य क्रियेतील हा पहिला टप्पा किंवा पायरी समजली जाते. प्रथम टप्प्यावर व्यक्तीला, समस्येला, वातावरणाला, व्यक्तीच्या विचारांना दृष्टिकोनाला सर्व पैलूंतून जाणून घेतले जाते. विविध मार्गाने हा अभ्यास केला जातो. याला समस्याग्रस्त व्यक्तीचा अभ्यास करणे असे म्हटले जाते.

### २. निदान :

संपूर्ण अभ्यासानंतर ज्ञानाच्या आधारे नेमकी समस्या काय काय आहे याचे आकलन होते. या निदानाच्या टप्प्यावर सेवार्थीचा सक्रिय सहभाग अनिवार्य असतो. सर्व दृष्टीने विचार करून निदान केले जात असल्याने नेमकी समस्याग्रस्त व्यक्तीला कोणती समस्या निर्माण झाली आहे हे अचूक कळते.

### ३. उपचार :

सेवार्थी व्यक्तीला नेमकी समस्या कोणती आहे याचे निदान झाल्यानंतर प्रत्यक्ष मदत कार्य म्हणजेच उपचार सूरु होतात. समस्या समाधानाचे उद्देश प्राप्त करण्याचे कार्य उपचारामध्ये सुरू होते, उपचार ठरविण्यात त्याचा उपयोग करण्यात सेवार्थीचा सहभाग असल्याने अपेक्षित परिणाम होतात. उपचार सुरू असताना होणाऱ्या बदलांचा सेवार्थीकडून व इतर संबंधितांकडून स्वेच्छेने स्वीकार होतो. उपचारात समाजकार्य ज्ञानाचा सहाय्यकारी शास्त्रांच्या ज्ञानाचा उपचार पद्धतींचा उपयोग होतो.

### ४. अनुसरण :

उपचाराने होणारे परिवर्तन पडताळणी व ते स्थायी स्वरूपाचे झाले किंवा नाही हे पाहणे म्हणजे अनुसरण होय. खऱ्या अर्थाने बदल झाला व तो स्वीकारला गेला. असे अनुसरणात आढळते तर व्यक्तीकार्याचे उद्देश प्राप्त झाले हे स्पष्ट होते. उपचाराने पुनर्वसन अपेक्षित असल्यास पुनर्वसनाची स्थिती अनुसरणात तपासली जाते. व्यक्ती सबळ झाली. आपली जबाबदारी पेलण्यास सक्षम झाली आपल्या भूमिका अपेक्षित रीतीने पार पाडू लागली, अशा बाबींची पडताळणी अनुसरणात होते. कारण व्यक्ती सहाय्य कामातील मदत किंवा उपचार ह्या उद्देशाने केले जातात. केलेल्या कामाची पूनर्तपासणी मूल्यांकन अनुसरणात होते.

व्यक्ती सकारात्मक बाजूने विचार करू लागते पर्यायाने स्वयंपूर्ण व स्वावलंबी झालेली दिसते तेव्हा व्यक्तीकार्याची व कार्यकर्त्याच्या सहाय्याची गरज व्यक्तीला उरलेली नाही हे स्पष्ट होते. कोणत्याही सहाय्याशिवाय विकास करण्याची व्यक्तीची शक्ती निर्माण होते तेव्हा समाजकार्यकर्ता त्या व्यक्तीचे व्यक्तीकार्य संपवतो

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यक्तीकार्य प्रक्रियेच्या पायऱ्या सांगा.

## ६.४ गटकार्य

गटकार्य ही समाजकार्य करण्याची एक पद्धती आहे. मानव हा समाजशील प्राणी आहे. मानव एकटा राहू शकत नाही. तो कुटुंब समाज समूह इ. मधून वाढतो. समूहजीवन हे मानव जीवनाचे मूलभूत अंग आहे. समूह म्हणजे एकमेकांसोबत वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी एकत्रित आलेल्या सामाजिक जीवन प्राण्यांचा गट. सारखे हितसंबध जोपासणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन गट तयार होतो. म्हणून समाज कार्याचे दुसरे महत्त्वाचे क्षेत्र गटकार्य समजले जाते.

गट हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. सजीवाचे मानवात रूपांतर करण्याची असीम शक्ती गटात असते. समाजात जगण्याची इच्छा असणारा, गरज असणारा व समाजात जगण्याची आवड असणारा मानव कधीही एकटा राहू शकत नाही. समाजात राहण्याची योग्यता प्राप्त करणे ही प्रत्येक मानवाची गरज असते. ही गरज पूर्ण करताना गट आपली कार्यकरून एक समाजशील मानव निर्माण करतो. गटात व्यक्ती एकत्र येत असताना त्यांच्यात सहसंबंध असतात. देवाणघेवाण होते. प्रतिसाद दिले व घेतले जातात.

नैसर्गिकरीत्या ज्यापद्धतीने मानवाने गट तयार झालेले असतात त्याचप्रमाणे समान समस्या असणाऱ्या व्यक्तींचे गटदेखील तयार झालेले असतात. आपल्या समस्या एकत्रितरित्या सोडविण्याचे प्रयत्न गटाच्या माध्यमातून केले जातात. गटाला आपल्या समस्या सोडविणे शक्य नसते तेव्हा त्यांना कोणाच्या तरी मदतीची आवश्यकता असते. अशा वेळी गटकार्यकर्ता गटाचे नेतृत्व करून गटातील व्यक्तीच्या सहाय्याने समस्या सोडविण्यासाठी मदत करत असतो अशा अनेक वेगवेगळ्या गटाने मदतीची आवश्यकता असते यातून सामाजिक गटकार्याची संकल्पना पुढे आली आहे.

### ६.४.१ गटकार्याच्या व्याख्या

गटकार्याचा मानसिक स्वास्थ्य व सामाजिक समस्यांशी संबंध असल्याने वेगवेगळे गट गटकार्याचे लाभार्थी असतात. स्वस्त शिक्षण पुरविणाऱ्या, कल्याण सेवा पुरविणाऱ्या संस्थांमध्ये गटकार्य केले जाते गटकार्याच्या विविध व्याख्या विविध शास्त्रज्ञांनी मांडलेल्या आहेत. मात्र कोणतीही एक व्याख्या परिपूर्ण नाही. तरी प्रत्येक व्याख्या काही ना काही स्पष्टीकरण देत असतात. अशा गटकार्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.



https://m.facebook.com

"गटकार्य ही एक समाजकार्याची पद्धती आहे अर्थपूर्ण गट अनुभवांच्या माध्यमातून व्यक्तींच्या सामाजिक कार्यात्मकतेत वाढ करणे, सामाजिक कार्यात्मकतेचे संवर्धन करणे म्हणजे गटकार्य होय."

**एम. मर्की**

सामाजिक व भावनिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने आणि काही कार्य करण्याच्या ध्येयाने लोकांच्या लहान गटांबरोबर करण्यात येणारी उद्देश प्रणित कृती म्हणजे गटकार्य होय.

**होसेलॅंड आणि रिवास**

सामाजिक गटकार्य ही अशी प्रक्रिया आणि पद्धती आहे की ज्या द्वारे व्यक्ती आणि सामाजिक संस्थांद्वारे प्रस्थापित गटांत कार्यकर्त्याद्वारे मदत केली जाते. ज्यामुळे त्यांचा एकमेकांशी संबंध प्रस्थापित होऊन त्याच्या गरजा व क्षमतांनुसार गटातील अनुभवामुळे त्यांची वाढ होते व त्यांना संधी उपलब्ध होतात.

वरील व्याख्यावरून असे स्पष्ट होते की, गटातील सदस्यांच्या परस्परांशी आंतरक्रिया होतात. देवाणघेवाण होते. त्यातून सहसंबंध व नाते निर्माण होतात. या आंतरक्रिया गटाने वातावरण ठरवितात. आंतरक्रियेमुळे व्यक्ती शिकते व विकसित होते. विचार भावना दृष्टिकोन, ज्ञान वर्तन विश्वास मूल्य, गुण-दोष , वस्तू या सर्वांची गटात देवाण-घेवाण होते. या देवाणघेवाणीचा गटातील प्रत्येक सदस्यावर प्रभाव असतो. ह्या आंतरक्रिया व्यक्तीला स्वतःला समजण्या व इतरांना जाणून घेण्यास मदत करतात. म्हणजेच गटांचे व्यक्तीच्या जीवनात अत्यंत साधारण महत्त्व असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) गटकार्याच्या व्याख्या स्पष्ट करा.

**६.४.२** गटकार्याचे विविध प्रकार आहेत. प्रत्येक गट प्रकारचे उद्देश वेगवेगळे असतात. काही गट सामाजिक भूमिका दुरुस्त करण्याच्या उद्देशाने कार्य करतात. तर काही गट सदस्यांचे नाते संबंध सुरळीत करतात. काही गट सदस्यांना शिकण्याच्या संधी देण्याच्या उद्देशांनी निर्माण होतात. तर काही गट सदस्यांना स्वतःबद्दल समजून घेण्यास मदत करतात. गटकार्याच्या कोणत्याही प्रकारच्या सदस्यांच्या गटात समावेश करताना सदस्य

गट व कार्यकर्ता यांच्यात करार होताना संभाषणातून उद्देश निर्माण होतात. त्यातील काही सर्वकालीन तर काही दीर्घकालीन उद्देश असतात. म्हणजेच उद्देशांचे वेगवेगळे प्रकार वेगवेगळ्या गटकार्यात निर्माण होतात. एकंदरीत गटकार्याचे उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

i) गट जीवन जगण्याच्या मार्गाने व्यक्तीला येणारे अडथळे दूर करणे.

ii) अधिकार जबाबदाऱ्या, कर्तव्य याबाबतीत सदस्यांना जागृत करून भूमिका पार पाडण्यास सक्षम करणे.

iii) व्यक्तीच्या गरजा गटाच्या माध्यमातून पूर्ण करणे व व्यक्तीला जास्तीत जास्त सुखाचे व समाधानाचे जीवन जगण्याकरिता मदत करणे.

iv) गटाच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची, मानवतेच्या संकल्पनेची, मानवाधिकाराच्या जाणिवेची वृद्धी करणे.

v) व्यक्तीच्या गरजा व उपलब्ध साधने, इच्छा व त्यांची पूर्तता यात समन्वय साधणे

vi) व्यक्तींच्या वैयक्तिक व सार्वजनिक समस्या गटांच्या माध्यमातून सोडविणे.

गटाच्या माध्यमातून आवश्यक असणाऱ्या संधी व्यक्तीला उपलब्ध करून देणे व त्याद्वारे व्यक्तीची प्रगती घडविणे इ. इतरांशी सहसंबंध प्रस्थापित करण्याच्या व्यक्तीतील श्रमितांचा विकास घडविणे. घट जीवन जगण्याच्या व त्यासाठी लागणाऱ्या गुणांचा कौशल्यांचा गटसदस्यात विकास करणे. इ इतरांशी सहसंबंध प्रस्थापित करून त्यातून येणाऱ्या अनुभवातून स्वतःत विकास साधण्याची क्षमता निर्माण करणे.

संपूर्ण गटाचा विकास करणे, गटातील सहसंबंधांना योग्य स्वरूप देणे, गटातील वातावरण विकासाला पोषक ठेवणे, गटसदस्यांना गटसहसंबंध कसे विकसित करावे, वातावरण कसे निर्माण करावे, त्याचे ज्ञान देणे गटकार्याचे उद्देश साध्य करण्यासाठी गटकार्यकर्ता नियोजनबद्ध कार्य करीत असतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) गटकार्याचे उद्देश स्पष्ट करा.

## ६.५ सारांश

सामाजिक विकासाबरोबर समाजाच्या गरजा सतत वाढत आहेत. समाजातील वाढत्या गरजांमुळे समाजात अनेक समस्या निर्माण होत आहेत. समाजाचे वेगवेगळे घटक आहेत. यामध्ये शहरी समाज, ग्रामीण समाज, आदिवास समाज, मागासलेला समाज, दुर्लक्षित समाज असे प्रकार केले जातात. समाजाच्या प्रत्येक प्रकारानुसार त्यांच्या सामाजिक समस्या भिन्न-भिन्न आहेत. प्रत्येक समाजाचा स्वतंत्र गट किंवा समूह असलेला दिसून येतो. या गटातील किंवा समूहातील सदस्यांचे स्वरूप भिन्न असते. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीच्या समस्या भिन्न असतात. त्यांच्या व्यक्तीजीवनावर विपरीत परिणाम होत असतो. म्हणून या क्षेत्रात समाजकार्य करण्यात संधी आहे.

व्यक्तीकार्यामध्ये व्यक्तीच्या सदस्या जाणून त्या सोडविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता समस्याग्रस्त व्यक्तीला सहाय्य करत असतो. व्यक्तीचा विकास घडवून आणणे त्या पाठीमागील उद्देश असतो. व्यक्तीचा अभ्यास करून सदस्यांचे निदान केले जाते आणि त्यानुसार समाज कार्यकर्ता उपचार करत असतो. विविध गटांच्या देखील अनेक समस्या असतात. त्या समस्यांचा गटातील व्यक्ती जीवनावर परिणाम, दोष असतो म्हणून सारख्याच समस्या अशा गटांच्या समस्या सोडविण्यासाठी समाजकार्याची गट पद्धती वापरली जाते. गटाच्या समस्या आणि उपलब्ध साधने यांचा विचार करून गटातील सर्व सदस्यांच्या सहकार्याने गटाचा विकास घडवून आणणे अपेक्षित असते.

समाजातील दीनदुबळ्या लोकांच्या कल्याणार्थ केलेले कार्य अभिप्रेत असून विविध प्रकारे हे सेवाकार्य करण्यात येते. केवळ स्वत:ला पुण्य मिळावे, म्हणून समाजातील वंचित गटांना साहाय्य करणे किंवा भूतदयेपोटी दीनदुबळ्यांची सेवा करणे, म्हणजे समाजकार्य नव्हे. विसाव्या शतकात समाजकार्य ह्या संकल्पनेवर साधकबाधक विचारविनिमय झालेला आहे आणि अनेक समाजशास्त्रज्ञांनी या संकल्पनेची व्याख्या केली असून तिचा ऊहापोहही केला आहे. या व्याख्यांपैकी फीडलँडर पुढील शब्दांत समाजकार्य वा सेवा या संज्ञेची व्याख्या करतात. ‘ समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे. हा व्यवसाय शास्त्रीय ज्ञानावर  व मानवी संबंधांच्या कौशल्यांवर आधारित आहे. एखादया व्यक्तीला किंवा गटाला अशी मदत केली जाते, जेणेकरून सामाजिक व वैयक्तिक समाधान निर्माण होऊन स्वावलंबनाची प्रकिया सुरू होईल.

## ६.६ स्वाध्याय

१) समाजकार्याच्या पद्धती स्पष्ट करा.

२) व्यक्तीकार्याचे व्याख्या सांगून उद्देश स्पष्ट करा.

३) व्यक्तीकार्य म्हणजे काय? व्यक्तीकार्याचे घटक सांगा

४) व्यक्तीकार्य प्रक्रियेच्या पायऱ्या सांगा

५) गटकार्याच्या व्याख्या सांगून गट कार्याचे उद्देश स्पष्ट करा

## ६.७ संदर्भ सूची


१) प्राजक्ता टाकसाळे गटकार्य (समाजकार्य पद्धती) श्री मंगेश प्रकाशन, नवी रामदासपेठ नागपूर ४४००१०

२) प्राजक्ता टाकसाळे व्यक्तीसह कार्य श्री मंगेश प्रकाशन नवी रामदासपेठ, नागपूर ४४००१०

३) प्रदीप आगलावे सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर, ४४००१०.


❖❖❖❖

# ७

# समुदाय संघटन

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ समुदाय संघटन

७.३ सारांश

७.४ संदर्भ सूची

७.५ स्वाध्याय.

## ७.० उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- समुदाय संघटनाच्या संकल्पना व व्याख्या समजावून घेणे.
- समुदाय संघटनाच्या पायऱ्या अभ्यासणे.
- समुदाय संघटकाची कार्ये अभ्यासणे.
- समुदाय संघटनाचे सिद्धांत अभ्यासणे.
- समुदाय संघटनाची पद्धती आणि तंत्र अभ्यासणे.
- समुदाय संघटनेचे उद्देश अभ्यासणे.

## ७.१ प्रस्तावना

समुदाय संघटन ही समाजकार्याची एक पद्धती आहे. या पद्धतीची उत्पत्ती १९व्या शतकात दोन संघटन समिती आंदोलनात झाली. समितीने व्यक्तीसहाय्य कार्य व गटकार्यास सुरूवात केली. त्याच्या असे लक्षात आले की, बऱ्याच गैरसरकारी सहाय्यता समित्या आणि कल्याणकारी संस्थांमध्ये समायोजन नाही. त्यामुळे त्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न सुरू केले. त्याच प्रयत्नांतून समाज कार्याची पद्धती म्हणून समुदाय संघटनेचा जन्म झाला.

समुदाय संघटन ही कार्यकर्त्याद्वारा समुदायात मदत करण्याची प्रक्रिया आहे. ज्याद्वारे समाजकार्यकर्ता आपल्या कौशल्याद्वारे समुदायाला आपल्या समस्या ओळखून त्या सोडविण्यासाठी मदत करतो.

## ७.२ समुदाय संघटन

समुदाय संघटनाचा अभ्यास करण्यापूर्वी आपणास समुदायाचा, संकल्पनेचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे. समुदाय ही संज्ञा वेगवेगळया संदर्भात वापरण्यात येते. धार्मिक समुदाय व्यावसायिक समुदाय जातीवर आधारित समुदाय ग्रामीण समुदाय म्हणजे एकत्रित राहणाऱ्या व्यक्तींचा गट. त्या व्यक्ती एका भौगोलिक परिसरात राहणाऱ्या, सारख्या आवडीनिवडी असणाऱ्या आणि एकमेकांवर अवलंबून असण्याची भावना असणाऱ्या असतात.

समुदाय संघटन प्रक्रियेचा अर्थ समुदायाद्वारा एकात्मिक रूपात समस्या सुटण्याची क्रिया ही प्रक्रिया व्यावसायिक कार्यकर्त्याशिवाय चालू राहू शकते. समुदाय संघटन समाजकार्यात समुदायातील समस्या निश्चित करण्यापासून त्यांचे समाधान करणे किंवा उद्देश प्राप्त होईपर्यंत केली जाणारी प्रक्रिया आहे.

रॉय यांच्या मते, समुदाय संघटन अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे समुदाय आपली आवश्यकता आणि उद्देश ओळखून ते निश्चित करतो, क्रमबद्ध करतो आपल्या या आवश्यकता पूर्तीसाठी विश्वास निर्माण करतो आणि समुदायाचा सहकाराच्या भावनेचा विकास करतो.

**समुदाय संघटनाच्या व्याख्या :**

समुदाय एका जागी राहणारा, एकाच प्रकारचे जीवन जगणारा परस्परांशी नातेसंबंध असणारा लोकांचा समूह होय. समुदायाचे भौगोलिक क्षेत्र व समुदायाचे सामाजिक सांस्कृतिक क्षेत्र हे दोन महत्त्वाचे भाग आहेत. समुदाय एका जागी वसलेला असतो. तेथील लोक एकाच प्रकारचे जीवन जगतात. त्यात अनेक लोक एकत्र राहतात व एकमेकांना प्रभावित करतात. समुदायातील लोकांचे परस्पर संबंध समुदायातील जीवन वातावरण व परिस्थिती निश्चित करतात. समुदायातील या सर्व बाबींचा समुदायात राहणाऱ्या व्यक्तींवर फार मोठा प्रभाव असतो. त्यांचे विचार, वागणे व्यक्तिमत्त्व सह संबंध इत्यादी सर्व बाबी समुदायातील वातावरणाने निश्चित होतात.




https://www.mpgkpdf.com

अमेरिकेत राष्ट्रीय बैठकीत वेगवेगळ्या गटांनी समुदाय संघटनाच्या खालील व्याख्या सांगितल्या आहेत.

१. समुदाय संघटन ही प्रक्रिया समाजकल्याण सेवा आणि वरिष्ठांशी संबंधित आहे. याच्याशी जिचा संबंध येणार आहे. अशा व्यक्ती किंवा गट यांच्यातील व्यवहार होय. अशा सेवांच्या मूल्यांवर प्रभाव टाकणार्या उद्देश, त्यांची गुणवत्ता वाटपात सुधारणा करणे किंवा असे आणखी उद्दिष्ट संपादन करणे होय.

२. समाज कल्याण क्षेत्रात समुदाय संघटनाचे असे वर्णन करता येईल की, ही एक कला झाली. समाजकल्याणाच्या गरजा शोधण्याची प्रक्रिया होय. उत्पादकता सहकार्यात्मकता, व्यवसायात्मकता साधनत्व यांचाद्वारे गटातील संसाधन व बुद्धा्ची दिशा गटातील सदस्यांच्या क्षमताचा विकास म्हणजे समुदाय संघटन होय.

३. समुदाय संघटन अशा प्रयत्नांशी संबंधित आहे. ज्यात सामाजिक गरजा भागविण्याच्या साधनांचा परिणामकारक उपयोग कुठल्याही भौगोलिक क्षेत्रातल्या विशिष्ट अथवा संपूर्ण कल्याणकारी गरजांना दिशा देण्यासाठी करण्यात येतो. त्यांच्या प्रयोगाच्या हालचाली सत्यशोधन, सहकार्य, दर्जा उंचावणे, भाषांतर, कल्याणकारी कार्यक्रम, समाजकार्याचे बदलते आदर्श आणि सामाजिक कायद्यांच्या उन्नतीसाठी संबंधित आहेत.

४. समाजकल्याण सेवा किंवा समाजकल्याणाच्या उद्देशांना प्रभावित करण्यात, सेवांची परिणामकारकता वाढविण्यात, उद्देश साध्य करण्यात त्यांची संख्या व व्याप्ती वाढविण्यात, त्यांचा दर्जा उंचाविण्यात, समाजापर्यंत सेवा पोहचविण्यात व समाजाचा विकास करण्यात ज्यांना रुची आहे, ज्यांना त्यांच्याबद्दल कळकळ आहे. अशा समाजाबरोबर कार्य करण्याची प्रक्रिया म्हणजे समुदाय संघटन होय.

समुदायाचा विकास होण्यासाठी, समुदायाला ग्रासणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी, समुदायांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी समुदायाला सेवांची व समस्या समाधान करणाऱ्या मार्गांची गरज असते. हे मार्ग शोधण्याकरिता व या सेवा निर्माणकरिता सेवांची व्याप्ती वाढविण्यासाठी किंवा उपलब्ध मार्गाचा उपयोग करण्याकरिता समुदायातील लोकांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक असते. जेव्हा हे करण्यासाठी समुदायातील लोक एकत्र येतात व प्रयत्न करण्यास पुढाकार घेतात तेव्हा समुदाय संघटन होते.

समुदाय संघटन ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्या माध्यमातून समुदायाच्या कल्याणविषयक गरजांची पूर्तता होते. साधने व गरजांमध्ये समन्वय साधला जातो. समुदाय संघटना व संपूर्ण समुदाय हाच सेवार्थी असतो. व्यक्ती व गटापेक्षा कामाचा भर समुदायावर असतो. समुदाय संघटनांची एक प्रक्रिया आहे. यामध्ये समुदायाने आपल्या गरजा व उद्दिष्टे जाणणे, त्यांची क्रमवारी लावणे व ह्या गरजा पूर्ण करण्यासाठी लागणार्या इच्छाशक्तीची व विश्वासाची समुदायात निर्मिती करणे. ह्या गरजा पूर्ण करण्यास साधने एकत्र करणे, त्याद्वारे समुदायाचा विकास घडवून आणणे या सर्व टप्प्यात समुदायाचा सक्रिय सहभाग गृहीत धरला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटनांच्या व्याख्या सांगा.

### ७.२.१ समुदाय संघटनेचे उद्देश :

समुदायाचा विकास घडवणारी समाजकार्याची परंपरा म्हणजे समुदाय संघटना. एकंदरीत समाजात वेगवेगळ्या प्रकारचे समुदाय दिसून येतात. यामध्ये ग्रामीण समुदाय, शहरी समुदाय, आदिवासी समुदाय, विशिष्ट जातीचा समुदाय, मागासलेला समुदाय इत्यादींचा समावेश होतो. त्या समुदायातील संबंध सुयोग्य करण्यासाठी पद्धतशीर व सातत्याने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना समुदाय संघटन म्हटले जाते. समुदायाच्या गरजा व साधने यांच्यात ताळमेळ घालण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो.

समुदायाच्या गरजा जाणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो. गरजा जाणल्यानंतर त्यांची क्रमवारी लावली जाते. समुदायाला जाणवणाऱ्या निकडीच्या गरजांना अग्रक्रम देण्यात येतो. समुदायातील या गरजांच्या पूर्ततेस उपलब्ध असणारी साधने शोधून वापरली जातात. गरजा व साधने यांच्या माहितीच्या आधारे योजना सावरल्या जातात. सर्व कार्य करताना समुदायाने स्वावलंबी झाले पाहिजे. समुदायात एकीची भावना विकसित झाली पाहिजे. या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. म्हणून त्यासाठी समुदाय संघटनेचे काही उद्देश सांगितले जातात.

**१) आवश्यकता किंवा गरजांचा शोध घेणे :**

प्रत्येक समुदायाच्या गरजा भौगोलिक परिस्थितीनुसार भिन्न भिन्न असतात. ज्या क्षेत्रातील समुदाय संघटनेचे कार्य करावयाचे आहे. त्या समुदायात कोणत्या गरजा आहेत. कोणत्या गोष्टी आवश्यक आहे. यांचा समुदाय संघटन करताना शोध घेणे हा उद्देश समुदाय संघटनाचा असतो.

**२) साधनांची उपलब्धता तपासणे :**

समुदायातील गरजांचा शोध घेतल्यानंतर गरजा पूर्ण करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या साधनांची उपलब्धता तपासून पाहणे गरजेचे असते. गरजा भागविण्यासाठी साधने कशी एकत्रित करता येतील हे तपासणे.

**३. गरजा पूर्ण करण्याकरिता ठोस नियोजन करणे :**

उपलब्ध साधनांचा शोध घेतल्यानंतर साधनांचा योग्य व पर्याप्त वापर करून समुदायातील गरजा पूर्ण करण्याकरिता नियोजन करणे. कामाचे टप्पे ठरविणे, त्यानुसार कामांची पूर्तता करणे हा समुदाय संघटनेचा उद्देश असतो.

**४. समुदायात एकी निर्माण करणे :**

कोणतेही उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता ज्या समाजासाठी कार्य केले जाणार आहे त्यात एकी असणे आवश्यक आहे. समाजात एकी नसेल तर गरजांची पूर्तता करण्यासाठी साधने

एकत्रित करून त्याचे योग्य नियोजन करता येत नाही. लोक सहकार्य व सहभाग योग्य मिळत नाही म्हणून समुदाय संघटनामध्ये समुदायन एकी निर्माण करणे हा उद्देश असतो.

**५. नेतृत्त्व निर्माण करणे :**

समुदाय संघटनाचा उद्देश नेतृत्त्व निर्माण करणे हा असतो. समुदायातील समस्या सोडविण्यासाठी समुदायातून एका किंवा अनेक व्यक्तींनी पुढाकार घेणे आवश्यक असते. हा पुढाकार घेण्यासाठी नेतृत्त्व गुणांची आवश्यकता असते. असे समुदायात नेतृत्त्व तयार करणे आणि त्याद्वारे समुदायातील समस्या सोडविणे हे समुदाय संघटनेचा उद्देश आहे.

**६. सार्वजनिक सुविधांमध्ये सुधारणा करणे :**

समुदाय संघटनेद्वारा संघटित प्रयत्न करून समुदायातील आवश्यक असलेल्या सार्वजनिक सोयीसुविधामध्ये वाढ करणे आणि सामाजिक सुधारणा घडवून आणणे. सुविधा प्राप्त करून घेण्यासाठी संघटित लढा देणे, संघर्ष करणे हा समुदाय संघटनेचा उद्देश आहे.

**७. आर्थिक विकास घडवून आणणे :**


समुदाय संघटन सामाजिक समस्या व गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असले तरी आर्थिक दुर्बल घटकांचे संघटन करून आर्थिक विकास साधण्यासाठी त्याचा फायदा होतो म्हणून समुदाय मर्यादित असेल तर संघटित स्वरूपाचा व्यवसाय करून किंवा उत्पन्नाची साधने उपलब्ध करून सामूहिक आर्थिक विकास साधणे हा उद्देश असतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटनेचे उद्देश स्पष्ट करा.

**७.२.२ समुदाय संघटनेची तत्त्वे :**

वेगवेगळया समाजशास्त्रज्ञांनी व तज्ज्ञांनी समाज विकासातील समुदाय संघटनेची तत्त्वे खालीलप्रमाणे सांगितली आहेत.



https://social-work.in

१. समाजकल्याणासाठी समुदाय संघटन व्यक्ती आणि त्यांच्या आवश्यकतांशी संबंधित आहे.

२. समाजकल्याणासाठी समुदाय संघटनात समुदाय एक प्राथमिक सेवा मानली जाते. या समुदायात विशिष्ट वस्तीचा विभाग, पूर्ण वस्ती, गाव, वाडी, शहर इत्यादी समुदायांचा समावेश होतो.

३. समुदाय जसा असेल, जिथे असेल तसाच त्याचा स्वीकार केला जातो. समुदायाचे वातावरण समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

४. समुदाय संघटनेत समुदायातील सर्व लोकांचा सहभाग अपेक्षित असतो.

५. समुदायात होत असलेल्या परिवर्तनाचा समुदाय संघटनेत स्वीकार केला जातो.

६. समाजकल्याणासाठी समुदाय संघटन एक प्रक्रियेच्या रूपात सामान्य समाजकार्याचा एक भाग आहे. समुदाय संघटनेचे शिक्षण व्यावसायिक समाजकार्यकर्त्याद्वारा चांगल्या प्रकारे होऊ शकते.

७. कार्यक्रम निर्धारणामध्ये स्वतःच्या हितापेक्षा समुदाय कल्याणाचा विचार घेणे आवश्यक आहे.

८. समुदायातील प्राप्त परिस्थितीत असलेल्या असंतोषाच्या कारणात समुदाय संघटनेचा विकास असतो.

९. समुदायातील प्रत्येक व्यक्तीला विकास प्रक्रियेत आणणे विकास कार्यक्रमाचा लाभ मिळवून देणे व समाज विकास साधणे हे समुदाय संघटनेचे तत्त्व आहे.

१०. समाजाला भेडसावणाऱ्या समस्या सामूहिकरीत्या सोडविणे व उपलब्ध सुविधांचा सर्वांना समान लाभ देणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटनेची तत्त्वे सांगा.

### ७.२.३ समुदाय संघटनांचे सिद्धांत :

समुदाय संघटन हे समाजकार्याचे एक तंत्र असल्यामुळे समुदाय संघटनांचे सिद्धांत समाजकार्याच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत. समुदाय संघटन कार्याचे तत्त्वज्ञान व सिद्धांताच्या आधारे निर्माण झालेल्या समाजकार्याच्या या पद्धतींचे तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे आहे.

१. समुदायाचे संपूर्ण कल्याण हा समुदाय संघटनांचा उद्देश आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी समुदायाला संघटित करणे व त्या संघटनाद्वारे विकास घडविणे हे माध्यम किंवा साधन आहे. समुदाय संघटनांचे कार्यक्रम समुदायाच्या कल्याणासाठी आखले जातात.

२. समुदाय संघटन संस्थेद्वारे, त्यांच्या कार्यकर्त्याद्वारे केले जाते. संघटित होण्यासाठी प्रक्रिया समुदायाला माहीत करून दिली जाते. संघटित होऊन कशा प्रकारे समस्या सोडविता येतात. गरजा कशा पूर्ण करता येतात. याचा प्रत्यक्ष अनुभव समुदाय घेतो. त्यामुळे समुदायात संघटन तयार होते, आत्मविश्वास निर्माण होतो. समुदाय कृती करू लागतो. त्या माध्यमातून प्रगती साधली जाते. हे घडविण्यासाठी कार्य करणारा कार्यकर्ता समुदायाचा मित्र बनतो. समुदायाचा विश्वास संपादन करून समुदायाबरोबर काम करतात.

३. विकासाच्या योजना आखताना प्रथम विकास घडविण्याकरिता आवश्यक सर्व गरजांना जाणून घ्यावे. विकासाच्या आड येणाऱ्या सर्व समस्यांना व सर्व पैलूंना जाणून घ्यावे. समस्यांचा, गरजांचा परस्पर संबंध, परावलंबित्व लक्षात घेऊन कार्य करावे. समस्या सोडविण्याच्या कार्यक्रमांची परिपूर्ण आखणी करताना सर्वांगीण विचार व्हावा संतुलन ठेवावे.

४. समुदायाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या व जाणवणाऱ्या गरजा किंवा समस्या यांना कामाचा आधार बनविणे, समस्या सोडविण्यासाठी मार्ग आखण्याचे त्यांचा अवलंब करण्याचे काम समुदाय संघटन करते. हे घडण्यासाठी समुदाय संघटन पद्धतशीर सहाय्य करते. जेव्हा जाणवलेल्या गरजा कामाचा आधार बनतात. तेव्हा समुदायावर नव्या कल्पनांच्या किंवा सुधारणेच्या नावाखाली काहीही लावणे जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. नव्या कल्पना उपयोगात आणण्यासाठी प्रथम समुदायाची मानसिकता तयार केली जाते.

५. समुदाय संघटनातून घडणारी विकासाची प्रक्रिया समुदायाला नवे मार्ग किंवा नव्या सुधारणा स्वीकारण्यास तसेच योग्य तर्हेने जीवन जगण्याची तंत्र जाणून त्याचा उपयोग करण्यास प्रोत्साहन देते.

६. समुदायांना स्वतः स्वतःची मदत करण्यास तयार करावे. समुदाय ठळकपणे बाहेरील मदतीवर अवलंबून राहण्यापेक्षा समुदायात आत्मनिर्भयता आणि पुढाकार घेण्याच्या भावनेला उत्तेजन द्यावे.

७. समुदायासाठी असणारे सर्व कार्यक्रम आर्थिक व सांस्कृतिक प्रकाराशी सुसंगत असावे कारण समुदायाच्या पातळीवर काम करावयाचे आहे. समुदायाच्या परंपरा व चालीरीतीचा आदर करण्यात यावा आणि विकासात्मक कार्यक्रम टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात यावेत. कालबाह्य परंपरा आणि अंधश्रद्धा बदलण्याची प्रक्रिया अगदी अनुक्रमाने सावकाश घ्यावी. त्यामुळे समुदायाच्या भावना दुर्लक्षित होणार नाहीत.

८. बदलाला स्वीकारण्याची समुदायाची मानसिकता तयार करणे आवश्यक असते. ही तयारी नसताना दिल्या जाणार्या सेवा, केले जाणारे बदल हे समुदायाच्या सहभागाशिवाय घडतात. असे झाल्यास या बदलाची गरज वाटत नसताना बदल घडल्यास समुदाय त्या बदलांना स्वीकारत नाही. असे बदल अपेक्षित असतात. केवळ उद्दिष्ट गाठणे महत्त्वाचे नसून उद्दिष्ट गाठण्याचा मार्ग महत्त्वाचा असतो.

९. जो समुदाय असंघटित असतो. तेथे एकी नसते तेथे कार्य करताना समुदायातील सर्व गटांचे सहकार्य मिळविले जाते. कार्य कोणत्याही एका गटापुरते मर्यादित राहू दिले जात नाही. समुदायातील गटांना एकत्रित आणण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग केला जातो.

१०. समुदायाला आपल्या गरजा व गरजा भागविण्यासाठी उपलब्ध साधने यांच्या बद्दल जागरूक करण्यासाठी वेगवेगळया प्रसार माध्यमांचा उपयोग करून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. यामध्ये दृक-श्राव्य साधते, पत्रके, रेडिओ, जाहिराती, सिनेमा, दूरदर्शन या प्रसार माध्यमांचा उपयोग केला जातो.

समुदाय विकास कार्यक्रमात फक्त खेड्यांच्या विकासाचाच समावेश होत नाही तर समुदाय संघटन हे तंत्र समुदायांच्या विकासासाठी यशस्वीपणे वापरले जाते. कोणताही समुदाय असला तरी मूलभूत तत्त्वे सारखीच असतात. समाजकार्याच्या संपूर्ण सैद्धांतिक ज्ञानाच्या आधारे तिची अंमलबजावणी केली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटनाचे सिद्धांत स्पष्ट करा.

### ७.२.४ समुदाय संघटनांच्या पायऱ्या :

१. समुदायाचे पद्धतशीर व अनौपचारिक सर्वेक्षण करून त्याद्वारे पुढील माहिती एकत्रित केली जाते. त्या माहितीमध्ये समुदायाच्या इतिहास, भौगोलिक स्थिती उपलब्ध जमीन, समुदायाची लोकसंख्या, कुटुंबाची संख्या, स्त्री-पुरुष प्रमाण, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक परिस्थिती, चालीरीती, राजकीय व सांस्कृतिक परिस्थिती इत्यादी घटक महत्त्वाचे असतात. माहितीचा उपयोग समुदायाच्या गरजा जाणण्यास अभ्यास करण्यात होतो.

२. समुदायाच्या व त्यातील गटांच्या गरजांची यादी तयार करणे व त्यांची क्रमवारी लावणे.

३. समुदायात ज्या गरजा आहेत त्या पूर्ण करणाऱ्या पद्धतींचा, तंत्राचा व मार्गाचा शोध घेणे, उपलब्ध साधनांचा उपयोग करणे.

४. समाजातील समस्या व त्रुटी जाणणे, त्या दूर करणे त्यांना प्रतिबंध करणे व त्यावर उपाययोजना करणे.

५. समुदायात गरजांबद्दल व समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करणे, गरज पूर्ण करण्यासाठी समुदायाला एकत्र आणणे व कृतिशील बनविणे.

६. समुदायात अस्तित्वात असणाऱ्या विविध गटांना व संस्थांना समुदायाचा विकास साधण्यासाठी समान उद्देशाने एका मंचावर आणणे.

७. कल्याणकारी कार्य व सेवांच्या विकासासाठी वित्त व्यवस्था करणे अंदाजपत्रक तयार करणे व कार्यकर्ते एकत्र करणे.

८. गरजा सतत बदलत असतात तेव्हा त्या बदलत्या गरजा जाणून सतत साधनांचे परीक्षण करणे व समुदाय संघटनाचे कार्य करणे.

९. केलेल्या कामाचे मूल्यांकन करणे, समुदायाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या सेवा निर्माण केल्या आहेत त्यांचे मूल्यांकन होणे आवश्यक असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटनेच्या पायऱ्या स्पष्ट करा.

### ७.२.५ समुदाय संघटनाच्या पद्धती आणि तंत्र :

समुदायात जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आणि समुदायाला त्याच्या समस्या सोडविण्यासाठी लागणारी साधने किंवा गरज भागविण्यासाठी उपलब्ध असणारी साधने आणि पद्धती समजण्यास मदत करणे. समुदायाला शिक्षित करण्यासाठी समुदाय संघटकाने काही विशिष्ट पद्धतींचा अवलंब केला पाहिजे आणि विशिष्ट उद्दिष्टांसाठी संघटित केले पाहिजे. त्यासाठी असणाऱ्या पद्धती आणि तंत्र पुढीलप्रमाणे आहेत.

१. समस्यांची मोजणी करणे. त्यावर संशोधन करणे आणि त्याची नोंद घेणे.

२. समुदाय संघटनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या प्रमुख व्यक्तींना भेटणे. यामध्ये समुदायाने नेतृत्त्व करणारी व्यक्ती, गरज भागविण्यासाठी उपयुक्त ठरणारी व्यक्ती याची भेट पद्धती समजावून सांगणे आणि त्यांचा सहभाग मिळविणे.

३. समुदायातील गरजा व समस्या जाणून घेण्यासाठी संपूर्ण समुदायाबरोबर संवाद साधणे आवश्यक असते. त्यासाठी समुदायात चर्चा करणे, त्यांच्या गट बैठका आयोजित करणे, तज्ज्ञांची भाषणे ठेवणे आणि वादविवादांचे आयोजन करणे.

४. समुदाय संघटन करण्यासाठी समुदायाच्या आवडीच्या गोष्टींचा विचार करावा लागतो. अशा गोष्टी विचारात घेऊन त्यांचे आयोजन केले तर समुदाय संघटन करणे अवघड जात नाही म्हणून समुदायात फिल्म शो आयोजित करणे आणि समुदायातील स्थानिक सण, उत्सव साजरे करणे की जेणेकरून संपूर्ण समुदाय संघटित होईल.

५. समुदाय संघटन करताना कोणतेही कार्यक्रम आयोजित केले तरी संपूर्ण समुदाय त्यात सहभागी होईल हे सांगता येत नाही म्हणून ज्यांना सहभागी होणे शक्य नसते अशा व्यक्तींना समुदाय संघटनांचे उद्देश समजण्यासाठी सूचनापत्रक, समाचार पत्रक, माहिती पत्रक, जाहिरात व वर्तमान पत्रांचा वापर करणे.

६. समुदायामध्ये वेगवेगळया व्यक्तींच्या समस्या वेगळया असू शकतात किंवा विशिष्ट गटांच्या समस्या वेगळया असू शकतात अशा वेळी समुदाय संघटनात जिथे आवश्यक असेल तिथे व्यक्ती सहाय्य पद्धती व गटसहाय्य पद्धती या तंत्राचा वापर करणे.

७. समुदाय संघटनात ज्या वेगवेगळ्या पद्धती आहेत त्यात साक्षरता व सामाजिक मिश्रणाचे वर्ग घेणे हा भागदेखील येतो. काही समुदायात साक्षरतेचे प्रमाण कमी असते. त्या ठिकाणी प्रथम समुदायातील व्यक्तींना साक्षर करणे, त्याबरोबर सामाजिक ज्ञान समाजात असणे गरजेचे आहे म्हणून सामाजिक शिक्षणाचे धडे घेणे.

८. समुदाय संघटनात समुदायातील समस्या सोडविण्याचे काम केले जाते किंवा समुदायात अनेक गरजा असतील तर त्या भागविण्यासाठी साधनांचा उपयोग केला जातो. विशिष्ट विभागात समुदाय संघटनेचे काम यशस्वी झाले असेल, त्याद्वारे समुदायाचा विकास झाला असेल अशा ठिकाणी भेटी देऊन समुदायात आदर्श निर्माण करता येतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटनेच्या पद्धती व तंत्र सांगा.

### ७.२.६ समुदाय संघटकाची कार्ये :

समुदाय संघटनांची परिणामकारकता समुदाय संघटकावर अवलंबून असते. समुदाय संघटक समुदायाचे प्रतिनिधित्व करत असतो. त्याच्या कार्यकुशलतेवर समुदाय संघटनेचे यश अवलंबून असते. समुदाय संघटकांची जडणघडण त्याचे शिक्षण, अनुभव कार्यकुशलता इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या असतात.

समुदाय संघटक समस्या असणाऱ्या समुदायाबरोबर काय करतो. त्यामुळे त्याच्या ठिकाणी रचनात्मक विचार, कृती करण्याची क्षमता तसेच तणावाचे नियमन करण्याची क्षमता असणे गरजेचे असते. समुदाय संघटकाला विविध क्षेत्रांत कार्य करावयाचे असते ह्यांत समुदाय संघटनेच्या पद्धतींचा वापर केला जातो. हे कार्य करताना संघटकाला वेगवेगळया प्रकारच्या भूमिका सेवार्थीच्या गरजेनुसार पार पाडाव्या लागतात.

वरील प्रकारचे कार्य करणाऱ्या संघटकाला अनेकविध कौशल्यांची गरज असते. तरच तो आपली कार्य यशस्वीपणे पार पाडू शकतो. अशी समुदाय संघटनांतील समुदाय संघटकांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) समुदायातील सार्वजनिक स्वरूपाच्या समस्या, वैयक्तिक समस्या किंवा अडचणी, समुदायाच्या गरजा, समुदायाची एकंदरीत परिस्थिती याबद्दल जाणीव व जागृती निर्माण करणे.

२) समुदायाच्या गरजा पूर्ण करण्याचे, अडचणी दूर करण्याचे, परिस्थितीत सुधारणा करण्याचे मार्ग शोधण्यास व समजावून घेण्यास समुदायाला तयार करणे, समस्यांचे निदान व उपचारांची रूपरेषा ठरविणे.

३) समुदायास संघटित करून समुदायाद्वारेच समुदायात असे सेवा कार्यक्रम तयार करणे. त्यामुळे त्यांच्या गरजा पूर्ण होण्याची व्यवस्था निर्माण होईल व त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होईल. या अभ्यास निदान व उपचारांच्या पायरीवर समुदायाच्या बैठका घेणे, गट चर्चा करणे, वादविवाद घडविणे, भाषणे आयोजित

करणे, सर्वेक्षण करणे, समुदायाला संघटित करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, विविध प्रसार माध्यमांचा उपयोग करणे, शिक्षण व प्रशिक्षणाचे वर्ग आयोजित करणे, अन्य समाजकार्य पद्धतींचा उपयोग करणे, अशा विविध माध्यमांचा व साधनांचा उपयोग करून घेण्याचे कार्य करावे लागतात.

४) निर्माण केलेल्या सेवा व साधनांचा व त्यांच्या कामाच्या परिणामकारकतेचा आढावा घेणे, समुदायाच्या स्वरूपानुसार संघटक कार्याची रूपरेषा आखणे.

समुदाय संघटकाला बहुविध कार्य करावी लागतात. त्याच्याकडून करण्यात येणाऱ्या कामानुसार कामाच्या भूमिका निश्चित होतात. ह्यात मदत कार्याची भूमिका, मध्यस्थांची भूमिका, मार्गदर्शकांची भूमिका, शिक्षकांची भूमिका, प्रेरकाची भूमिका, प्रोत्साहनाची भूमिका, तज्ज्ञांची भूमिका, योजनाकाराची भूमिका, संशोधनकर्त्यांची भूमिका, गट कार्यकर्त्यांची भूमिका, व्यक्ती सहाय्य कार्यकर्त्यांची भूमिका पार पाडाव्या लागतात.

समुदाय संघटकांची कार्य करताना मूलभूत तत्त्वज्ञान, विचार प्रवाह, वापरण्यात येणारे सिद्धांत हे कायम समान असतात. कामामागील दृष्टिकोन व उद्देश हे संघटकाचे दृष्टिकोन व उद्देश असतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) समुदाय संघटकाची कार्ये स्पष्ट करा.

## ७.३ सारांश

समाजकार्याच्या पद्धतींमध्ये समुदाय संघटन ही एक पद्धती आहे. व्यक्ती सहाय्य कार्यात व्यक्तीच्या समस्या सोडविण्यासाठी मदत केली जाते. समस्या ओळखून त्या सोडविल्या जातात. व्यक्तीचा विकास घडवूण आणणे हा उद्देश असतो, गटकार्य, गटाच्या समस्या सोडविण्यासाठी समाज कार्यकर्ता कार्य करीत असतो. तर समुदाय हा गटापेक्षा मोठा भाग असतो. एखाद्या शहराचा भाग, ग्रामीण भाग, मोहल्ला असा असतो की त्या समुदायातील समस्या सर्वसाधारण समान असतात. त्यांचा समुदायातील व्यक्ती जीवनावर परिणाम होतो. म्हणून समुदायातील गरजा शोधणे, समस्या सोडविण्यासाठी साधनांची उपलब्धता तपासणे, संपूर्ण समुदायाची एकी निर्माण करणे. समुदायात नेतृत्त्व निर्माण करणे व सार्वजनिक सुविधा उपलब्ध करणे अपेक्षित असते हे सर्व कार्य करण्यासाठी समाज कार्यकर्ता पुढाकार घेत असतो. म्हणून समाजकार्याच्या पद्धतींमध्ये समुदाय संघटन महत्त्वाचे मानले जाते.

समाजकार्याचे मुख्य ध्येय, सामाजिक कार्यक्षमता वाढविणे हे होय. समाजकार्यांची तत्त्वप्रणाली ही लोकशाही तत्त्वांवर आधारित असून सामाजिक न्याय, समता, समानता व विकास ही तत्त्वे महत्त्वाची मानली आहेत.

समुदायातील सर्व व्यक्तींच कल्याण करणे, संपूर्ण समुदायाचा सहभाग मिळविला जातो. वैयक्तिक हितापेक्षा सर्वांच्या हिताना समुदाय संघटनामध्ये महत्त्व दिले जाते. समुदाय संघटनातील क्रिया व प्रक्रिया शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्या जातात. समुदाय संघटनेला

ठरलेल्या पायऱ्यानुसार कृती केली जाते. विशिष्ट पद्धती व तंत्राद्वारे सर्व कार्य पार पाडली जातात. यामध्ये समाजकार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

## ७.४ संदर्भ सूची

१) प्राजक्ता टाकसाळे व्यावसायिक समाजकार्य विचारधारा व इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर,

२) नंदा, बारहाने, समुदाय संघटन

## ७.५ स्वाध्याय

१) समुदाय संघटनाची संकल्पना स्पष्ट करून समुदाय संघटनेचे उद्देश सांगा.

२) समुदाय संघटनेची व्याख्या स्पष्ट करून समुदाय संघटनेची तत्त्वे सांगा.

३) समुदाय संघटनेची संकल्पना स्पष्ट करून समुदाय संघटनेच्या पायऱ्या सांगा.

४) समुदाय संघटन यावर सविस्तर माहिती द्या.

५) समुदाय संघटनेचे उद्देश व कार्ये स्पष्ट करा.

६) समुदाय संघटनाच्या पद्धती आणि तंत्र सांगा.

❖❖❖❖

# ८

# समाजकार्य संशोधन, प्रशासन व व्यवस्थापन

**घटक रचना :**

८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ समाजकार्य संशोधन

८.३ सामाजिक संशोधन

८.४ समाजकार्य प्रशासन

८.५ समाजकार्य व्यवस्थापन

८.६ सारांश

८.७ संदर्भसूची

८.८ स्वाध्याय

## ८.० उद्दिष्टे

समाजकार्य संशोधन, समाजकार्य प्रशासन व समाजकार्याचे व्यवस्थापन या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- समाजकार्य संशोधनाचा अर्थ समजावून घेणे.
- समाजकार्य संशोधनाचे उद्देश अभ्यासणे.
- समाजकार्य संशोधनाचे प्रकार अभ्यासणे.
- समाजकार्य संशोधनाचे महत्त्व अभ्यासणे.
- समाजकार्य प्रशासनाचा अर्थ समजावून घेणे.
- समाजकार्य प्रशासन अभ्यासणे.
- समाजकार्य व्यवस्थापन अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना

समाजकार्यामध्ये संशोधन, प्रशासन व व्यवस्थापन हे तीनही घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. समाजकार्याला सुरूवात करण्यापूर्वी समाजाच्या गरजांचे अध्ययन होणे गरजेचे असते हे अध्ययन संशोधनावर आधारित असेल तर समाजाची सामाजिक परिस्थिती काय आहे. समाजाच्या विकासाच्या आड येणारे घटक कोणते आहेत. समाज प्रगतीचा टप्पा

सद्यस्थितीत काय आहे. समाजकार्याचा अवलंब कशा पद्धतीने केला पाहिजे याचे सखोल ज्ञान होण्यासाठी व शास्त्रशुद्ध संकलित करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते.

समाजकार्याच्या व्याप्तीवरून समाजकार्याच्या प्रशासनाचे महत्त्व ठरत असते. समाजकार्य संस्थेच्या माध्यमातून सुरू केलेले असेल, त्याची व्यापकता मोठी असेल तर त्यासाठी स्वतंत्र प्रशासनाची आवश्यकता असते. वेगवेगळया उपक्रमांमध्ये समन्वय घडवून आणण्याचे काम प्रशासन करत असते. केलेल्या समाजकार्याचे मूल्यमापन करण्यासाठी प्रशासनाची आवश्यकता असते.

समाजकार्यात प्रशासनाबरोबर व्यवस्थापन हा घटकदेखील महत्त्वाचा असतो. समाजकार्याची दिशा ठरविणे व्यवस्थापनाच्या हातात असते. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी उपक्रम हाती घेणे हे व्यवस्थापनाचे कार्य असते. व्यवस्थापन प्रशिक्षित कार्य कुशल व्यक्ती असतील तर ठरलेली उद्दिष्टे साध्य करता येतात. एकंदरीत समाजकार्यात संशोधन, प्रशासन, व्यवस्थापनाची आवश्यकता याचे विवेचन या प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ८.२ समाजकार्य संशोधन

समाजकार्य संशोधन समाजकार्याची एक सहाय्यक पद्धती आहे. सामाजिक संशोधनाला एक वैज्ञानिक पद्धती म्हणून संबोधले जाते. सामाजिक संशोधनात निरीक्षण परीक्षण तथ्य संकलन त्याचे वर्गीकरण आणि निष्कर्ष या सर्वांची एक पद्धती अंगीकारली जाते. संशोधन ही एक अशी पद्धती आहे. ज्या द्वारे संशोधनकर्ता तथ्याचे व्यवस्थित परीक्षण करतो. त्याचे वर्गीकरण करून विश्लेषण करतो व त्याचे निष्कर्ष काढून आपल्या ज्ञानाचा विकास करतो.

समाजकार्यात संशोधन पद्धतीचा सहाय्यकारी पद्धत म्हणून उपयोग केला जातो. सामाजिक संशोधनाच्या कार्यप्रणालीचा अवलंब समाजकार्य संशोधनात केला जातो. सामाजिक संशोधनाच्या ज्या क्रिया आणि पद्धती समाजकार्य संशोधनाला उपयुक्त नसतात, त्या गरजेनुसार बदलल्या जातात. नवीन साधने निर्माण केली जातात. समाजकार्य संशोधन विशिष्ट घटक व सामूहिक विषयांवर केले जाते. त्यातून समाजकार्याच्या कार्यक्रमाची निर्मिती होते.



https://www.samajkaryshiksha.com

## ८.२.१ समाजकार्य संशोधनाचा अर्थ :

सामाजिक परिस्थितीची योग्य माहिती असणे व त्याचे विश्लेषण होणे समाजकार्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यासाठी समाजकार्याचे संशोधन ही प्रभावी पद्धत आहे. समाजकार्यात वापरण्यात येणाऱ्या मूलभूत संकल्पनांचा अभ्यास समाजकार्य संशोधनात केला जातो. समस्या सहसंबंध, आंतरक्रिया, प्रतिसाद संघटनाच्या संबंधातील अध्ययन यात केले जाते. म्हणून समाजकार्य संशोधनाचा अर्थ समाजकार्य संशोधकांनी वेगवेगळ्या पद्धतीने स्पष्ट केला आहे.

१) फ्रिडलँडर यांच्या मते, "समाजकार्यात संशोधन, समाजकार्य ज्ञान आणि निपुणतेची ओळख सामान्यीकरण आणि विस्तार करण्यासाठी समाजकार्य संघटन कार्य तसेच पद्धतींच्या वैधतेचे आलोचनात्मक वैज्ञानिक परीक्षण होय."

२) जॉन डेवी यांच्या मते, "समाजकार्य संशोधनाचे कार्य समाजकार्य उद्देश आणि साधनांची विस्तृततामध्ये पूर्त करण्यासाठी निर्भर करण्यायोग्य ज्ञानाच्या समूहाच्या विकासाला प्रोत्साहित करणे हे आहे."

३) हॉशवाल्ड यांच्या मते, "समाजकार्य अभ्यासातील समस्यांच्या अध्ययनात सामाजिक संशोधनाचा प्रयोग करणे."

४) समाजकार्याच्या कार्यक्षेत्राशी, संबंधित असणाऱ्या समस्यांचे पद्धतशीर तर्कनिष्ठ व वस्तुनिष्ठ अध्ययन करणे. तसेच नवी तथ्ये, संशोधणे, क्रम लावणे, त्यांच्या परस्पर संबंधाचे स्वरूप जाणणे त्याचे स्वरूप ठरवणारे नियम शोधणे त्यांचे स्पष्टीकरण शोधणे म्हणजे समाजकार्य संशोधन होय.

५) समाजकार्यकर्त्यांना येणाऱ्या समस्यांशी समाजकार्य संशोधनाचा संबंध असतो. समाजकार्य सेवांच्या योजना करताना व त्यांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या समस्यांशी, तसेच समाजकार्याशी संबंध असणाऱ्या इतर विषयात संशोधन करणे म्हणजे समाजकार्य संशोधन होय.

६) समाजकार्याच्या अभ्यास विषयावर निरीक्षण प्रयोग व तत्त्वांवर आधारलेली माहिती व तथ्ये एकत्र करून व्यक्ती गट समाज त्यांच्या समस्यांना उत्तरे शोधणे म्हणजे समाजकार्य संशोधन होय.

समाजकार्याला येणाऱ्या समस्यांचे समाधानही संशोधनाचा विषय होतो. समाज व संबंधित संकल्पनांबद्दल माहिती गोळा करण्याचे संघटित प्रयत्न म्हणजे समाजकार्य संशोधन होय. समाजकार्यात संशोधन पद्धतीच्या सहाय्यकारी पद्धत म्हणून उपयोग केला जातो. अशा प्रकारे समाजकार्याच्या ज्ञान कक्षा वाढवणे हे समाजकार्य संशोधनाचे उद्दिष्ट असते. समाजकार्य क्षेत्रात समाजातील प्रश्नांवर पद्धतशीर टीकात्मक संशोधन करणे म्हणजे समाजकार्य संशोधन होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्य संशोधनाचा अर्थ सांगा.

### ८.२.२ समाजकार्य संशोधनाचे उद्देश :

समाजकार्य संशोधन व्यक्ती, समूह, समुदायाला समाजसेवा प्रदान करण्यासाठी व्यावसायिक समाज कार्यकर्त्याला मार्गदर्शन करण्यासाठी प्रायोगिले जाते. समाजकार्य संशोधनाचे कमी समीपवर्ती असतात. समाजकार्य संशोधन समस्या समाधानासाठी संबंधित आहे. समाजकार्य संशोधनाचा सामान्य उद्देश आवश्यक ज्ञानाचे परीक्षण करून त्याचा विस्तार करणे आणि त्याला समाजकार्य प्रयोगासाठी उपलब्ध करणे आहे.

१) समाजकार्याची व्याप्ती वाढविणे.

२) समाजकार्य उद्देश व तत्त्वज्ञानाचा फेरविचार करणे.

३) समाजकार्य संकल्पनांचा पुन्हा अभ्यास करणे व पद्धतशीर ज्ञानाची उभारणी करणे.

४) समाजकार्य ज्ञान व प्रत्यक्ष कार्य यातील संबंध स्पष्ट करणे.

५) सेवांची गरज जाणणे, सेवांच्या दर्जाचे मूल्यांकन करणे व कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणणे.

६) समाजातील गरजांचा सामाजिक नियोजनाशी व सामाजिक आंदोलनाशी संबंध जोडणे.

७) संशोधनाद्वारे समाजकार्य पद्धतींची परिणामकारकता वाढवणे. समाजकार्याला पर्याय असणाऱ्या कार्यक्रमांचे व तंत्रांचे अध्ययन करून समाजकार्यात परिवर्तन घडविण्यासाठी ज्ञान उपलब्ध करून देणे.

८) व्यक्ती विघटन व समाज विघटनाच्या कारणांचे सखोल अध्ययन करून उपाययोजना सुचविणे.

९) विविध परिस्थितीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या क्षमता जाणणे.

समाजकार्य संशोधनाच्या समाजात प्रत्यक्ष वापर व उपयोग होतो. या संशोधनाला विशिष्ट उद्देश असतो. सामाजिक संशोधनाचे प्राथमिक उद्देश समाजकार्य संशोधनापेक्षा वेगळे असतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्य संशोधनाचे उद्देश स्पष्ट करा.

### ८.२.३ समाजकार्यात संशोधनाचे प्रकार :

समाजकार्याच्या ज्ञानक्षेत्रात व कार्यक्षेत्रात येणारे विषय समाजकार्य संशोधनात येतात. पिलीप केलीन यांनी समाजकार्य संशोधनाचे पुढील प्रकार दिले आहेत. हे प्रकार संशोधनाला दिशा देण्याचे कार्य करतात. असे संशोधनाचे प्रकार पुढीलप्रमाणे.

१) सेवांची गरज असणारी क्षेत्र ओळखण्यासाठी केलेले संशोधन.

२) गरजांच्या संदर्भात देण्यात येणाऱ्या सेवांची तुलना करणारे संशोधन.

३) समाजकार्यातून होणाऱ्या कामाचे मूल्यांकन, चाचणी मापन करणारे संशोधन.

४) समाजकार्याच्या पद्धतींच्या तंत्राच्या परिणामकारकतेची चाचणी करणारे संशोधन.

५) समाजकार्यात आवश्यक मानल्या गेलेल्या संकल्पनांची उपयोगिता संशोधन.

**८.२.४ समाजकार्यात संशोधनाचे महत्त्व :**

समाजकार्यास सुरूवात करण्यापूर्वी त्या सेवेची गरज प्रस्थापित होणे महत्त्वाचे असते. व्यक्तींच्या गरजांचे अध्ययन होणे गरजेचे असते. कारण समाजकार्य हे गरजांवर व सेवार्थींवर केंद्रित असते. संशोधनाद्वारे गरजूंची संख्या जाणणे महत्त्वाचे असते. अस्तित्वात असणाऱ्या संस्थां, त्यांच्याद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा, त्यातून लोकांची पूर्ण होणारी गरज जाणून घेतल्याने योग्य सेवांचे नियोजन करणे शक्य होते. कार्यकर्ता व संस्थां त्यांच्या कार्याचे मूल्यांकन संशोधनातून शक्य होते. म्हणून समाजकार्यात संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) सेवांची परिणामकारकता वाढविण्यासाठी :**

समाजासाठी अस्तित्वात असणाऱ्या सेवांची परिणामकारकता संशोधनातून जाणता येते. त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी संशोधनातून मिळणार्या ज्ञानाचा उपयोग करता येतो.

**२) समाजकार्याची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी :**

सध्याचे तत्त्वज्ञान व सिद्धांत तसेच समाजकार्यातील संकल्पना जास्त स्पष्ट होण्यासाठी संशोधनाची मदत होते. समाजशास्त्रीय संकल्पनांची समाजकार्यातील उपयोगिता शोधण्यासाठी समाजकार्यात संशोधन महत्त्वाचे आहे.

**३) समाजकार्याचा शास्त्रशुद्ध विकास करण्यासाठी :**

संशोधनातून ज्या संकल्पना, मूल्ये, मान्यता, गृहिते समाज कार्यात स्वीकारली त्यांचे समाजकार्याच्या दृष्टिकोनातून अध्ययन होणे महत्त्वाचे आहे. संशोधनामुळे समाजकार्याला एक दिशा मिळणे शक्य होते. समाजातील गरजांना अनुसरून समाजकार्याचा विकास, समाजकार्याच्या ज्ञानाचा विकास होणे संशोधनामुळे शक्य होते.

**४) समाजातील समस्यांचा शोध घेण्यासाठी :**

भारतीय समाजात व विशेषत: ग्रामीण समाजात अनेक समस्या आहेत. या समस्यांचा शोध घेण्यासाठी, समस्या सोडविण्याची रूपरेषा तयार करण्यासाठी व प्रत्यक्ष कार्यक्रमांची अंमलबजावणी करून समस्यांची सोडवणूक करण्यासाठी समाजकार्यात संशोधन महत्त्वाचे आहे.

**५) सेवार्थीची अध्ययन करण्यासाठी :**

समाजकार्य ज्ञान सेवा देते अशी सेवा क्षेत्र मोठया प्रमाणात आहेत. समाजातील प्रश्न स्थानिक समस्या भिन्नभिन्न स्वरूपाच्या आहेत. समस्या असणाऱ्या सेवार्थीचे अध्ययन करणे संशोधनामुळे शक्य होते. म्हणून समाजकार्यात संशोधनाला महत्त्वाचे स्थान आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्यात संशोधनाचे महत्त्व सांगा.

## ८.३ सामाजिक संशोधन

सामाजिक संशोधनात महत्त्वाचे दोन शब्द आहेत. एक सामाजिक आणि दुसरे संशोधन. संशोधनाचा अर्थ रेड्मेल आणि मोरी यांनी स्पष्ट केला आहे. संशोधन म्हणजे सर्वात ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पद्धतशीर प्रयत्न अर्थात संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया असून तिच्या द्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यात नवीन ज्ञानाची भर घातली जाते. समाज म्हणजे विशिष्ट लोकांचा गट किंवा समुदाय समजला जातो त्याचा आकार कमी अधिक असू शकतो.

### ८.३.१ सामाजिक संशोधनाच्या व्याख्या :

१) पी.व्ही. यंग यांच्या मते, "सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक जीवनाबाबत नवीन तथ्ये शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्यासाठी त्या तथ्यातील अनुक्रम, परस्पर संबंध व कार्यकारणभाव या विषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पद्धतशीर क्रिया होय."

२) मोझर यांच्या मते, "सामाजिक घटना व समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबद्ध संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात."

या व्याख्यांवरून हे लक्षात येईल की, सामाजिक संशोधनात नवीन तथ्य उजेडात आणणे जुन्या तथ्याचे परिणाम सिद्ध करणे, तथ्यांचा अनुक्रम, परस्परसंबंध, त्याच्यातील कार्यकारणभाव ठरविणे, शास्त्रशुद्ध पद्धतीने नियम शोधून काढणे या नियमाचे स्पष्टीकरण करणे इत्यादी कार्याचा समावेश होतो.

### ८.३.१ सामाजिक संशोधनाची वैशिष्टये :

संशोधन हे सर्व ज्ञानशाखांमध्ये सुरू असते पण प्रत्येक ज्ञान शाखेची स्वत:ची वेगळी वैशिष्टये असतात. अशीच सामाजिक संशोधनाची वेगळी वैशिष्टये आहेत. ही वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

#### १) सामाजिक घटनांचा अभ्यास :

सामाजिक संशोधनाचा संबंध सामाजिक घटनांशी येतो. संशोधनात या घटनांचा अभ्यास केला जातो. समाज व्यक्तींचा मिळून बनलेला असतो. म्हणून व्यक्तींच्या सामाजिक वर्तनाचा, कृतीचा, क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास हे सामाजिक संशोधन कार्य आहे.

#### २) नवीन तथ्यांचा शोध व जुन्या तथ्यांचे परीक्षण :

सामाजिक संशोधनाचे प्रमुख कार्य नवीन ज्ञान संपादन करून जुन्या ज्ञानात भर टाकणे आणि प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या आधारे सामाजिक निष्कर्ष काढणे हे असते. म्हणून संशोधकाला नवीन परीक्षण करावे लागते. जुन्या तथ्यांचे प्राधान्य ठरवावे लागते. म्हणून जुनी तथ्य सुधारण्यासाठी सामाजिक संशोधन केले जाते.

**३) कार्यकारण संबंधाचा शोध :**

मानवाचे वर्तन व त्याच्या क्रिया-प्रक्रिया हा सामाजिक संशोधनाचा विषय आहे. मानवी वर्तनामध्ये, त्याच्या कृतीमध्ये कार्यकारणभाव असतो. हा कार्यकारणभाव शोधून त्याच्या आधारे सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न सामाजिक संशोधनात केला जातो.

**४) वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग :**

सामाजिक संशोधनात वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग केला जातो. त्यात निरीक्षण, तथ्यांचे संकलन वर्गीकरण व निष्कर्ष काढणे या सर्व प्रक्रिया अमलात आणल्या जातात. वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब ही सामाजिक संशोधनाचे वैशिष्टये आहे.

**५) सांख्यिकीय विश्लेषण :**

सामाजिक संशोधनात सांख्यिकीय पद्धतीचा अवलंब केला जातो. सांख्यिकीय पद्धतीला संशोधनात फार महत्त्वाचे स्थान आहे. सांख्यिकी पद्धतीमुळे मिळालेल्या तथ्यांची मांडणी संक्षिप्त स्वरूपात करता येते. त्याचे योग्य वर्गीकरण करता येते. आकृती किंवा तक्ते यांचा उपयोग करून माहिती समजावून सांगता येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) सामाजिक संशोधनाची व्याख्या सांगून वैशिष्टये स्पष्ट करा.

## ८.४ समाजकार्य प्रशासन

समाजकार्य हे क्षेत्र व्यापक स्वरूपाचे आहे. त्याची व्याप्ती फार मोठी आहे. समाजकार्यातील सेवांचे व्यापक स्तरावर म्हणजेच क्षितिज समांतर पातळीवर व लंबरेषेच्या पातळीवर व्यवस्थापन केले जाते. समाजकार्य क्षेत्रात विविध उपक्रमांचे एकत्रीकरण केले जाते. तेव्हा त्याची व्याप्ती वाढते. ठरलेले उपक्रम सुनियोजित पद्धतीने राबवण्यासाठी प्रशासनाची आवश्यकता असते.

ज्या क्षेत्रात समाजकार्याचे प्रशासन करावयाचे आहे. त्या क्षेत्राचे ज्ञान असणे व त्या क्षेत्राचे प्रशासन करण्यासाठी प्रशासनाचे ज्ञान असणे महत्त्वाचे असते. त्यामुळे कार्य व त्याचा प्रभाव व उपयोगिता वाढते. समाजकार्याचा उद्देश समाजाला सेवा पुरविणे हा असतो. या सेवा विशिष्ट तंत्राने देण्यासाठी व त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी प्रशासन महत्त्वाचे मानले जाते. सुयोग्य प्रशासन व परिणामकारक समाजकार्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**समाजकार्य प्रशासनाचा अर्थ :**

१) काही विशेष उद्देश पुढे ठेवून सामाजिक योजनांचे सामाजिक क्रियेत रूपांतर करण्यासाठी व व्यवसायिक क्षमतांचा त्यात उपयोग करण्यासाठी वापरण्यात येणारी प्रशासनाची प्रक्रिया म्हणजे समाजकार्य प्रशासन होय.

२) समाज उपयोगी उपक्रमांद्वारे देण्यात येणाऱ्या सेवांचा प्रत्यक्ष उपयोग व्हावा, उपक्रमाचा उद्देश पूर्ण व्हावा म्हणून जेव्हा समाजकार्याच्या पद्धतींचा, क्षमतांचा, व्यावसायिकतेचा उपयोग करून प्रशासन केले जाते. तेव्हा त्याला समाजकार्य प्रशासन म्हणतात.

३) सेवाकार्याचा उद्देश पूर्ण करण्यासाठी सेवाकार्याचे ज्ञान असणाऱ्या व त्यात रुची असणार्यांची सेवा कार्य राबविण्याच्या कामात गरज असते. अशा व्यक्तींकडून किंवा व्यावसयिकांकडून सेवाकार्याचे प्रशासन सांभाळले जाते. तेव्हा त्याला समाजकार्य प्रशासन म्हणतात.

४) समाजकार्य सेवांची उपयोगिता वाढविण्यासाठी जे प्रशासन केले जाते त्याला समाजकार्य प्रशासन म्हणतात.


समाजकार्य प्रशासनाचा अर्थ समजावून घेतल्यानंतर समाजकार्य प्रशासन किती महत्त्वाचे स्थान आहे हे लक्षात येते. समाजकार्यात गरजूंना सेवा पुरविल्या जातात. व्यक्ती व्यक्तीनुसार गरजा भिन्न भिन्न स्वरूपाच्या असतात. एकाच वेळी अनेक व्यक्तींना त्यांच्या गरजेनुसार सेवा पुरविण्यासाठी योग्य नियोजन करावे लागते हे काम प्रशासन चोख बजावत असते म्हणून समाजकार्यात प्रशासन महत्त्वाचे मानले जाते.

### ८.४.१ समाजकार्य प्रशासनाचे पैलू :

समाजकार्य प्रशासनाचे पैलू पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) संघटन :**

समाजकार्यात समाजकार्यकर्ता व सेवार्थी हे दोन घटक महत्त्वाचे असतात. या दोन्ही घटकांचे संघटन करण्याचे काम प्रशासनावर असते. समाज कार्याची व्याप्ती मोठी असेल तर अनेक कार्यकर्ते काम करत असतात. वेगवेगळ्या सामाजिक स्तरावर समाजातील घटकांसाठी कामे करावी लागतात. अशा वेळी संघटन करण्याचे काम प्रशासन करत असते.



https://social-work.in

**२) योजना व कार्यक्रम :**

समाजकार्यात समाज विकासासाठी विविध योजना व कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करावी लागते. कार्यक्रमांची आखणी करण्याचे महत्त्वाचे कार्य समाजकार्य प्रशासनाला करावे लागते. तेव्हा समाजकार्यकर्ता त्यांची योग्य अंमलबजावणी आपल्या कार्यक्षेत्रात करू शकतो.

**३) व्यवस्थापन :**

समाजकार्य प्रशासनात व्यवस्थापनाला महत्त्वाचे स्थान आहे. कार्याची कार्यप्रणाली ठरविणे त्याचे व्यवस्थापन करणे. एकाच वेळी अनेक कार्य चालू ठेवणे हे प्रशासनाचे काम असते.

**४) पर्यवेक्षण** :

समाजकार्यकर्ता ज्यावेळी सेवार्थींना सेवा पुरविण्याचे कार्य करीत असतो त्यावेळी त्यांच्यावर पर्यवेक्षण करणे नियंत्रण ठेवणे, योग्य दिशा दाखविणे हे कार्य प्रशासनाला करावे लागते.

**५) जनसंपर्क :**

समाजकार्याचे काम अखंडित चालू असते. समाजातील गरजू व्यक्तींना सेवा पुरविण्यासाठी व समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी गरजूंचा शोध घेणे, गरजूंपर्यंत पोहोचणे. समाजाचा समाजकार्यात प्रतिसाद मिळणे हे काम प्रशासनाला करावे लागते.

**६) लेखाजोखा ठेवणे :**

समाजकार्य प्रशासनात सर्व प्रकारच्या नोंदी ठेवणे अपेक्षित असते. आर्थिक व्यवहार पारदर्शक ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. यावरच समाजकार्याची विश्वासाहर्ता असते म्हणून आर्थिक नोंदी ठेवण्याचे कार्य प्रशासनाला करावे लागते.

**८.४.२ समाजकार्य प्रशासनाच्या पायऱ्या :**

समाजकार्याच्या माध्यमातून सामाजिक समस्या व सामाजिक विकृतींना प्रतिबंध करता येतो व त्यावर उपाय योजनाही आखता येतात. अशा समाजकार्याला चालना देण्यासाठी समाजकार्य प्रशासन काम करते. त्यामुळे समाजकल्याण कार्यक्रमांची शक्ती वाढते, प्रभाव वाढतो, कार्यक्रमांना गती येते. प्रशासनातील अधिकार्यांच्या कौशल्यांवर साधनांचा उपयोग व कार्यक्रमांचे यश अवलंबून असते. या समाजकार्य प्रशासनाच्या पायऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सेवा व कार्यक्रमाच्या संदर्भात माहिती एकत्रित करणे व माहितीच्या आधारावर नियोजन व कार्यक्रमांची आखणी करणे.

२) कार्यकर्त्यांची निवड, नेमणूक करणे व प्रशिक्षण देणे योजना आखून त्या कामाची कर्मचार्यांमध्ये विभागणी करणे व अंमलबजावणीची तयारी करणे.

३) कार्यक्रम राबविण्यासाठी व उद्देश पूर्ण करण्यासाठी प्रशासन व्यवस्था व आर्थिक तरतूद करणे व खर्चाची पद्धत तयार करणे.

४) अहवाल तयार करणे, कागदपत्राचे जतन करणे, काम करताना जी माहिती एकत्र आली असेल किंवा माहिती मिळाली असेल ती एकत्र नोंदविणे.

५) ज्या क्षेत्रात समाजकार्य सुरू केले जाणार आहे किंवा प्रत्यक्ष समाजकार्य सुरू आहे त्या समुदायाशी योग्य सहसंबंध विकसित करणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्य प्रशासनाचा अर्थ व पैलू सांगा.

२) समाजकार्य प्रशासनाच्या पायऱ्या सांगा.

## ८.५ समाजकार्य व्यवस्थापन

व्यवस्थापकीय प्रक्रिया समाजकार्यातील कौशल्य व कार्यक्षमतेद्वारा विशिष्ट परिणाम साधण्यासाठी लागू करण्यात येते. म्हणून विविध समाजकार्यात व व्यावसायिक क्षेत्रात जसे वैद्यकीय, शैक्षणिक, उद्योग इ. मध्येही गरजू लोकांना प्रभावशाली सेवा उपलब्ध करून देण्यात व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका निभावते. समाजकार्याच्या क्षेत्रात योग्य प्रमाणात कार्यकर्त्यांची यंत्रणा तयार करावी लागते.

व्यवस्थापनाच्या दोन बाजू असतात. एक कार्यक्रमांच्या संबंधी आणि सेवाक्षेत्रासंबंधी ज्ञान तर दुसरी बाजू समाजकार्याचे नियोजन करणे. कर्मचारी संघटित करणे, कार्यक्रम निश्चित करणे, अंदाजपत्रक तयार करणे, हिशोब ठेवणे इत्यादी. व्यवस्थापनाच्या दोन्ही बाजू प्रभावीपणे वापरणे आणि सहकार्यात्मक पद्धतीने या साधनांचा अधिक परिणामकारक उपयोग करणे अतिशय महत्त्वाचे असते. व्यवस्थापनात फक्त साधन आणि तंत्र महत्त्वाचे नसून ज्या उद्दिष्टांद्वारे यश प्राप्त करावयाचे आहे ते सारखेच महत्त्वाचे असते.

आधुनिक काळात गुंतागुंतीच्या सामाजिक समस्या वाढत आहेत. समाजकार्य करणाऱ्या संस्थां व संघटना याची संख्यादेखील वाढत आहे. समाजकार्याचे क्षेत्र व्यापक होत आहे. सामाजिक समस्यांनुसार सेवांची निर्मिती होत आहे. संघटना व संस्थांच्या माध्यमातून परिणामकारक समाजकार्य करण्यासाठी व्यवस्थापनाची गरज निर्माण झाली आहे. समाजकार्याचा उद्देश समाजाला सेवा प्रदान करणे हा आहे. या सेवा प्रदान करताना शास्त्रशुद्ध कार्यपद्धतीसाठी कार्य करण्यासाठी व्यवस्थापनाची आवश्यकता आहे.

समाजकार्य व्यवस्थापन अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे विशिष्ट उद्दिष्टांसाठी अधिक कार्यक्षमता लावण्यात येते आणि सामाजिक धोरणांचे सामाजिक क्रियेत रूपांतर करता येते. त्याला समाजकार्य व्यवस्थापन असे म्हणतात. समाजकार्यातील पुढील कृती ठरविण्याच्या प्रक्रियेला समाजकार्य व्यवस्थापन म्हणतात.

### ८.५.१ समाजकार्य व्यवस्थापनाची कार्ये :

समाजकार्यातील ठरलेली उद्दिष्टे योग्य वेळी योग्य पद्धतीने पूर्ण करण्यासाठी व्यवस्थापनाची पुढील कार्ये सांगता येतील.

१) संस्थेचा हेतू उद्देश आणि विषय ठरविणे.

२) समाजकार्याला सुरूवात करणे, संस्थां स्थापन करणे आणि संख्या बळकट करणे.

३) संस्थेच्या कामाला दिशा देणे, पुरेसे कर्मचारी व कार्यकर्ते यांची निवड करणे.

४) ठरलेल्या उद्दिष्टांनुसार कार्याला सुरूवात झाल्यानंतर उद्दिष्टे साध्य होत आहे का? याबाबत मूल्यांकन करणे.

५) भविष्याचा वेध घेऊन बदलत्या गरजा आणि संसाधने यांचा योग्य मेळ घालणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्य व्यवस्थापनाचा अर्थ सांगून कार्ये स्पष्ट करा.

**८.५.२ समाजकार्य व्यवस्थापनाची तत्त्वे :**

१) समाजकार्य व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्ती आहेत. त्यांना मानवी वर्तनाची पुरेशी समज असावी आणि सामाजिक समस्या हाताळण्याच्या कौशल्याचे ज्ञान आणि आवश्यक तंत्र अवगत असावे.

२) योग्य विचारपूर्व समाजकार्याची दिशा ठरविणे आणि सर्वांनी समानतापूर्वक वापरणे.

३) व्यवस्थापकीय कामाची जबाबदारी प्रशिक्षित आणि कार्यतत्पर व्यक्ती यांच्यावर सोपविणे. ज्यांना सामाजिक समस्यांची जाण आहे अशा व्यक्तींवर व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविणे.

४) समाजकार्य व्यवस्थापनाचे उद्दिष्ट जबाबदारी देणे. समाजकार्याच्या व्यवस्थापनात कार्यकर्त्यांचा सहभाग वाढविणे व कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे, व्यवस्थापन प्रक्रिया नेहमी जबाबदारीच्या लोकशाही प्रक्रियेवर आधारित असावी.

५) कार्यकर्त्यांमधील प्रत्येक सदस्य आपल्यावर जे काम सोपविण्यात आले आहे ते अतिशय महत्त्वाचे आहे ही भावना व त्याची जाणीव असावी.

६) व्यवस्थापकीय प्रक्रिया ही विशिष्ट उद्दिष्ट साधने आणि समुदायाच्या समस्या सोडविण्यासाठी संस्थेद्वारा वापरण्यात येणारे एक साधन आहे. गरजेनुसार उद्दिष्ट व कार्य बदलणे हे व्यवस्थापनाचे तत्त्व आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजकार्याची तत्त्वे सांगा.

## ८.६ सारांश

समाजकार्याची सेवाभावी पद्धती आपल्या देशात प्राचीन काळापासून प्रचलित आहे. त्यावेळी समाजसुधारकांनी संपूर्ण आयुष्य समाजकार्याला वाहून घेतले होते. समाजातील समस्या ओळखून त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला जात होता. संशोधन प्रशासन व व्यवस्थापनाला फारसे महत्त्व नव्हते, मात्र सध्याच्या आधुनिक युगात व्यावसायिक समाजकार्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. समाजकार्य हा एक व्यवसाय म्हणून केला जात आहे.

सध्या समाजकार्य शास्त्रशूद्ध पद्धतीने करण्यासाठी व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजकार्यात संशोधन केले जात आहे. समाजाची आवश्यक असलेली सर्व माहिती मिळविणे, ती एकत्रित करणे, तिचे विश्लेषण करणे आणि त्या आधारे विकासाची दिशा ठरविणे. त्यासाठी संशोधनाची गरज असते. समाज कामाचे कार्यक्रम नियोजनबद्ध

राबविण्यासाठी प्रशासनाची आवश्यकता असते म्हणून समाजकार्यात प्रशासनाचे महत्त्व वाढणे आहे. प्रशासना बरोबर व्यवस्थापन हा घटकदेखील महत्त्वाचा आहे. समाजकार्यातील कौशल्य व कार्यक्षमता वाढविण्यासाठी व विकास कामांची परिणामकारकता वाढविण्यासाठी व्यवस्थापन आवश्यक असते. समाजकार्याच्या कामाला दिशा देणे. कार्याचे मूल्यमापन करणे व भविष्याचा वेध घेणे यासाठी समाजकार्यात व्यवस्थापनाची आवश्यकता आहे.

## ८.७ संदर्भ सूची

१) प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर - ४४००१०.

२) रा. ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नवी बाजारपेठ, नागपूर.

३) प्राजक्ता टाकसाळे, व्यावसायिक समाजकार्य, विचारधारणा व इतिहास, मंगेश प्रकाशन, नवी रामदास पेठ, नागपूर.

## ८.८ स्वाध्याय

१) समाजकार्य संशोधन म्हणजे काय? सामाजिक संशोधनाची विविध उद्दिष्टे स्पष्ट करा.

२) समाजकार्य संशोधनाचा अर्थ सांगून सामाजिक संशोधनाचे महत्त्व स्पष्ट करा.

३) समाजकार्य संशोधनाचे उद्देश व महत्त्व स्पष्ट करा.

४) सामाजिक संशोधनाची व्याख्या सांगून वैशिष्टये स्पष्ट करा.

५) समाजकार्य प्रशासनाचा अर्थ सांगून समाजकार्य प्रशासनाच्या पायऱ्या स्पष्ट करा.

६) समाजकार्य प्रशासनावर सविस्तर टीपण लिहा.

७) समाजकार्य व्यवस्थापन म्हणजे काय? समाजकार्य व्यवस्थापनाची कार्ये सांगा.

८) समाजकार्य व्यवस्थापनाची तत्त्वे व कार्ये स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ९

# संशोधन अहवाल लेखन

**घटक रचना :**

९.० अभ्यासाची उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ संशोधन अहवालाची व्याख्या

९.३ संशोधन अहवालाचेउद्देश

९.४ संशोधन अहवालाचे घटक

९.५ संशोधनअहवालाची वैशिष्ट्ये

९.६ संशोधनअहवालाचे महत्त्व

९.७ संशोधन अहवाल तयार करताना येणाऱ्या समस्या

९.८ सारांश

९.९ संदर्भ सूची

९.१० स्वाध्याय

## ९.० अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. संशोधन अहवालाची व्याख्या अभ्यासणे

२. संशोधन अहवालाचे उद्देश अभ्यासणे

३. संशोधन अहवालाचे घटक अभ्यासणे

४. संशोधन अहवालाची वैशिट्ये अभ्यासणे

५. संशोधन अहवालाचे महत्त्व अभ्यासणे

६.संशोधन अहवाल तयार करताना येणाऱ्या समस्या अभ्यासणे

## ९.१ प्रस्तावना

सामाजिक संशोधनातील संशोधन अहवाल ही अंतिम किंवा शेवटची अवस्था आहे. संशोधकाने संशोधनाची समस्या निवड केल्यानंतर संशोधनाचा आराखडा तयार केला जातो. संशोधनाच्या आराखड्यानंतर वेगवेगळ्या माहिती संकलन पद्धतीने माहितीचे संकलन केले जाते. संकलित तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, सांख्यिकीय तंत्राचा वापर आणि निष्कर्ष काढले जातात. या सर्व अवस्था पूर्ण केल्यानंतर संशोधकास संशोधन विषयक अहवाल तयार करावा लागतो. संशोधन विषयक अहवाल तयार करताना संशोधकास वेगवेगळ्या समस्या येतात. संशोधकाने संशोधनात मध्ये संकलित केलेल्या

एकूण तथ्याचे वर्गीकरण, सारणीकरण, विश्लेषण आणि अर्थबोध झाल्यानंतर विषय निवडण्याच्या पार्श्वभूमीपासूननिष्कर्ष काढण्यापर्यंतची माहिती सुसूत्रीत पद्धतीने शब्दांकित करण्याची प्रक्रिया म्हणजे अहवाल लेखन होय. संशोधनाचा अहवाल तयार केल्यामुळे संशोधकाने कोणत्या विषयाबाबत कशाप्रकारे संशोधन केले ? कोणते निष्कर्ष मांडले ? या संबंधीची माहिती प्राप्त होते. त्या विषयाच्या संबंधात दुसरा कोणता संशोधक संशोधन करून त्या निष्कर्षांचे पुनर्परीक्षण करू शकतो. तसेच संशोधकाने आपल्या संशोधनातून मांडलेल्या महत्त्वपूर्ण सूचना व उपाय लक्षात घेऊन विशेष सामाजिक योजना तयार करणे शक्य होते. संशोधन हे एक व्यक्ती किंवा काही व्यक्ती करत असले तरी त्याने केलेले संशोधन लोकांपुढे येणे आवश्यक असते. यासाठी संशोधन अहवाल लिखित स्वरूपात प्रस्तुत करणे महत्त्वाचे मानले जाते.

## ९.२ संशोधन अहवालाची व्याख्या

संशोधन अहवाल हा संशोधकाचे लिखित स्वरूप आहे. संशोधनाची संपूर्ण प्रक्रिया योग्य क्रमाने लिहून काढणे म्हणजे अहवाल होय.संशोधन अहवालाच्या वेगवेगळ्या व्याख्या मांडलेल्या आहेत.

“समाजाने केलेले परिणामकारक आणि हेतूपूर्वक निवेदन म्हणजे खरेखुरे संशोधन म्हणजेच खरेखुरे अहवाल लेखन होय.”

“संशोधनासाठी विषयाची निवड करण्यापासून संकलित केलेल्या तथ्याचे विश्लेषण करणे, गृहीतकांची तपासणी सांख्यिकीय पद्धतीच्या सहाय्याने केल्यानंतर संशोधकाने योग्य आणि संशोधनात्मक भाषेत लिहिलेले वस्तुनिष्ठ स्वरूपातील प्रकरण निहाय अनुभव म्हणजे संशोधन अहवाल होय.”

## ९.३ संशोधन अहवालाचे उद्देश

संशोधनाचा अहवाल तयार करणे हा संशोधन प्रक्रियेतील अंतिम टप्पा आहे. संशोधन कार्य संपल्यानंतर त्याचा विस्तृत अहवाल तयार करणे आवश्यक असते. अहवालाचा उद्देश हा अध्ययन किंवा संशोधनाचा संपूर्ण निकाल किंवा परिणामाविषयी रुची ठेवणाऱ्या व्यक्तींपुढे अहवाल सविस्तर प्रस्तुत करणे आणि संशोधनाच्या परिणामास व्यवस्थितपणे मांडणे ज्यामुळे तो अहवाल वाचणारा प्रत्येक व्यक्ती तथ्यांना समजण्यास आणि निष्कर्षाची वैधता स्वतः निर्धारित करण्यास समर्थ होऊ शकेल. म्हणजेच संशोधनाचा अहवाल तयार करणे आवश्यक बाब आहे. संशोधन अहवालाची उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

**१. ज्ञानाचा दस्तऐवज प्रस्तुत करणे :**

कोणतेही संशोधनकार्य हे कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या ज्ञानाचा एक स्रोत असतो. संशोधनाकरिता संशोधक आपले श्रम, वेळ आणि पैसा खर्च करतो. संशोधन करताना आपले संशोधन केवळ आपल्यापुरतेच मर्यादित ठेवले तर ते संशोधन फारसे उपयुक्त ठरणार नाही. मात्र संशोधन अहवालाच्या स्वरूपात प्रस्तुत केले तर त्याचा फायदा समाजातील इतर घटकांना होऊ शकतो. म्हणून संशोधनास एका क्रमबद्ध पद्धतीने लिखित स्वरूपात प्रस्तुत करणे आवश्यक असते. अहवालाद्वारे एक प्रकारे ज्ञानाचा दस्तऐवज प्रस्तुत केला जातो.

### २. ज्ञानाची वृद्धी करण्यासाठी :

संशोधनात तथ्याच्या विश्लेषण आणि निर्वाचनामुळे अध्ययन विषयाचे स्पष्टीकरण होते आणि त्या विषयाबाबत काही निष्कर्ष मानले जातात. त्याचप्रमाणे त्या विषयाबाबत इतर कोणत्या समस्या आहेत ज्याबाबत पुढे आणखी सखोल अध्ययन केले जाऊ शकते याबद्दल शोध घेतला जातो. संशोधन अहवालात संशोधनकर्ता आपल्या संशोधनाविषयी माहिती देतो. तसेच इतर अनेक नवीन समस्या, प्रश्न आणि विषयाच्या संदर्भात अधिक संशोधन करण्याची आवश्यकता स्पष्ट करतो. त्यामुळे त्या अहवालावरून कोणत्या नवीन विषय किंवा क्षेत्र बाबत संशोधन केले पाहिजे याची देखील माहिती मिळते म्हणून संशोधन अहवालाद्वारे नवीन विषयाबाबत संशोधन करण्याची प्रेरणा मिळून ज्ञानवृद्धी केली जाते.

### ३. वास्तविक परिस्थिती स्पष्ट करणे :

संशोधन अहवाल व्यवस्थित आणि वैज्ञानिक पद्धतीने प्रस्तुत केला जातो. संशोधन विषयाच्या विविध पैलूंची वास्तविकता स्पष्ट व्हावी ज्यामुळे तो अहवाल वाचणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्या विषयामध्ये अंतर्भूत असणारी वास्तविक परिस्थिती आणि अंतर संबंध समजू शकेल हा संशोधन अहवालाचा आणखी महत्त्वाचा उद्देश आहे. संशोधन सबंधीची माहिती म्हणून संशोधन अहवाल वाचून संशोधनातील नवीन तथ्य आणि त्यांचे सामाजिक परिणाम इतरांना समजणे आवश्यक असते म्हणून संशोधन अहवाल तयार करताना वास्तविक परिस्थिती स्पष्ट करणे हा संशोधन अहवालाचा मुख्य उद्देश आहे.

### ४. संशोधनाचे परीणाम इतरांच्या माहिती करिता प्रस्तुत करणे :

संशोधनाचे परिणाम इतर लोकांच्या माहितीकरता प्रस्तुत करणे हा संशोधन अहवालाचा एक अतिशय महत्त्वाचा उद्देश आहे. संशोधनातून काढण्यात आलेले निष्कर्ष त्या विषयासंबंधीत लोक आणि संशोधनास रुची ठेवणाऱ्या लोकांसमोर मांडणे आवश्यक असते. संशोधनकर्ता अतिशय परिश्रमपूर्वक संशोधन करतो आणि त्या संशोधनातून काही निष्कर्ष मांडतो. म्हणून ते संशोधन लोकांसमोर मांडण्यासाठी संशोधनकर्ताउत्सुक असतो. संशोधन अहवालाचा उद्देश हा स्वतः करिता नाही तर लोकांना संशोधनाची माहिती देणे हा आहे. म्हणून संशोधनाचे परिणाम इतर लोकांच्या माहितीकरिता प्रस्तुत करणे हा संशोधन अहवालाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे.

### ५. सार्वजनिक उपयोगाकरिता शासकीय योजना तयार करणे :

सामाजिक धोरणे ठरविणे याकरिता देखील संशोधनाचा उपयोग होतो. समाजात विविध सामाजिक समस्या असतात. संशोधन सामाजिक समस्यांशी संबंधित असेल तर त्याचा उपयोग सामाजिक समस्या सोडवण्याच्या दृष्टीने केला जाऊ शकतो. संशोधनाचा सार्वजनिक कार्याकरिता उपयोग व्हावा म्हणून संशोधन अहवाल प्रस्तुत करणे आवश्यक असते.

### ६. वैधता किंवा प्रमाणाचे परीक्षा करणे :

एका संशोधनकर्त्याने केलेले संशोधन हे योग्य आहे किंवा नाही त्याची परीक्षा करणे आवश्यक असते. संशोधन करताना आपले संशोधन योग्य वाटते परंतु जेव्हा संशोधन अहवालाच्या रूपात लोकांसमोर येते तेव्हा अहवालाचे अध्ययन करून मांडण्यात आलेले निष्कर्ष योग्य आहे की अयोग्य, संशोधन करताना वैज्ञानिक पद्धतीने संशोधन केले आहे किंवा नाही इत्यादी गोष्टी स्पष्टपणे सांगणे शक्य होते. जर कोणाला त्या संशोधनाच्या प्रमाणाबाबत शंका असेल तर पुन्हा संशोधन करून त्या संशोधनाच्या निष्कर्षाचे पुन्हा परीक्षण केले जाते आणि त्याच आधारावर मांडलेले निष्कर्ष सत्य किंवा असत्य ठरवणे शक्य होते.

**आपली प्रगती तपासा :**

१. संशोधन अहवालाची व्याख्या सांगून संशोधन अहवालाचे उद्देश स्पष्ट करा.

## ९.४ संशोधन अहवालाचे घटक

झालेल्या संशोधनाची अहवालाच्या रूपात क्रमबद्ध मांडणी करण्यासाठी अहवालातील संशोधनाचे घटक अत्यंत महत्त्वाचे असतात. अहवालावरून संशोधन संबंधीची संपूर्ण माहिती प्राप्त होते. अहवालात संशोधनाविषयीच्या सर्व गोष्टींचा समावेश असतो. अहवाल संतुलित असणे आवश्यक असते. संशोधन अहवालात पुढील गोष्टींचा समावेश असतो.

### १. प्रस्तावना :

संशोधन अहवालात सुरुवातीला संशोधनाची पार्श्वभूमी मांडावी लागते. प्रस्तावनेच्या स्वरूपात पार्श्वभूमी मांडली जाते. प्रस्तावनेमध्ये संशोधनाचा विचार कसा सुचला, योजना, महत्त्व आणि संघटन इत्यादी बाबत थोडक्यात माहिती दिली जाते. संशोधन कार्य करणाऱ्या शासकीय किंवा अशासकीय संस्थांचा परिचय, संशोधनकार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनेचा परिचय, कार्यकर्त्यांची निवड आणि प्रशिक्षण, निरीक्षण, तथ्यांची शुद्धता, प्रामाणिकता आणि विश्वसनीयतेचे आधार इत्यादी बाबींचा देखील प्रस्तावनेत उल्लेख असतो. संशोधनासाठी लागणारा कालावधी आणि खर्चाबाबत अगदी थोडक्यात माहिती दिली जाते. संशोधन करताना निर्माण झालेल्या समस्यांचा उल्लेख केला जातो. अहवालात कोणत्या क्रमाने कोणत्या विषयाबाबत माहिती इत्यादी गोष्टींचे थोडक्यात विवेचन केले जाते.

### २. समस्यांचे किंवा विषयाचे वर्णन :

प्रस्तावनेनंतर संशोधन समस्या किंवा विषयाची माहिती प्रस्तुत केली जाते. समस्या किंवा विषयाची पार्श्वभूमी आणि त्यासंबंधात संशोधन करण्याची आवश्यकता याचे वर्णन केले जाते. संशोधन समस्या आणि विषयाची निवड का केली? त्याचे कोणते आधार आहेत? आणि समस्या अध्ययनातून कोणता सैद्धांतिक आणि व्यवहारीक फायदा किंवा लाभ होऊ शकतो? इत्यादी गोष्टींचे विवरण अहवालात दिले जाते. त्याचप्रमाणे त्या समस्यांच्या सबंधात अध्ययन झाले आहे का? जर अध्ययन झाले असेल तर त्या अध्ययनाचे स्वरूप कोणते? त्या अध्ययनाशी प्रस्तुत अध्ययनाचा कोणता संबंध आहे काय? इत्यादी गोष्टींचे स्पष्टीकरण केले जाते.




https://marathivishwakosh.org

### ३. संशोधनाचा उद्देश :

कोणत्याही संशोधनाचा उद्देश हा ज्ञानाची वृद्धी करणे किंवा व्यवहारिक लाभ प्राप्त करणे हा असतो. अहवाल लेखनात संशोधनाचे उद्देश स्पष्ट असावे लागतात.संशोधनाच्याउद्देशाने अनुसरून संशोधन होत असते.त्यावर आधारित निष्कर्ष काढता येतात. म्हणून उद्देशांची मांडणी करणे हा खऱ्या अर्थाने संशोधनाचा गाभा असतो. संशोधनाचा उद्देश नवीन ज्ञानाची प्राप्ती करणे, विद्यमान सिद्धांताची परीक्षा करणे किंवा कोणता व्यावहारिक लाभ प्राप्त करणे आवश्यक आहे यासंबंधीचा स्पष्ट उल्लेख संशोधन अहवालात केला जातो. संशोधनाचा उद्देश कोणता आहे हे स्पष्ट करणे आवश्यक असते.

### ४. संशोधनाचे क्षेत्र :

संशोधनाचे क्षेत्र कोणते आहे. याविषयीची माहिती अहवालात नमूद केले जाते. संशोधनाचे क्षेत्र हे भौगोलिक प्रदेश, सामाजिक वर्ग किंवा निश्चित समुदाय असू शकते. त्या समुदाय किंवा वर्गाच्या जीवनातील कोणत्या पैलू किंवा समस्यांचे अध्ययन करण्यात आले आहे. यासंबंधीची माहिती दिली जाते. त्याचप्रमाणे त्या समुदाय किंवा वर्गाच्या सामाजिक, लोकसंख्यात्मक आणि आर्थिक वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करून संशोधन क्षेत्राच्या निश्चितीबाबतची माहिती प्रस्तुत केली जाते.

### ५. तथ्य संकलनाच्या पद्धती :

संशोधनात आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन केले जाते. तथ्य संकलनाचे प्रामुख्याने प्राथमिक आणि द्वितीय हे दोन स्रोत आहेत. तसेच निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत व अनुसूची ही प्राथमिक तथ्यांचे स्रोत आहेत. प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी कोणत्या पद्धतीचा उपयोग केला आणि त्या पद्धतीने द्वारे तथ्यांचे संकलन करण्याची कारणे कोणती? याबाबतचा स्पष्ट उल्लेख संशोधन अहवालात केला जातो.

### ६. नमुना निवड पद्धत :

प्रत्येक संशोधनात जनगणना पद्धतीने तथ्य संकलन करणे शक्य नसते. त्याकरिता नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जातो. संशोधनात कोणत्या प्रकारच्या नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आला. ती नमुना निवड पद्धती संशोधना करिता कशी उपयुक्त आहे. इत्यादी गोष्टींचे स्पष्टीकरण संशोधन अहवालात दिले जाते.

### ७. संशोधन कार्याचे संघटन :

संशोधन कार्याचे कोणत्या पद्धतीने व्यवस्थित संघटन करण्यात आले. या विषयाचे विवेचन संशोधन अहवालात दिले जाते. अध्ययन स्थळ किंवा घटनांची निवड कशा प्रकारे केली.कार्यकर्त्यांची निवड,त्यांचे प्रशिक्षण, त्यांच्या कार्याचे विभाजन, त्यांच्या कार्याच्या निरक्षणाची व्यवस्था, संकलित तथ्याचे विश्वासनीयता आणि प्रामाणिकरण याविषयी परीक्षण करणे, तथ्याचे संपादन आणि संकेतीकरणाची व्यवस्था इत्यादी गोष्टी संशोधन करताना व्यवस्थितपणे मांडाव्या लागतात. या सर्व गोष्टींचे अर्थात संशोधन कार्याचे संघटन कसे केले याची माहिती संशोधन अहवालात द्यावी लागते.

### ८. विश्लेषण आणि निर्वाचन :

संशोधनात तथ्याचे संकलन केल्यानंतर त्या तथ्यांना व्यवस्थित मांडावे लागते. त्याकरिता तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण व सारणीकरण करून विश्लेषण केले जाते.तथ्यांच्या विश्लेषणात त्यांचे कार्यकारण संबंध स्पष्ट केले जातात. संशोधनाच्या वर्णनात्मक निर्वचनात त्यांच्या निष्कर्षांना प्रस्तुत केले जाते. तसेच निष्कर्षांच्या आधारांचे स्पष्टीकरण केले जाते. विश्लेषण करताना तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण केले जाते. बिंदूरेखित चित्रे काढले जातात. संशोधन अहवाल अधिक आकर्षक करण्यासाठी फोटोंचा देखील उपयोग केला जातो. द्वितीय तथ्यांचा संशोधनात उपयोग केला असल्यास त्यासंबंधीचे संदर्भ देखील दिले जातात.

### ९. तथ्यांची उल्लेखनीय वैशिष्ट्ये :

संशोधन अहवालात विश्लेषण आणि निर्वचनानंतर एक स्वतंत्र प्रकरणात संशोधनातील संकलित तथ्यांचे विशेष किंवा उल्लेखनीय वैशिष्ट्य आणि त्यांच्या आधारावर काढलेल्या निष्कर्षांना एका क्रमात मांडले जाते. त्यामुळे अहवालाचे वाचन करणाऱ्या वाचकांना अध्ययनाच्या निष्कर्षाचा सार एकाच प्रकरणात उपलब्ध होतो. अहवालातील या प्रकरणामुळे संशोधनाचे परिणाम आणि निष्कर्ष एकदम स्पष्टपणे वाचकांच्या लक्षात येतात.

### १०. सूचना :

संशोधन हे ज्ञान मिळवण्याच्या उद्देशाने केले जाते. त्याचबरोबर सामाजिक संशोधनाचा उद्देश व्यवहारीक लाभ हा देखील असतो. कोणतेही सामाजिक संशोधन हे सामाजिक जीवनाशी संबंधित असते. म्हणून त्या विषयाच्या संदर्भात काही महत्त्वपूर्ण सूचना संशोधन अहवालात नमूद केल्या जातात. संशोधन करता आपल्या संशोधनाच्या आधारावर संशोधन विषयाच्या संबंधात काही सूचना देते. या सूचना संशोधन करताना केलेले

संशोधन, संकलित तथ्यावर केलेले परीक्षण आणि त्यामधून निघालेले निष्कर्ष यावर आधारित असतात. खऱ्या अर्थाने ह्याच सूचना विशिष्ट क्षेत्राच्या संशोधनानंतर त्या क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**आपली प्रगती तपासा:**

१. संशोधन अहवालाचे घटक सांगा.

## ९.५ संशोधन अहवालाची वैशिष्ट्ये

संशोधन अहवाल तयार करताना कोणत्या समस्या किंवा अडचणी निर्माण होतात याचा आपण विचार करतो. त्या अडचणी सोडवण्याचा आपण प्रयत्न करतो. पण आपला अहवाल चांगल्या प्रकारे कसा लिहिता येईल याचा संशोधन करताना प्रयत्न करावा. आदर्श किंवा एका चांगल्या अहवालाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. स्पष्ट आणि संतुलित भाषा :**

संशोधन अहवालाची भाषा स्पष्ट आणि संतुलित असावी. अहवालात आवश्यकतेनुसार परिभाषिक शब्दांचा उपयोग करणे अनिवार्य असते. जास्त प्रमाणात संकल्पनांचा उपयोग केल्यामुळे अहवाल लिस्ट होण्याची शक्यता असते म्हणून जास्त प्रमाणात परिभाषिक शब्दांचा वापर करणे टाळावे. अहवालाची भाषा अलंकारिक नसावी. त्यामुळे तथ्यांची वास्तविकता स्पष्ट होत नाही. अहवाल हा भाषा शैलीच्या दृष्टीने सुंदर असावा म्हणून अहवालात अतिशयोक्ती आणण्याचा प्रयत्न संशोधनकर्त्यानेकरता कामा नये. या सर्व गोष्टींचा विचार करून संशोधन करताना संतुलित भाषेत संशोधन अहवाल तयार करावा.

**२. तथ्यांची क्रमवार आणि मुद्देसूद मांडणी :**

तथ्यांची क्रमवार आणि मुद्देसूद मांडणी करणे हे आदर्श अहवालाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. एकाच प्रकारच्या तथ्यांचा वारंवार उल्लेख करता कामा नये. त्यामुळे अहवाल वाचणाऱ्यांना कंटाळा येतो. स्वतंत्र आणि महत्त्वाची तथ्य प्रथम मांडली पाहिजेत आणि त्यानंतर इतर तथ्य मांडावी याचाच अर्थ तथ्यांना क्रमवार मांडले पाहिजे.

**३. तथ्यांचे वैज्ञानिकतेनुसार विश्लेषण व निर्वचन :**

आदर्श अहवालामध्ये तर तथ्यांचेविश्लेषण व निर्वचन वैज्ञानिक पद्धतीने केले जाते. तसेच तर त्यांची मांडणी स्पष्टपणे केली जाते. संशोधन अहवाल वाचताना त्या अहवालातील विश्लेषण काल्पनिक वाटणार नाही . हे विश्लेषण वैज्ञानिक असल्याचा विश्वास वाचकांना वाटला पाहिजे याकरिता तथ्यांच्या स्रोतांचा संदर्भ संशोधन अहवालात स्पष्टपणे नमूद करावा.

**४. अधिक लोकांना फायदा :**

आदर्श संशोधन अहवाल अशा प्रकारचा असतो की तो वाचून जास्तीत जास्त लोकांना त्याचा फायदा होतो. अहवालामुळे केवळ ज्ञानाची वृद्धी होत नाही, तर त्याचा व्यवहारिक फायदा देखील होत असतो. संशोधन अहवालातून सामाजिक गोष्टींच्या संबंधात अनेक व्यवहारिक गोष्टी माहित होतात.

### ५. संशोधन पद्धती, तंत्र, क्षेत्र नमुना इत्यादींचे स्पष्ट विवरण :

आदर्श अहवालात संशोधन पद्धती, संशोधन तंत्र, संशोधनाचे क्षेत्र, संशोधनासाठी नमुना इत्यादी बाबत स्पष्ट आणि विस्तृत विवरण केले जाते. त्यामुळे वाचकांना संशोधना संबंधीची पूर्ण कल्पना येते. त्यांच्या मनात संशोधनाविषयीची कोणते शंका निर्माण होत नाही.

### ६. संशोधनातील समस्यांचा उल्लेख :

संशोधन करताना कोणत्या अडचणी किंवा समस्या आल्यात त्याचा स्पष्टपणे उल्लेख आदर्श अहवालात केला जातो. त्यामुळे संशोधन करताना आलेल्या अडचणींची जाणीव वाचकांना होते. भविष्यात संशोधन करणाऱ्या इतर संशोधनकर्त्यांना संशोधनाच्या समस्यांची माहिती मिळते. त्यामुळे त्या समस्यांविषयी ते सावध होऊन त्यांचे निराकरण कसे करता येईल यासंबंधीचा विचार करण्याची त्यांना संधी मिळते.

### ७. संकल्पना आणि सिद्धांत विकसित करण्याचा प्रयत्न :

आदर्श संशोधन अहवालात महत्त्वाच्या संकल्पना आणि सिद्धांत विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचप्रमाणे संशोधनाचे कोणकोणते नवीन विषय क्षेत्र असू शकतात यासंबंधीचा उल्लेख देखील केला जातो.

### ८. अहवालाचे आकर्षक स्वरूप :

आदर्श संशोधन अहवालाचे स्वरूप आकर्षक असते. अहवालासाठी वापरलेला कागद चांगल्या प्रतीचा असतो. अलीकडे अहवाल तयार करताना संगणकाचा वापर केला जातो. संगणकाच्या साह्याने आपल्याला आवश्यक त्या ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपाचे नकाशे, आलेख काढून कमी शब्दात माहितीचे सादरीकरण करता येते, त्यामुळे अहवाल आकर्षित होतो. अहवाल अधिक आकर्षित करण्याकरता आकर्षित शीर्षके, छायाचित्रे, संशोधन विषयासंबंधित फोटो इत्यादींचा उपयोग केला जातो. हे संशोधन अहवालाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

### आपली प्रगती तपासा:

१. संशोधन अहवालाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## ९.६ संशोधन अहवालाचे महत्त्व

संपूर्ण संशोधनाचे लिखाण स्वरूप म्हणजे संशोधन अहवाल होय. त्यामुळे संशोधन अहवालाचे विशेष महत्त्व आहे. संशोधन अहवालाचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. ज्ञानाचा प्रसार करण्यास मदत :

संशोधन अहवालामुळे वेगवेगळ्या संशोधना संबंधीची माहिती वाचकांना प्राप्त होते. अहवालात संशोधन विषयांबरोबरच इतर संबंधित गोष्टींची माहिती असते, म्हणून संशोधन अहवालामुळे ज्ञानाचा प्रसार करण्यास मदत होते.

**२. नवीन संशोधकांना गृहीत कृत्यांचा आधार :**

संशोधन अहवाल वाचल्यानंतर अनेक नवनवीन संकल्पना सुचतात. त्या संशोधनाच्या आधारावर नवीन गृहीत कृत्यांची निर्मिती करणे शक्य होते.

**३. संशोधन पद्धती व तंत्राचे ज्ञान :**

संशोधन अहवालामध्ये कोणत्या संशोधन पद्धती आणि तंत्राचा उपयोग केला याची माहिती दिली जाते. त्यामुळे वाचकांना संशोधन पद्धती व तंत्राचे ज्ञान मिळते. नवीन संशोधकांना आपला संशोधन कार्याकरिता संशोधन पद्धती आणि तंत्राची निवड मदत होते.

**४. सामान्य लोकांना उपयुक्त :**

संशोधन अहवाल सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने देखील उपयुक्त असतो. सामाजिक संशोधन हे समाजाशी निगडित असते. अहवालामध्ये सामाजिक विषयाच्या संबंधात अनेक महत्त्वाच्या सूचना आणि उपाय दिले असतात. या सूचना किंवा उपायांचा उपयोग शासन, सामाजिक संस्था, संशोधक व्यक्ती इत्यादीला होतो. त्याचप्रमाणे सर्वसामान्य लोकांना देखील या अहवालाचा उपयोग होतो.

अशाप्रकारे संशोधन अहवालाचे विशेष महत्त्व आहे. संशोधनकर्त्याने केलेले संशोधन हे केवळ संशोधकापुरते मर्यादित राहत नाही. अहवालामुळे संशोधनाची माहिती सर्व लोकांना केवळ संशोधकापुरते मर्यादित राहत नाही. अहवालामुळे संशोधनाची माहिती सर्व लोकांना प्राप्त होते. त्यामुळे त्या संशोधनावर लोक चर्चा करतात अनेकदा टीका देखील केली जाते. काही संशोधक प्रस्तुत संशोधन तपासून बघतात त्यामुळे ज्ञानाची वृद्धी होण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१. संशोधन अहवालाचे महत्त्व सांगा.

## ९.७ संशोधन अहवाल तयार करताना येणाऱ्या समस्या

संशोधन अहवाल तयार करणे अतिशय सोपे कार्य मानले जाते. कारण संशोधनकर्त्याने ज्या प्रकारे संशोधन केले असते त्याचा अहवाल तयार करायचा असतो. अहवाल तयार करणे ही सोपी बाब वाटत असली तरी ती वाटते तितकी सोपी बाब नाही. अहवाल तयार करणे अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. अहवाल तयार करीत असताना विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. अहवाल लिहीत असताना पुढील काही समस्या निर्माण होतात.

**१. भाषा :**

संशोधन अहवाल तयार करीत असताना सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे भाषा होय. संशोधन अहवाल सर्वसामान्य लोकांना समजला पाहिजे हा विचार करून जर सोप्या भाषेत अहवाल लिहिला तर अहवालाचा दर्जा घालवण्याची भीती असते. याउलट अहवालाचा दर्जा चांगला राहावा म्हणून वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करून अहवाल केला तर असा

अहवाल क्लिष्ट आणि तांत्रिक स्वरूपाचा होण्याची शक्यता असते. असा क्लिष्ट आणि तांत्रिक स्वरूपाचा अहवाल सर्वसामान्य लोकांना कळणार नाही. त्यांच्या दृष्टीने या अहवालास कोणतेच महत्त्व राहणार नाही म्हणून या परिस्थितीत अहवालाचा दर्जा टिकून ठेवणे, सर्वसामान्य लोकांना समजू शकेल अशा भाषेत अहवाल लेखन करणे आवश्यक असते म्हणून अहवालक्लिष्टहोणार नाही तसेच अहवालाचा दर्जा टिकून राहील या दृष्टीने अहवाल लिहिणे आवश्यक असते.

### २. परिभाषिक शब्दांची समस्या :

संशोधनात विशिष्ट प्रकारच्या परिभाषिक शब्द आणि संकल्पनांचा उपयोग केला जातो. सामाजिक विज्ञानात मात्र परिभाषिक संकल्पनांच्या सबंधात एक वाक्यता आढळून येत नाही. सामाजिक विज्ञानात एकच शब्द किंवा संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरतात. त्यामुळे जर परिभाषिक शब्द किंवा संकल्पनांचा उपयोग अहवालात केला तर त्याचे वेगवेगळे अर्थ लावण्याची शक्यता असते. दुसरी समस्या म्हणजे अहवालात परिभाषिक शब्द आणि संकल्पनांचा उपयोग केल्यामुळे सर्वसामान्य लोकांना त्याचा अर्थ कळत नाही.

### ३. सामान्य लोकांच्या ज्ञानाच्या स्तराची समस्या :

संशोधन वैज्ञानिक आणि तांत्रिक स्वरूपाचे असते म्हणून संशोधन अहवाल सामान्य लोकांना देखील समजू शकेल अशा भाषेत मांडणे हे संशोधनकर्त्यासमोर एक मोठे आव्हान असते. सामान्य लोकांची शैक्षणिक किंवा ज्ञानाचा स्तर हा साधारण असतो. त्यामुळे साधारण ज्ञानाचा स्तर असणाऱ्या लोकांच्या दृष्टीनेच संशोधन अहवाल मांडणे आवश्यक असते. कितीही श्रेष्ठ दर्जाचे कोणतेही संशोधन असो ते सामान्य लोकांना कळले पाहिजे. अन्यथा त्या संशोधनाचे महत्त्व केवळ काही विशिष्ट लोकांपुरतेच मर्यादित राहील. संशोधन सामान्य लोकांना समजेल अशा पद्धतीने संशोधन अहवाल प्रस्तुत करणे आवश्यक असते. म्हणून सामान्य लोकांच्या ज्ञानाचा स्तर लक्षात घेऊन त्या दृष्टीने संशोधन अहवाल मांडणे ही संशोधका समोरील एक समस्या आहे.

### ४. संकल्पनांची समस्या :

समाजशास्त्रात किंवा इतर विज्ञानात सामाजिक संकल्पनांचा विशेष विकास झालेला नाही. संकल्पनांद्वारे संपूर्ण परिस्थितीला काही शब्दाद्वारा व्यक्त करणे शक्य होते. संकल्पनांचा अर्थ स्पष्ट असतो. परंतु सामाजिक विज्ञानात संकल्पनांचा विशेष विकास झालेला नसल्यामुळे सर्वसाधारण परिस्थिती लक्षात घेण्यासाठी आवश्यक प्रस्तुत विवेचन करावे लागते. त्यासाठी बरेच परिश्रम घ्यावे लागतात. तसेच बराचसा वेळ खर्च करावा लागतो. संशोधन अहवाला प्रस्तुत विवेचनाकरिता संकल्पनांचा उपयोग करणे शक्य नसते.

### ५. वस्तूनिष्ठतेची समस्या :

संशोधन वस्तुनिष्ठ असणे अनिवार्य असते. तसेच ते संशोधन वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडले पाहिजे. परंतु सामाजिक विज्ञानाच्या सबंधात वस्तुनिष्ठतेची एक फार मोठी समस्या निर्माण होते. कारण संशोधनकर्ता हा समाजाचा एक घटक असतो. तो समाजाच्या कोणत्यातरी पैलूचे अध्ययन करतो तेव्हा त्याचे विचार तसेच मूल्य, मानसिक प्रवृत्ती इत्यादी गोष्टींचा त्या

संशोधनावर परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच त्या संशोधनाचा अहवाल प्रस्तुत करीत असताना वस्तुनिष्ठता राखणे कठीण असते. संशोधन अहवाल तर त्यांच्या आधारावर वस्तुनिष्ठपणे प्रस्तुत करीत नाही. त्यामुळे आपले विचार भाषा पक्षपात इत्यादी गोष्टींचा मुलांना देतात. त्यामुळे संशोधनातील वास्तविक तथ्यांच्या आधारे अहवाल प्रस्तुत केला जात नाही, म्हणून संशोधन अहवालाच्या संबंधात वस्तुनिष्ठतेची समस्या निर्माण होते.

**६. सत्य प्रकट करण्याची समस्या :**

संशोधन हे वस्तुनिष्ठ असते. कोणत्याही विषयाच्या सबंधात संशोधन करताना नवनवीन तथ्य प्राप्त होतात. त्यामुळे त्या विषयासंबंधीचे नवीन ज्ञान मिळते. परंतु हे नवीन ज्ञान विद्यमान परिस्थितीच्या उलट असल्याचे शक्यता असते त्या विषयाबाबतचे सत्य माहिती अहवालात मांडली तर संबंधित लोक आपला विरोधात जातील, लोक आपल्यावर टीका करतील अशी संशोधनकर्त्यांना भीती वाटते म्हणून संशोधन अहवालात सत्य गोष्टी मांडण्याबाबतची समस्या निर्माण होते.

सामाजिक संशोधन अहवाल लिहिताना संशोधकास वरील समस्या आढळून येतात. संशोधन अहवाल लिहिताना भाषेची समस्या, परिभाषिक शब्दांची समस्या संकल्पनांचे निर्मिती वस्तुनिष्ठता आणि सत्य प्रकट करण्याच्या प्रभावाखाली येऊन संशोधन अहवाल लिहीत असले तरी प्रभावित संशोधन अहवालामुळे नवीन ज्ञान प्राप्त करण्यावर काही मर्यादा येतात.

**आपली प्रगती तपासा :**

१. संशोधन अहवाल तयार करताना येणाऱ्या समस्या स्पष्ट करा.

## ९.८ सारांश

सामाजिक संशोधन प्रक्रियेमध्ये समाज जीवनाशी निगडित अनेक घटकांवर संशोधन केले जाते. यामध्ये सामाजिक समस्यां, समाज विकासासाठी असलेल्या विविध शासकीय योजना, त्यांची अंमलबजावणी व अमलबजावणीनंतरचे प्राप्त झालेले यश-अपयश याचे योग्य पद्धतीने मोजमाप करण्यासाठी किंवा सामाजिक समस्याचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी सामाजिक संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रस्तुत प्रकरणात सामाजिक संशोधनाची संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. सामाजिक संशोधन करताना संशोधनकर्ता विशिष्ट उद्देशाने संशोधन करीत असतो. म्हणून सदर प्रकरणात संशोधनाचे उद्देश मांडण्यात आले आहे. संशोधन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संशोधन लिखित स्वरूपात मांडणे अत्यंत महत्त्वाचे असते. खऱ्या अर्थाने त्या संशोधनाचा फायदा समाजासाठी किंवा इतर संशोधनकर्त्यांसाठी होऊ शकतो. म्हणून संशोधन अहवाल प्रस्तुत करताना संशोधन अहवालाची मांडणी कोणत्या घटकाद्वारे करने आवश्यक आहे, त्याचे क्रम कसे असावे, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. संशोधन अहवाल तयार करतांना कोणत्या समस्या किंवा अडचण निर्माण होतात. या अडचणी सोडवण्याचा

प्रयत्न संशोधक करत असतो. आपला अहवाल चांगल्या प्रकारे कसा प्रस्तुत करता येईल याचा संशोधनकर्ता प्रयत्न करावा लागतो.संशोधन अहवालाची वैशिष्ट्य, संशोधन अहवालाचे महत्व सांगण्यात आले आहे. संशोधन अहवाल तयार करताना संशोधकाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. तरीदेखील संशोधनकर्ता आपला संशोधन अहवालात सत्य परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न करत असतो.

## ९.९ संदर्भ सूची


- डॉ. प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धातीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
- प्रा. रा. ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन – तत्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन


## ९.१० स्वाध्याय

१. संशोधन अहवालाची व्याख्या सांगूनसंशोधन अहवालाचे उद्देश स्पष्ट करा.

३. संशोधन अहवालाचे घटक सांगा.

४. संशोधन अहवालाची वैशिट्ये स्पष्ट करा.

५. संशोधन अहवालाचे महत्त्वसांगा.

६.संशोधन अहवाल तयार करताना येणाऱ्या समस्यास्पष्ट करा.

❖❖❖❖

**( वेळ : तीन तास )** **(गुण -१००)**

**Please check whether you have got the right question paper**

**सूचना- १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.**
**२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**
**३) उजवीकडील अंक उपप्रश्नांचे गुण दर्शवितात.**

**प्र.1 खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा** **14 गुण**

अ. व्यावसायिक सामाजिक कार्याची संकल्पना स्पष्ट करा
ब. व्यावसायिक सामाजिक कार्याचा उद्देश स्पष्ट करा
क. सामाजिक विकासातील सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका विशद करा

**प्र.2 खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा** **14 गुण**

अ. बाल कल्याणाची व्याख्या स्पष्ट करून बाल कल्याणाची गरज स्पष्ट करा
ब. वृद्धाश्रमाबद्दल तुमचे मत मांडा
क. आरोग्य आणि मानसिक आरोग्य यांमधील फरक स्पष्ट करा

**प्र.3 खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा** **14 गुण**

अ. सामाजिक कार्यातील गट कार्याची तत्त्वे सांगा
ब. वैयक्तिक व गट कार्याचे टप्पे स्पष्ट करा
क. समाज संघटनेच्या विविध आवृत्यांची चर्चा करा

**प्र.4 खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा** **14 गुण**

अ. सामाजिक संशोधनास प्रोत्साहन देणारे घटक विशद करा
ब. सामाजिक संशोधनाची वैशिष्ट्ये सांगा
क. सामाजिक संशोधनातील माहिती संकलनाच्या पद्धती स्पष्ट करा

**प्र.5 खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा द्या** **14 गुण**

अ. समाजकार्याच्या पायऱ्या
ब. सामाजिक कार्याचे प्राथमिक क्षेत्र
क. सामाजिक कार्याचे प्रशासन
ड. सामाजिक संशोधनाचे प्रकार